

शिक्षणातील प्रश्नांकडून उत्तरांकडे जाण्याचा एक मासिक प्रयत्न

शिक्षणात मूलगामी परिवर्तनाची वाट शोधणारा एक मासिक प्रकल्प

शिक्षणाकडे सर्व दिशांनी पाहणारा एक मासिक दृष्टिक्षेप

**संपादक**
रमेश पानसे

**कार्यकारी संपादक**
डॉ. वैखरी वैद्य

**संपादन साहाय्य**
मुग्धा नलावडे

**व्यवस्थापकीय संपादक**
प्रसाद मणेरीकर

**संचालक**
अदिती नातू

**कार्यकारी संचालक**
अजित मंडलिक

**संपादन मंडळ**
डॉ. द. ना. धनागरे
डॉ. हेमचंद्र प्रधान
विवेक सावंत
आशिष पेंडसे

**कायदेतज्ज्ञ आणि सल्लागार**
हेमांगी जोशी

**सल्लागार मंडळ**
डॉ. राम ताकवले
डॉ. जब्बार पटेल
कुमार केतकर
प्रमोद लेले
दीपक घैसास
डॉ. चंद्रहास देशपांडे
अच्युत गोडबोले

**मुखपृष्ठ**
राजू देशपांडे

**सजावट / मांडणी**
आरती निरंतर

# शिक्षणवेध

वर्ष : दुसरे / अंक बारावा / जून २०१२ / मूल्य : ४० रुपये

संपादकीय / रमेश पानसे / ५
'शिक्षणाने समाज जोडला पाहिजे' / अनिल जोशी / ७
शाळा प्रवेशाची विचित्र समस्या / श्रुती पानसे / ११
शाळा प्रवेश – शैक्षणिक विचार / डॉ. अतुल कुलकर्णी / १५
व्यावसायिक शिक्षण : एक दृष्टिक्षेप / डॉ. संजय दानव / १९
प्राचीन भारतातील शिक्षणव्यवस्था / सुनीत पोतनीस / २३
कला शिक्षणाचे विविध आयाम / लक्ष्मीकांत मुळे / २५
वृत्तविश्व / ३२
ग्राममंगल वार्ता / ४०
साहित्यवेध – तुतारी / डॉ. सुप्रिया अत्रे /४२
लहान मुलांच्या पालकांसाठी / अश्विनी गोडसे / ४८
वाचक संवाद / ५३
वेध शिक्षणविषयक मासिकाचा / विवेक मॉंटेरो / ५५
आपल्या भाषा पुरेशा विकसित आणि समर्थ आहेत / विनोबा भावे / ६४

**संपादकीय व कार्यालयीन पत्रव्यवहार**
**ग्राममंगल शिक्षणवेध**
गांधी भवन परिसर, अंधशाळेशेजारी, कोथरुड, पुणे ४११ ०३८.
मेल – shikshanvedh@grammangal.org, संवाद : ०२० २५३८६६८७

**प्रसिद्धी आणि जाहिरात संपर्क :** अजित मंडलिक
२२, यमुना, शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग, मुंबई ७.
संवाद : ०९८६९०४९८४९
**बँकर्स :** दि ठाणे जनता सह. बँक लि.

हे मासिक मुद्रक-प्रकाशक अजित मंडलिक यांनी ग्राममंगल संस्थेसाठी इम्प्रेशन, २२, यमुना, शास्त्री हॉल, जे. डी. मार्ग, मुंबई ७ येथे छापून त्याच ठिकाणाहून प्रसिद्ध केले.

# संपादकीय

सध्या तरी चित्र असे दिसते आहे की, महाराष्ट्र शासनाच्या शिक्षणखात्याने 'शासन विरुद्ध समाज' असा लढा चालविलेला आहे. बालकाच्या शिक्षणहक्काचा कायदा हा आपल्या हातातील एक प्रभावी शस्त्र आहे असे मानून; शासन ते समाजाची गळकापी करण्यासाठी वापरत आहे. शासनाचे हित पाहावयाचे की जनतेचे हित पाहायचे या पेचात सरकार सापडले आहे. 'लोकांच्या हितासाठीच आम्ही शस्त्र परजत आहोत' ही भूमिका ठाम ठरवून सरकार समाजविरोधी वर्तन करीत आहे. उदाहरण आहे ते महाराष्ट्रात, मराठी माणसांना हव्या असलेल्या, कित्येक वर्षांपासून मराठी पालकांनी, मराठी माध्यमाचा आग्रह धरून, मराठी शाळा स्थापन करून, आपल्या मुलांना मराठी शाळांतून दाखल केले आहे. या शाळा कसेही करून बंद पाडण्यासाठी, आता, सरकार शस्त्रसिद्ध झाले आहे.

शिक्षणहक्क कायद्याचा चुकीचा व बेकायदेशीर अर्थ लावून १९ जून २०१० च्या परिपत्रकाने, एक गठ्ठा मान्यतेसाठी अवघडून बसलेल्या सर्व शाळा 'अनधिकृत' आहेत असे जाहीर करून दंडाची व तुरुंगाची कारवाई सुरू केली. आता, मराठी समाजाने लक्षात घ्यावे की

महाराष्ट्रात, मराठी शाळा काढणे व चालवणे हा गुन्हा ठरविण्यात आला आहे.

**जय महाराष्ट्र !**

महाराष्ट्र शासनाला, खाजगी मराठी शाळांची ॲलर्जी असून, सरकारने त्यांची वाढ रोखण्यासाठी बृहद् आराखड्यांचे सूळ निर्माण केले. (खाजगी दवाखान्यांना बृहद आराखडा का नाही करत सरकार ?) मागील वर्षी सरकारचे म्हणणे होते की महाराष्ट्रात मराठी शाळा फारच झाल्या असून त्यांच्यात स्पर्धा होईल; आता सरकारला पाहणी करून म्हणे, असे दिसले आहे की, महाराष्ट्रात २३७६ मराठी शाळांची गरज आहे. मग, २००५ व २००८ सालापासून मान्यतेसाठी रखडलेल्या शाळांना शासनाने लगेच परवानगी प्रदान करायला नको काय ? पण सरकारला तर या मराठी शाळा मारायच्याच आहेत. मग सरकारने, पुन्हा समाजहितविरोधी निर्णय घेतला. यापैकी सर्वच्या सर्व प्राथमिक शाळा सरकारच काढील. सरकारने शाळा चालविणे म्हणजे विद्यार्थ्यांचे नुकसान, ही गेल्या पन्नास-पासष्ठ वर्षांत सिद्ध झालेली बाब आहे; अनेक मराठी शाळा, केवळ त्या सरकारी आहेत म्हणून बंद पडताहेत; आणि सरकारला, केवळ खाजगी मराठी शाळा नकोत म्हणून या आवश्यक शाळा सरकार आपल्याच अखत्यारीत ठेवणार आहे.

महाराष्ट्रात, सरकारला खाजगी स्पर्धा चालत नाही; सरकारी मक्तेदारी चालते!

**जय महाराष्ट्र !**

शेकडो मराठी शाळांचे असलेले प्रस्ताव रद्द करून सरकार आता माध्यमिकसाठी नवीन प्रस्ताव मागवणार आहे. म्हणजे, ज्या शाळा चालू आहेत, जेथे काही वर्षे विद्यार्थी शिक्षण घेताहेत, त्या शाळा बंद पाडायच्या आणि नव्या शाळांसाठी प्रस्ताव मागवायचे. याचा अर्थ उघड आहे, की सरकारी मंडळी आपल्या सग्या-सोयऱ्यांना शाळा वाटप करणार. म्हणजे, पुन्हा आर्थिक भ्रष्टाचाराची सोय होणार.

सरकार परवानगीच्या जोखडातूनच भ्रष्टाचाराच्या नदीचा उगम असतो !

**जय महाराष्ट्र !**

महाराष्ट्र शासन भराभर, मागेल त्याला इंग्रजी शाळा काढायला परवानगी देत आहे. तेथे स्पर्धेचा विचार शासनाच्या मनात येत नाही. त्यांना मराठी शाळांसारखे कठोर निकष नाहीत. त्यांची स्थापनपूर्व अथवा स्थापनोत्तर तपासणी नाही. त्यांच्यासाठी 'बृहद् आराखडा' नाही. त्यांच्या शैक्षणिक दर्जावर कोणतेही नियंत्रण नाही. शासनसुद्धा आता आपल्या अखत्यारीत, भीत भीत का होईना, हळू हळू इंग्रजी शाळा काढू पाहते आहे. मराठी शिक्षणाचा द्वेष करणाऱ्या सरकारची इंग्रजीवरच प्रीती आहे, भक्ती आहे.

लोकांना शिक्षणात इंग्रजी हवे आहे; शासन इंग्रजीलाच शिक्षण विकते आहे !

**जय महाराष्ट्र !**

अलीकडे बोगस-खोट्या शाळांचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर पुढे आला आहे. अनेक वर्षे शासनाच्याच अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने, संस्थाचालकांच्या अशैक्षणिक वर्तनाने, त्यात नोकरी-पगारासाठी शिक्षकही अनैतिकदृष्ट्या सहभागी झाल्याने, कोट्यवधी रूपयांचा भ्रष्टाचार वर्षांनुवर्षे होत राहिल्याचे पटपडताळणीत निदर्शनात आले. सरकारने अजून ठोस कारवाई काहीही केली नाही. त्यातही पन्नास टक्क्यांच्या वरच्या खोटेपणाला सरकार शिक्षा देणार आहे. त्याखालच्या खोटेपणाला-त्यातील भ्रष्टाचाराला मात्र सांभाळून घेणार आहे. सरकार अशा शाळा बंद करील, पण, 'त्या' सरकारी अधिकाऱ्यांचे काय, ज्यांच्यामुळे हा आजार बळावला आहे ? त्यांना त्वरेने शिक्षा नको काय? शिक्षकांना आपण खोटेपणाने खोट्या शाळेत शिकवत आहोत (म्हणजे शिकवत नाहीच !), हे माहीत नाही काय ? मग त्यांच्यावर कारवाई काय ? सरकार म्हणे, त्यांना इतरत्र सामावून घेणार. म्हणजे सरकार पुन्हा आपले अधिकारी, आपले शिक्षक कसे सांभाळले जातील हेच पाहणार !

सरकार सरकारी नोकरांच्याच हितासाठी असते, समाजाच्या हितासाठी नाही !

**जय महाराष्ट्र !**

आता आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, लोकशाहीची अंगभूत तत्त्वेच आता बदलू लागली आहेत. 'समाजहितासाठी शासन' हे लोकशाही मूल्य हळू हळू घसरत चालले आहे. सध्या, 'शासनहितासाठी शासन' असे स्वरूप लोकशाही सरकार देऊ पाहत आहे. थोड्याच काळात, 'शासनहितासाठी समाज' असे स्वरूप पक्के होईल.

शिक्षणखात्याच्या कारभाराकरवी, सरकार आपली मक्तेदारीच सर्वतोपरी निर्माण करू पाहत आहे !

**जय महाराष्ट्र !**



**-रमेश पानसे**



१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. या राज्याचे पहिले मुख्यमंत्री होते यशवंतराव चव्हाण, २०१२–१३ हे यशवंतरावांचे जन्मशताब्दी वर्ष ! आरंभीच्या काळात यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्राची अत्यंत द्रष्टेपणाने आखणी केली. त्या अनुषंगाने योजना तयार केल्या, सामान्य माणूस विकासाच्या केंद्रस्थानी ठेवला.

समाज विकास हा शिक्षण विकासाखेरीज शक्य नाही हे सूत्र यशवंतरावांनी जाणले, आणि प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षणाबरोबरच अनौपचारिक शिक्षणाची विविध दालने खुली केली. शिक्षणामध्ये सर्वाथाने आधुनिकता आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

या शताब्दीनिमित्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण आणि महाराष्ट्रातील शिक्षणविकास यावर आधारित काही विचारांचा या लेखमालेद्वारे परिचय करून देण्याचा हा प्रयत्न. या मालिकेतील हा दुसरा लेख.......

संपादक

# ‘शिक्षणाने समाज जोडला पाहिजे’ – यशवंतराव चव्हाण

**अनिल जोशी**

भ्रमणध्वनी : ९७६६९९५९०४

स्वतंत्र महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी पदग्रहण केले आणि राज्याच्या सर्वांगीण विकासाची दिशा निश्चित करण्यासाठी त्यांनी केलेले चिंतन आणि त्यानुसार त्यांनी स्वीकारलेली धोरण याचा संकलीत परिणाम राज्याच्या समाजजीवनावर उमटण्यास सुरुवात झाली. वास्तविक, या राज्याच्या अनेकविध व्यवहारांशी यापूर्वी म्हणजे अगदी स्वातंत्र्यप्राप्तीच्या संधीकालापासूनच यशवंतराव निगडित होते. त्यांनी राज्यातील बहुविध समाजास अत्यंत जवळून अभ्यासले होते. मुळातच कला, क्री डा, साहित्य, शिक्षण, संस्कृती, समाजकारण, मूल्याधिष्ठी त राजकारण अशा विविध क्षेत्रात यशवंतरावांना आरंभापासूनच एक विशेष प्रकारचा रस होता आणि गतीदेखील होती. त्यांचे सारे विचार हे सामान्य, गोर–गरीब, दलित–पीडित माणसाच्या जीवनक्रमामध्ये परिवर्तन घडविण्याच्या ध्येय धोरणांशी बांधलेले होते. जीवन विकासामध्ये सामान्य

जनता गतीशील न होण्याची कारणे त्यांनी अभ्यासली होती. जाती-पाती, धर्म-पंथ यामध्ये विभागलेला हा समाज एकसंघ करायला असेल तर त्यातील विघटिताची कारणे शोधणे आणि त्यावर उपाय करणे याचा मूलभूत विचार यशवंराव ऐन तारुण्यातदेखील करीत होते याचे असंख्य पुरावे त्यांनी घेतलेल्या निर्णयांची तपासणी करताना आपणांस भेटतात.

शिक्षण हा समाजविकासाचा मुख्य कणा आहे. यावर त्यांनी स्वतंत्र चिंतन केले होते. या शिक्षणाची निगडित असणाऱ्या संस्कृती विकासाकडे त्यांचे जाणीवपूर्वक लक्ष होते. त्यामुळे यशवंतरावांनी शिक्षण आणि संस्कृतीविकास याचा अत्यंत गांभीर्याने केलेला विचार म्हणजेच या महाराष्ट्राच्या समाजजीवनाचे भावी काळात तयार करायच्या सुंदर शिल्पाची पूर्वतयारी होती. ते मुख्यमंत्री झाले त्यावेळी ते वयाच्या पन्नाशीच्या वाटेवर होते. नियतीनेच त्यांचेवर या राज्याची भावी विकासाची जबाबदारी सोपविली होती आणि त्याच नियतीने त्यांना या पदावर कार्यकर्ते राहण्यासाठी केवळ अडीच वर्षांचा कालावधी दिला होता. अर्थात नियतीच्या मनात असणाऱ्या या बहुरंगी खेळाची यशवंतरावांना पुसटशीपण कल्पना नव्हती. पण त्यांचे डोळ्यात भरणारे स्वभाववैशिष्ट्य म्हणजे जे नियतीने त्यांच्या हाती दिले त्याचा त्यांनी अत्यंत उमद्या मनाने स्वीकारच केला. नियतीचा निर्णय अव्हेरल्याचे एकही उदाहरण त्यांच्या जीवनप्रवासात शोधून सापडत नाही. नियतीशी जुळवून घेण्याची मानसिक तयारी हा त्यांच्या आईकडून त्यांना मिळालेला वारसा होता.

केवळ अडीच वर्षांच्या आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीत यशवंतरावांनी घेतलेले निर्णय आणि या राज्याच्या विकासासाठी तयार केलेली धोरणात्मक बैठक चकित करणारी आहे. शिक्षणविकास म्हणजेच समाजविकास हे सूत्र त्यांनी पचविले होते. या शिक्षणामध्ये निर्माण झालेली आणि परंपरेने लादलेली असंख्य अडचणींची अडथळ्यांची भेंडोळी जाणीवपूर्वक बाजूस सारली पाहिजेत याची त्यांना पूर्ण जाणीव असल्यानेच ज्या समाजास वर्षानुवर्षे, पिढ्यानपिढ्या शिक्षणापासून आणि पर्यायाने विकासापासून वंचित राहावे लागले, नव्हे प्रसंगी ठेवले गेले तो समाज यशवंतरावांना सातत्याने खुणावत होता. आणि म्हणूनच त्यांनी प्राथमिकपासून विद्यापीठीय शिक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या नव्या पिढीसाठी शैक्षणिक सवलती जाहीर केल्या. नऊशे रुपये उत्पन्नाच्या आसपास रेंगाळणाऱ्या हजारो, लाखो पालकांच्या मुलांसाठी यशवंतरावांनी मुक्त आणि मोफत शिक्षणाची संधी प्राप्त करून दिली, बदललेल्या कालप्रवाहाशी विज्ञान-तंत्रज्ञान विकासाशी, आर्थिक चढउतारांशी, सांस्कृतिक बदलांशी हे शिक्षण जोडण्याची त्यांना नितांत गरज वाटू लागली आणि त्यांचा अत्यंत बारकाईने अभ्यास करून यशवंतरावांनी प्राथमिक-माध्यमिक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जशा आर्थिक उत्पन्नाच्या जाचक अडथळ्यापासून मुक्त केले. तसेच या शिक्षणात आधुनिकतेचा मुक्त संचार असला पाहिजे याकडे पण त्यांनी विशेष लक्ष दिले. पश्चिम महाराष्ट्रातील गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठाची स्थापना, मराठवाड्यासारख्या सर्वार्थाने मागास राहिलेल्या भागासाठी मराठवाडा विद्यापीठाची स्थापना, कराड येथे नव्याने सुरू करायचे इंजिनिअरिंग कॉलेज, मिरज येथे सुरू करण्यात आलेले वैद्यकीय महाविद्यालय, राज्याच्या सांस्कृतिक विकासाची गती वाढविण्यासाठी निर्माण करण्यात आलेले साहित्य-संस्कृती मंडळ, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ ही सारी त्यांच्या धोरणात्मक निर्णयातील आधुनिकतेची साक्ष देणारी उदाहरणे आहेत.

राज्याच्या शिक्षणप्रक्रियेमध्ये काही पारंपरिक विचारांनी गुंतागुंत निर्माण केली असल्याची तीव्र जाणीव यशवंतरावांना त्याकाळी होत राहिली. ह्या गुंत्यांना दूर करण्यासाठी नव्या शिक्षण प्रक्रियेमध्ये येऊ पहात असलेल्या युवकांशी संवाद करण्याचे एक वेगळे कौशल्य त्यांना प्राप्त झाले होते. धोरणात्मक निर्णय घेताना जी धोरणे ज्या समाजाच्या प्रत्यक्ष जीवनव्यवहाराशी संबंधित आहेत त्या समाजास विश्वासात घेणे हे लोकशाहीस पोषक असणारे विचार यशवंतरावांच्या ठायी स्थिरावलेले होते. आर्थिक भेदामुळे जसे समाजजीवन दुभंगले जाते तसेच सामाजिक स्तरांच्या कचाट्यात देखील उच्च-नीचतेचा दुर्गुण दडलेला आहे; तो वेळीच दूर केल्याखेरीज शिक्षणद्वारे समाजऐक्य साधण्याचे आपले धोरण पूर्णत्वास जाणार नाही, याची यशवंतरावांना जबरदस्त जाणीव होती.

रेडिओवरील एका भाषणात यशवंतरावांनी आधुनिक शिक्षण प्रवाहात प्रविष्ट होऊ पाहणाऱ्या युवकांशी केलेला संवाद अत्यंत बोलका आणि मूलभूत स्वरूपाचा आहे. त्यांनी या खेड्यापाड्यात स्थिरावलेल्या नव्या पिढीसमोर आपल्या शिक्षण कल्पना स्पष्ट केल्या. त्यांची ती ग्रामीण शिक्षणाची कल्पना अत्यंत दिशादर्शक अशीच होती. ते म्हणाले,

'ग्रामीण शिक्षणाची माझी कल्पना सांगण्यापूर्वी शिक्षण म्हणजे काय याची थोडीफार कल्पना आपण समजावून घेऊ या. पुस्तक वाचून येणारे ज्ञात ते 'शिक्षण' असे समजण्याची एक मोठी प्रथा आहे. आणि ती काही अंशी बरोबरही आहे. परंतु खरे शिक्षण म्हणजे काय याचा अर्थ आपण सगळ्यांनी आपल्या मनाशी समजावून घेतला पाहिजे. मी माझ्या उपयोगासाठी शिक्षणाची एक सरळ आणि साधी व्याख्या करून ठेवली आहे. शिक्षित व्यक्तीला स्वतःच्या भोवती घडणाऱ्या इतर गोष्टी आणि जगामध्ये घडणाऱ्या इतर गोष्टी यांची ज्यामुळे काही संगती लावता येते, त्याचा योग्य अर्थ समजावून घेता येतो आणि त्याचा परिणाम आपल्या जीवनावर काय घडतो, आपल्या व्यक्तिमत्वावर काय घडतो, हे समजावून घेता येते आणि देता येते त्याला मी शिक्षण मानत आलो आहे. .... जेव्हा ग्रामीण शिक्षण असा शब्द आम्ही उच्चारतो तेव्हा ग्रामीण आणि नागरी शिक्षण, खेड्यातल्या लोकांसाठी शिक्षण आणि शहरातल्या लोकांसाठी शिक्षण असे शिक्षणाचे दोन वेगळे प्रकार असावेत, असा विचार सहाजिक मनाशी येतो. पण याबाबत वास्तव कल्पना काय आहे हे आपणास समजले पाहिजे'.

'माझे असे स्पष्ट आणि स्वच्छ मत आहे की, शिक्षणाचे असे दोन मूलभूत वेगवेगळे प्रकार असू शकणार नाहीत. आजच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत खेड्यातला माणूस आणि शहरातला माणूस यामध्ये एक प्रकारचे जे कृत्रिम अंतर वाढत चालले आहे. ते वाढते अंतर कमी करून त्यांच्यामध्ये एक प्रकारचा तोल निर्माण करणे, जवळचा संबंध निर्माण करणे, जिव्हाळा निर्माण करणे हा माझ्या दृष्टीने आपल्या देशांतील आजचा महत्त्वाचा आणि प्रमुख प्रश्न आहे. आणि म्हणून ग्रामीण शिक्षण हा काही वेगळा प्रकार आहे; अशा समजुतीने जर आम्ही ग्रामीण शिक्षणाकडे पहात असलो, तरी ती एक मोठी चूक होईल, असे मला सांगावसे वाटते'.

यशवंतराव स्वतः ग्रामीण भागातूनच शहरी जीवनाकडे चालत राहिले. या वाटचालीत 'शिक्षण प्रक्रियेतील विचार दोषांमुळे निर्माण झालेले सामाजिक गढूळपणा त्यांच्या अवतीभोवती दाटून राहिल्याचे त्यांच्या लक्षात येत होते.

या अनुभवाचा प्रवाह रोखला पाहिजे हे त्यांनी तीव्रतेने जाणवत होते.

ते म्हणतात, 'आज ज्या तऱ्हेचे शिक्षण आपल्या अवतीभोवती दिले जात आहे. त्या ग्रामीण जीवनावर काय परिणाम होतो? एकदा खेडूत मुलगा शिक्षणासाठी बाहेर गेला आहे, त्या शिक्षणाचा त्याच्यावर काय परिणाम घडला आणि तो ज्या खेड्यातून आला त्या खेड्यासाठी त्याचा काय उपयोग झाला, याचा आपण विचार केला तर मात्र मनामध्ये एक प्रकारची खिन्नता आल्याखेरीज राहत नाही. खेडूत बाप आणि आई यांनी कष्ट करून शिक्षणासाठी बाहेर पाठविलेला मुलगा पदवी घेऊन जेव्हा शहाणा होतो तेव्हा त्याचे शहाणपण खेड्यामध्ये राहून शेती करणाऱ्या त्याचा माता-पित्यांचे आर्थिक जीवन सुधारण्यास उपयोगी पडत नाही. तो शहरामध्ये एकादी सोयीची, सुखाची नोकरी मिळावी या भावनेने खटपट करीत असतो. पुष्कळ वेळा तो यशस्वीही होतो आणि मग एका अर्थाने आपले आईबाप आणि तो ज्या भूमीत, ज्या गावात वाढला तो गाव ती भूमी या सर्वांनाच तो मुकतो. ..... खरोखरी हे मोठे दारुण चित्र आहे. 'गावातून शिक्षण घेऊन न तयार झालेला तरुण हा गावांतील शेतीच्या विकासाच्या, ग्रामीण जीवनाच्या विकासाच्या उपयोगी पडण्याइतपत सकस नागरिक बनावा या दृष्टीने शिक्षण द्यावयाचे, त्यालाच जर आपण ग्रामीण शिक्षण म्हणणार असलो तर यातऱ्हेच्या ग्रामीण शिक्षणाचा विचार करण्याची आज जरुरी आहे यात शंका नाही'.

यशवंतरावांचे शिक्षणाविषयीचे सर्व चिंतन हे खेड्यापाड्यातील सामान्य माणसाच्या सर्वांगीण विकास विचाराभोवतीच केंद्रित झाले होते. त्यांनी विविध प्रसंगी शिक्षण परिषदांमधली केलेली भाषणे हेच सांगतात की, इथले शिक्षण या मातीत जन्मास आलेल्या प्रत्येक व्यक्तीविकासाची दिशा दाखविणारे आहे. शिक्षणाने समाज तोडता कामा नये तर समाज जोडण्याचे 'शिक्षण' हे एक प्रभावी माध्यम आहे, या विचाराशी यशवंतराव ठाम होते हे या राज्यातील सामान्य माणसाच्या जीवनविकासाच्या वाटेवरचे प्रमुख धोरण होते.

**'शिक्षणवेध' ह्या मासिकात दरवेळी परीक्षणासाठी पुस्तके पाठविण्याचे आवाहन० – लेखकांना केले जाते. त्या आवाहनास भरघोस प्रतिसाद मिळतो आहे. त्या पुस्तकांची साभार पोच–**

- **अर्थविचार, अर्थव्यवहार–सर्वांसाठी,**
  **लेखक – प्रकाश गोळे, इकॉलॉजिकल सोसायटी, पुणे. (२००६)**
- **दौलतगडाच्या परिसरात,**
  **लेखक – डॉ. माधव रा. पोतदार, मानसगंध प्रकाशन, पुणे. (२०१२)**
- **विद्यार्थी, शिक्षक, पालक–समस्या–उपाययोजना,**
  **लेखक – डॉ. माधव पोतदार, सुयोग प्रकाशन, पुणे. (२०११)**
- **माय मराठी,**
  **लेखक – दिवाकर मोहनी, साहित्य प्रसार केंद्र (२००५)**

**प्रवेशप्रक्रिया हा सद्यकालीन शिक्षणव्यवस्थेचा महत्त्वाचा आणि अपरिहार्य भाग आहे. पूर्व प्राथमिक, प्राथमिक-माध्यमिक शाळेत प्रवेश घेताना कोणत्या बाबींकडे लक्ष देणे अत्यावश्यक आहे; प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता, गतिमानता कशी येईल व्यावसायिक शिक्षणाची आवश्यकता का आहे अशा वेगवेगळ्या विचारांचा परमर्श या लेखांमधून घेण्यात आला आहे.प्रवेशप्रक्रियेत सामील होताना पालकांची सजगता वाढवणे हाच याचा हेतू आहे.**

**संपादक**

# शाळा प्रवेशाची विचित्र समस्या

**श्रुती पानसे**

प्रत्येकाला 'चांगल्या' शाळेत प्रवेश घ्यायचाय. पण 'चांगली' म्हणजे नक्की कशी, याचे निकष बदलताहेत-बदलले आहेत.

भरपूर फी घेणारी, अर्थात इंग्रजी माध्यमाचीच, त्यातही वेगळं बोर्ड असेल तर उत्तम, भरपूर गृहपाठ देणारी...अशी शाळा 'चांगली'? नक्की काय विचार करताहेत पालक?

शाळाप्रवेश ही पूर्वीइतकी साधीसुधी गोष्ट राहिलेली नाही. ती मुलांच्या (औपचारिक) उज्ज्वल भविष्याची पाउलवाट आहे, असं आता पालकांचं मत बनत चाललं आहे.

शाळेबद्दलच्या सर्वसामान्य अपेक्षा–जसे, शाळा घराजवळची असावी, मातृभाषेतून शिकवणारी असावी, लहानग्या मुला–मुलींना समजून घेणारी असावी, एवढ्याच अपेक्षा बाळगणारा पालकवर्ग मनाने आमूलाग्र बदलला आहे. चांगले नागरिक घडवणारी, आयुष्यात ध्येय दाखवणारी, संस्कार देणारी, मूल्य शिकवणारी, आत्मविश्वास देणारी–अशी शाळा आज किती पालकांना अभिप्रेत असावी, असा प्रश्न पडावा अशी परिस्थिती आहे. तर त्याउलट–

१) शाळा अशी हवी की ज्यात शिकल्यामुळे भविष्यात भरपूर आणि जास्तीत जास्त पैसे मिळवता यावेत. अशी शाळा आज सर्वांनाच हवी आहे, असं दिसतं.

२) शाळा ही शिक्षण देणारी असते खरी; पण तसं बघायचं तर शिक्षण शाळेबाहेरही मिळतं. निरनिराळ्या शिकवण्यांमध्येही गरजेपुरतं,मार्कांपुरतं शिक्षण मिळतं.

३) शाळा ही शिक्षणाशीच संबंधित असते असं नाही, तर ती प्रतिष्ठेचीदेखील गोष्ट आहे.

उच्चमध्यमवर्गापर्यंत असलेले हे विचार आता मध्यमवर्गापासून कनिष्ठ वर्गापर्यंत पोचलेले आहेत. कसंही करून 'चांगल्या' शाळेत नाव घातलं पाहिजे, हा विचार बळावतोय. संपूर्ण देशभरातल्या शिक्षणाची परिस्थिती 'असर'च्या अहवालातूनही दिसून येते. त्यात हे चित्र स्पष्ट झालं आहे की आजवर सरकारी शाळेवर अवलंबून असणारा ग्रामीण व कनिष्ठवर्गीय पालकवर्गही 'चांगल्या' म्हणजेच 'खाजगी' शाळांचं बोट धरू पाहतोय. २००५ ते २००८ या काळात खाजगी शाळांमधल्या विद्यार्थ्यांचं प्रमाण १६.४% वरुन २२.५% वर पोचलं आहे. हा बदल गेल्या काही वर्षांपासून जाणवत होताच, आता तो सिद्ध झाला आहे. या खाजगी शाळांमध्ये अर्थातच इंग्रजी माध्यमांच्या शाळाही आहेत. ग्रामीण भागातही आता 'चांगल्या' शिक्षणासाठी खर्चिक शाळांकडे जायचा कल दिसतो आहे. त्यांना मोफत शिक्षण नको; आणि खिचडीही नको. या सुविधांकडे त्यांनी पाठ फिरवलेली दिसते.

'चांगल्या' शाळेचे निकष काय?

चांगली शाळा म्हणजे नेमकी कशी शाळा पालकांना हवी असते?

शाळेची निवड या विषयावर प्रत्येक घरात आता बरीच चर्चा होते. पालकांचे मुद्दे अशा प्रकारचे असतात. काही पालकांना, आपण ज्या किंवा जशा शाळेत शिकलो त्याच पद्धतीची शाळा हवी असते. किंवा मग उलट–त्या पद्धतीची शाळा अजिबात नको असते. काहींना शाळा इंग्रजी माध्यमाचीच हवी.

काही पालक बोर्ड कोणतं हवं याचा अभ्यास करतात. इंग्रजी माध्यम+महाराष्ट्र बोर्ड यापेक्षा सध्या इंग्रजी माध्यम+सी.बी.एस.सी. किंवा आय. सी. एस. ई. बोर्ड हे जास्त योग्य वाटतं. पालकांची फिरतीची नोकरी असेल तर असे पर्याय या आधी स्वीकारले जायचे. पण आता इथेही चित्र बदललेलं दिसतंय.

या शाळांमध्ये परीक्षा देऊन पास झालेल्या मुलांना सहजगत्या देशात कुठेही किंवा परेदशात पुढच्या शिक्षणासाठी किंवा नोकरीसाठी प्रवेश मिळतात असं दिसतं. सध्याच्या जागतिकीकरणाच्या युगात आपल्या मुलांनी भरपूर पैसे मिळवावेत, त्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर जावं लागलं तरी चालेल, असं एक आकर्षण

असतं. त्यातून या शाळांकडे पालकांचा ओढा आहे. ज्या पालकांची फिरतीची नोकरी नाही किंवा भविष्यात असू शकत नाही असे पालक या बोर्डच्या शाळांकडे ओढले गेले, त्याचं हे एक कारण आहे.

शाळा प्रतिष्ठीत असावी. तिथे येणारी मुलं ही आपल्याच 'क्लास'ची असावीत. तसंच शिक्षकही आपल्याच क्लासचे असावेत असं एक मत आहे. फी कितीही असली तरी ती देण्याची सर्वच पालकांची तयारी असते. जास्त फी परवडत नाही, असे पालकही काही ना काही जमवाजमव करताना दिसतात. चांगल्या शाळेसाठी कितीही लांब जावं लागलं तरी चालेल. तो प्रश्न फार ग्राह्य धरला जात नाही. असे काही मुद्दे शाळेच्या निवडीबद्दल असतात.

पालकवर्ग मुलांच्या शिक्षणासाठी एवढा विचार करतो आहे. इंटरनेटच्या माध्यमातून इतरही असंख्य प्रकारची माहिती तो जमवत असतो. पण शिक्षणाच्या गाभ्यापर्यंत पोचतील असे ठोस मुद्दे तो विचारात घेताना दिसत नाही. उदाहरण द्यायचे झाले तर,

* शाळेत शिकवायची पद्धत कोणती आहे?

* मुलांचा जो कल आहे त्यानुसार शिकवतात का?

* जी मुलं वर्गाबरोबर शिकू शकत नाहीत, त्यांच्या बाबतीत शाळेचं धोरण काय आहे? अशा मुलांच्या अभ्यासासाठी शाळा काय प्रयत्न करते? अशा मुद्यांचा फारसा विचार होताना दिसत नाही तर असं दिसतं की मुलांना जर अपेक्षेपेक्षा कमी गुण किंवा शेरा मिळाला तर त्याची जबाबदारी पालकांवर का टाकली जाते. असे पालक मग ट्यूशन लावतात. शाळेत पूर्ण वेळ जाऊन, उत्तम शिक्षकांनी शिकवूनही मुलं बाहेर ट्यूशन लावतात, ती का? शिक्षणाची जबाबदारी एका शाळेवर सोपवली की ट्यूशन का लावायची? एखाद्या शाळेतली ७०-७५ टक्केहून जास्त मुलं ट्यूशनला जात असतील, तर ती शाळा चांगली किंवा प्रतिष्ठित कशावरून?

* मुलांचा गृहपाठ राहिला, मूल शाळेत उशिरा आलं, तर अशा 'मोठमोठ्या' चुकांची शिक्षा काय केली जाते? हे पालकांनी प्रवेश घेण्या आधीच विचारायला पाहिजे.

या सर्वांची उत्तरं शाळेकडून मिळवावीत. पण केवळ त्या उत्तरांवर अवलंबून राहू नये. तर शाळेच्या आधीच्या/वरच्या वर्गातल्या पालकांकडून अशी माहिती अगदी जरूर मिळवावी. हे चालणार असेल तर ती शाळा निवडावी. वर दिलेल्या सर्वसाधारण मुद्यांचा विचार करावाच. त्याबरोबर याही मुद्यांचा विचार, नव्हे; एक प्रकारे अभ्यासच करावा. कारण हा दहा वर्षांचा काळ मुलांच्या जडणघडणीसाठी महत्त्वाचा काळ आहे.

शाळा 'चांगली' असली तरी...

बाकी, शाळा बदलताहेत, शिक्षण बदलतंय, त्याचा काही प्रमाणात त्रास होतोय असंही या शाळांच्या पालकांच्या बोलण्यातून समोर येतं. या शाळांमध्ये अभ्यास खूप असतो. अगदी बालवाडीपासूनच अभ्यासाला जुंपलं जातं यावर सर्वांचं एकमत आहे.

'इंग्रजी चांगलं होईल, म्हणून आम्ही आमच्या मुलीला या शाळेत घातलं. त्यासाठी भरपूर फी मोजली. अजूनही

मोजतो आहोत. मात्र आमच्या शाळेत इतर पूरक उपक्रमांना जराही वाव नाही. शाळेला ग्राऊंड असून त्यावर मुलांनी खेळायचं नसतं. तिला लहानपणापासून खूप अभ्यास करावा लागायचा. गृहपाठ देण्याचं प्रमाणही खूपच आहे. पहिली–दुसरीत असतानाही इतर मुलं खेळत असायची आणि ती मात्र अभ्यास करत असायची, रविवारी देखील. लहानपणापासून तिला शिकवणी लावायला लागली. आम्हाला दोघांना दहावीपर्यंत क्लास लावावा लागला नव्हता. तिला मात्र पहिलीपासून क्लास आहे, याचं आम्हाला वाईट वाटतं.'आता पाचवीला जाणाऱ्या  एका मुलीची आई सांगत होती.

ज्यांचा मुलगा या वर्षी पहिलीत होता, त्या आई–बाबांचं म्हणणं असं की, 'शाळेत अभ्यास खूप असणार याची कल्पना आधीपासून होतीच. या वर्षापासूनच त्याची धग जाणवते आहे. मात्र आत्ता 'कठोर मेहनत' घेतली तर पुढे त्याला त्याचा फायदा होणारच आहे.'

इंग्रजी माध्यमात केवळ इंग्रजीलाच महत्त्व मिळतं. अन्य भाषांना दूर सारलेलं असतं. ती पद्धत तर चुकीचीच आहे. काही शाळा मराठीला पूर्ण मज्जाव करतात. बोलायचं तर इंग्रजीतूनच असा नियम करतात. यामुळे मुलांची मातृभाषेतून येणारे विचार थांबतात आणि ते विचार इंग्रजीतून चालू झाले तर ठीक. पण भाषा तेवढी प्रगल्भ झालेली नसेल तर नुसता भाषेचा गोंधळ तर उडतोच, पण त्याही पुढे जाऊन विचारांचाच गोंधळ उडतो. यातून मुलांची विचारशक्ती खुंटण्याचा धोका असतो. आज इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जाणाऱ्या कित्येक मुलांची कोणतीच भाषा पक्की नाही, असं दिसतं. केवळ प्रश्नांची उत्तरं लिहिणं म्हणजे भाषा आली असं होत नाही तर स्वतःच्या मनाने दहा–बारा ओळी लिहिता आल्या पाहिजेत ते होत नाही. अशा परिस्थितीत भाषा विकसित झाली नाही तर तीही चूक मुलांचीच आहे असं समजणार का? शाळा निवडताना या गोष्टींचा बारकाईने विचार करायला हवा.

मुलं लहान असेपर्यंत त्यांच्या 'उद्या'चा विचार पालकांना करावा लागतो. सध्या इंग्रजीचा ओढा म्हणून किंवा इतर लोक आपल्या मुलांना अशा तथाकथित चांगल्या, प्रतिष्ठीत शाळेत घालतात, मग आपणही घातलं पाहिजे. हाच त्याच्या भविष्याचा योग्य विचार आहे, अशा समजुतीने अशा शाळांकडे वळणारे पालक किंवा प्रतिष्ठेसाठी या शाळेत घालणारे असोत, कोणतेही पालक असले तरी त्यांनी आज घेतलेले निर्णय महत्त्वाचे ठरणार आहेत.



# शाळा प्रवेश - शैक्षणिक विचार

**डॉ. अतुल प्रकाश कुलकर्णी**

'मेरा बेटा इंजिनिअर बनेगा ! बी. टेक इंजिनिअर ! ....' हे ३ इडियटस् मधील वाक्य समाजातील सर्व पालकांचे प्रतिनिधीत्व करतात असे वाटते. आजकाल मूल जन्माला आले की, पालकांमध्ये चर्चा सुरू होते ती त्याच्या शाळा प्रवेशाची आणि सध्या कहर म्हणजे मूल दीड वर्षाचे झाले की त्याला लगेच प्ले ग्रुपमध्ये प्रवेश दिला जातो आणि इथूनच ...... मग काही बोलायलाच नको.

आजकाल मुलांना शाळेत प्रवेश घेण्यापूर्वी (जागरुक) पालक शाळेविषयी फारच चौकशी करताना दिसतात. मग ही चौकशी असते ती शाळेतील विद्यार्थी संख्या, पॅटर्न (सी. बी. एस. ई/एस. एस. सी./आय. सी. एस. ई.) फी, स्कूल बस, शाळेची इमारत, तेथील बाह्य दिखावा, शाळेतील भोजन वगैरे. मग पालक म्हणतात अमुक एका शाळेची फी म्हणे ५०,०००/– वगैरे अशी आहे, शाळेत रोज मुलांना डबा द्यावा लागत नाही, अमूक एका अ/उ हॉलमध्ये त्या शाळेचे गॅदरिंग होते. फक्त प्रवेशाच्या वेळी पालकांना शाळेत जावे लागते, म्हणजेच पालकांची मुलाखत घेऊन प्रवेशाचे ठरविले जाते (इथे मला गंमत वाटते की, प्रवेश मुलाचा, मुलाखत पालकांची म्हणजे ... असो) मग नंतर पालकांना आजिबात शाळेकडे फिरकण्याची गरज नसते. रोज शाळेची बस नेते व आणून सोडते. काही अडचण,सूचना असल्यास शाळा मुलांकरवी चिठ्ठी पाठविते तेव्हाच फक्त पालकांनी शाळेत जायचे. असा विचार करून पालक मुलांसाठी शाळा निवडतात प्रवेश घेतात.

तसेच पूर्वप्राथमिक स्तरावर काही पालक शाळा प्रवेश घेताना असाही विचार करतात की या शाळेचे डे केअर सेंटर आहे म्हणून ही शाळा निवडावी. म्हणजेच शाळा प्रवेश हा मुलांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाचा पहिला टप्पा आहे. तसेच हे पालकांच्या समोरील मोठे आव्हान आहे. हा निर्णय जितका जास्त योग्य व विचार करून घेतला जाईल तितके त्या मुलाचे भवितव्य जास्त उज्ज्वल होईल.याचा कोठे विचारच नाही.

या लेखाच्या माध्यमातून मला याविषयी काही महत्त्वाच्या बाबी सुचवायच्या आहेत.

कारण बरेच पालक वरील प्रमाणेच 'काय भुललासी वरलिया रंगा।' या संत चोखामेळ्याच्या अभंगानुसार अर्थ विचारात न घेता शाळा प्रवेशाचा विचार करतात व त्यानुसार प्रवेश घेतात. मात्र, प्रवेश घेताना शाळा, निवडताना काही शैक्षणिक बाबींचा विचार करणे आवश्यक आहे.

■ मान्यता

ज्या शाळेत प्रवेश घ्यावयाचा आहे त्या शाळेला शासनाने मान्यता दिलेली आहे का? ती कोणत्या वर्षांपर्यंत वैध आहे? किती विद्यार्थी संख्येची मान्यता आहे? कोणत्या पॅटर्नची (सी. बी. एस. ई / एस. एस. सी./ आय. सी. एस. ई.) मान्यता आहे? या सर्व बाबींची शाळेकडे कागदपत्रांची शहानिशा करूनच स्वतः खात्री करून घेणे आवश्यक आहे. विशेषतः आय. सी. एस. ई. हे मंडळ तर देशातल्या कोणत्याही राज्य वा भारत सरकारने स्थापन केलेले नसून ते काही खाजगी व्यक्तींनी स्थापन केलेले एक खाजगी मंडळ आहे.

■ माध्यम

सर्व प्रथम माध्यमाचा विचार केला पाहिजे की, त्या शाळेचे माध्यम कोणते? ते आपल्या पाल्याला तसेच आपल्याला स्वतःला झेपेल का? तसेच ती शाळा ज्या माध्यमाची आहे त्याच माध्यमातून तेथील संपूर्ण शैक्षणिक कामकाज चालते का? वगैरे सर्व बाबींविषयी माहिती मिळविणे आवश्यक आहे.

■ शाळेचे अंतर

ज्या शाळेत प्रवेश घ्यावयाचा आहे त्या शाळेचे घरापासूनचे अंतर किती आहे ते तपासणे आवश्यक आहे. जर अंतर जास्त असेल तर मुलांचा बराचसा वेळ जाण्यायेण्यातच जातो व विद्यार्थी येथेच दमतो. सध्या बरेच पालक स्कूलबसची सोय आहे म्हणून लांबच्या शाळेचा विचार करतात. शाळेत जाण्यासाठी एक ते दीड तास लागतो. विद्यार्थी प्रवासातच दमतो त्याचा परिणाम त्याच्या शाळेतील अध्ययनावर होतो. या ठिकाणी एक गोष्ट आवर्जून नमूद करावीशी वाटते की, मानसशास्त्रीय सिद्धांतानुसार शालेय वयातील विद्यार्थी सलग फक्त साधारण दीड तासापर्यंत एका जागी बसून अध्ययन करू शकतो आणि जर विद्यार्थी शाळेत येतानाच तासभर बसमध्ये एकाच जागी बसत असेल आणि लगेच शाळेत जाऊन वर्गात बाकावर दीड ते दोन तास (पहिल्या सुट्टीपर्यंत) बसत असेल तर म्हणजे जवळ जवळ अडीच ते तीन तास एकाच जागी बसतो. वरील सिद्धांतानुसार विचार करता त्याचे अध्ययनात किती मन लागत असेल?

■ शाळेतील शिक्षक वर्ग

हा शाळा प्रवेशाच्या वेळी विचार करण्याचा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. कारण इतर काही घटकांकडे एकवेळ Adjustment म्हणून दुर्लक्ष करता येईल. पण या घटकाकडे आजिबात दुर्लक्ष करून चालणार नाही. 'या जगाचा कधी उद्धार झालाच तर त्यामागे केवळ शिक्षक आणि शिक्षकच असेल' असे वि.स. खांडेकरांनी म्हटले आहे. या घटकाच्या संदर्भात पुढीलप्रमाणे विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

- सर्व शिक्षक पूर्ण अर्हता धारक आहेत का?
- तेथील शिक्षक त्या शाळेत किती वर्षांपासून अध्यापनाचे काम करत आहेत?

* की तेथील शिक्षक सतत बदलले जातात?
* शिक्षक अध्यापनाचे वेळी विद्यार्थ्यांबरोबर किती आणि कशा प्रकारे आंतरक्रिया साधतात? की फक्त अध्यापनाचेच काम करतात?
* विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाविषयी काही मार्गदर्शन करतात का?
* अध्यापनाचेवेळी फक्त पाठ्यपुस्तकच वापरतात, की इतरही कधी शैक्षणिक साहित्य वापरतात?
* विद्यार्थ्यांच्या एखाद्या अविकसित क्षमतेसंदर्भात पालकांशी चर्चा करतात का?
* मुलांविषयी आस्था असणारे शिक्षक आहेत का?

या गोष्टींचा साकल्याने विचार करणे आवश्यक आहे. कारण जरी शाळा सर्वार्थाने चांगली असली (फी, स्वच्छता इ.) पण जर येथील शिक्षक सतत बदलले जात असतील तर विद्यार्थ्यांच्या क्षमता विकसित होण्यावर बंधने पडतात. कारण नवीन शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या क्षमता समजेपर्यंत शैक्षणिक वर्ष संपून जाते किंवा तो शिक्षक शाळा सोडून जातो.

■ मैदान व क्रीडा साहित्य

शाळेला मोठे मैदान आहे का? तसेच सर्व विद्यार्थ्यांना पुरेल इतके खेळाचे साहित्य उपलब्ध आहे का? त्या मैदानाचा व साहित्याचा विद्यार्थ्यांसाठी खरोखरच उपयोग केला जातो का? शाळेचे काही संघ आहेत का? ते संघ बाहेर आंतरशालेय वगैरे क्रीडा स्पर्धात सहभागी होतात का? म्हणजेच मुलांच्या शारीरिक विकासाच्या बाबत विचार केला पाहिजे.

■ ग्रंथालय

सर्वात महत्त्वाचा असा घटक. आजकाल प्रवेश घेताना माझ्या पाहण्यात असा एकही पालक नाही की त्याने या घटकाचा विचार केला आहे किंवा साधी विचारपूस केली आहे. शाळेचे स्वतःचे ग्रंथालय आहे का? इतर ग्रंथालयांबरोबर शाळेने काही सहकार्य करार वगैरे केलेला आहे का? ग्रंथालयात पुरेसे बालसाहित्य, संदर्भ साहित्य उपलब्ध आहे का? ते विद्यार्थ्यांना वाचण्यास मिळते का? या गोष्टींची माहिती मिळविणे आवश्यक आहे. कारण 'वाचाल तर वाचाल' अशी गोडी मुलांमध्ये निर्माण करण्यासाठी मुलांना चांगली पुस्तकं वाचायला द्यायलाच हवीत.

■ पालक–शिक्षक संघ

जवळ जवळ सर्वच शाळेत पालक–शिक्षक संघ आहे. पण ते केवळ फीचे स्वरूप ठरविण्याकरिता दिसून येतात. याच्या माध्यमातून पालकांचा शैक्षणिक सहभाग घेणे अत्यंत आवश्यक आहे. पालकांकडे जर काही शैक्षणिक कल्पना असतील तर त्या स्वीकारून शाळेने राबविल्या पाहिजेत. तसेच पालक व शिक्षक यांच्या परस्पर आंतरक्रिया घडणे ही एक अत्यंत महत्त्वाची अशी बाब आहे. तरच विद्यार्थ्यांमधील क्षमताविकास घडून येईल. कारण या माध्यमातून पालकांना कळेल की कोणत्या क्षमता विकसित करणे आवश्यक आहे व या विकसनामध्ये आपली नेमकी भूमिका काय? बऱ्याचशा शाळांमध्ये नियम असतो की पालकांनी संबधित शिक्षकांशी (पाल्याला

शिकविणारे) परस्पर संवाद साधू नये. फक्त प्रशासनाशीच संपर्क साधवा.सांगण्याचा उद्देश एवढाची की फक्त समस्या आल्यावर पालक–शिक्षक संघ नको, तो वरीलप्रमाणे कितपत कार्यरत आहे. याचा विचार करणे अत्यावश्यक आहे.

■ शाळेतील वातावरण

शाळेतील वातावरण पूर्णपणे शैक्षणिक आहे का? तिथे इतरही काही अभ्यासेतर व अभ्यासपूरक कार्यक्रमांचे आयोजन सतत केले जाते का? यामध्ये विद्यार्थ्यांना सहभाग घेण्याची संधी दिली जाते का? की फक्त अभ्यास एके अभ्यास एवढेच चालते. व स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने फक्त तेवढ्यापुरते उपक्रम घेतले जातात? (विकासासाठी नव्हे बक्षीसवाटपासाठी)

■ शैक्षणिक सोयी

भविष्यात माध्यमिक स्तरावर, विद्यार्थ्यांना शास्त्र प्रयोगांसाठी प्रयोगशाळा समृद्ध आहेत का? त्यात पुरेसे साहित्य आहे का? सतत विद्यार्थ्यांना प्रयोग करण्याची संधी मिळते का? की फक्त परीक्षेच्या आधी एक–दोनदा व परीक्षेच्या वेळेसच? याची माहिती घेणे आवश्यक आहे.

याचबरोबर शिक्षकवर्ग आहे का? विद्यार्थ्यांच्या भाषा विकासासाठी त्यांचा उपयोग केला जातो का? अशा सर्व बाबींचा माहिती घेणे आवश्यक आहे.

■ वर्गातील विद्यार्थी संख्या

मानसशास्त्रीय आधारानुसार प्राथमिक स्तरावर एका वर्गात साधारण २५ विद्यार्थी तर माध्यमिक स्तरावर एका वर्गात साधारण ३५ ते ४० विद्यार्थी असावेत. ज्या शाळेचा आपण विचार करत आहोत त्या शाळेत एका वर्गात किती विद्यार्थी संख्या आहे? हे पाहिले पाहिजे. मर्यादित विद्यार्थी संख्या असेल तर शिक्षकांना विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष पुरविणे सोपे जाते. उलट जास्त विद्यार्थी संख्येमुळे शिक्षकांच्या विद्यार्थ्यांबरोबर आंतरक्रिया कमी प्रमाणात होतात. परिणामी शैक्षणिकदृष्ट्या अविकसित मुले तसेच मागास राहतात.

थोडक्यात शाळेत प्रवेश घेत असताना पालकांनी वरील सर्व शैक्षणिक बाबींचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. ज्या शाळेत प्रवेश घ्यावयाचा आहे. त्या शाळेत कोणी ओळखीच्या पालकांचा पाल्य शिकत असेल अशा पालकांकडून/पाल्याकडून या विषयी माहिती घेता येईल. तसेच प्रत्यक्ष त्या शाळेत जाऊन वरील बाबींची शहानिशा करता येईल. शाळा मान्यतेसारख्या विषयाची माहिती शाळेकडून न मिळाल्यास जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे याची माहिती घेता येईल. तसेच या संदर्भातील माहिती जिल्हा परिषदेच्या शिक्षण खात्यातर्फे दरवर्षी वर्तमानपत्रातून प्रसिद्ध केली जाते. अशा सर्व माध्यमातून वरील सर्व बाबींचा शहानिशा करता येईल,माहिती घेता येईल या निकषांनुसार प्रवेशासंदर्भात निर्णय घेतल्यास मग पश्चातापाची वेळ येणार नाही. मात्र हे सर्व करत असताना शाळेच्या बाहेरच्या जगातही बरंच काही शिकण्यासारखं असतं. हे मुलांच्या कसं लक्षात येईल इकडे पालकांनी आवर्जून लक्ष देणे आवश्यक आहे.

–0–

# व्यावसायिक शिक्षणः एक दृष्टिक्षेप

**डॉ. संजय पुंडलिकराव दानव**
पुणे

आज संपूर्ण जगात भारत देश एक आर्थिक आणि राजकीय महासत्ता म्हणून उदयास येत आहे. आपला भारत देश एक सार्वभौम प्रजासत्ताक गणतंत्र आहे. जे लोकांचे लोकांकडून लोकांसाठी चालविले जाते. भारताने केलेली आर्थिक आणि वैज्ञानिक प्रगती पाहून जग अवाक झालेले आहे. देशाची लोकसंख्या ११० कोटींच्या पुढे गेलेली आहे. मोठी लोकसंख्या हा अगोदर शाप मानला जायचा, ते आज वरदान ठरलेले आहे. देशासमोरील आव्हाने, गरजा, आवश्यकता, इ. बदललेल्या आहेत. जगातील सर्वात जास्त तरुण लोकसंख्या भारतात आहे आणि हे चित्र येत्या किमान २० वर्षे तरी राहणार आहे. देशाला जगात क्रमांक १ ची महासत्ता घडवायची असेल तर शिक्षणाच्या माध्यमातून, विशेषतः व्यावसायिक शिक्षण, सर्वांची उपयुक्तता वाढविणे अत्यावश्यक आहे. यासोबतच प्रत्येक व्यक्ती उत्तम आणि जबाबदार नागरिक होणे गरजेचे आहे.

**भारताची वाटचाल**

जग हे औद्योगिक क्रांती, व्यवस्थापन क्रांती, संगणक क्रांती यांना ओलांडून माहिती, दळणवळण व मनोरंजन या क्रांतीकडे वळलेले आहे. उदात्तीकरण, जागतिकीकरण आणि खाजगीकरण या तत्वांचे अवलंबन केल्यानंतर आर्थिक क्षेत्रातील देशाची आघाडी ही मुख्यतः सेवा क्षेत्रातील प्रगतीमुळे आलेली आहे. हे क्षेत्र पूर्णतः विकसित मनुष्य बळावर अवलंबून आहे. पारंपारिक क्षेत्रावरील उदा. शेती, मासेमारी इ. भर कमी होत चाललेला आहे. तरीसुद्धा या क्षेत्रावर अवलंबून असणारी लोकसंख्या फार मोठी आहे. यातील बहुतांश भाग हा अशिक्षित, कमी शिक्षित आणि कौशल्य नसलेला आहे आणि कोणतीही योजना तयार करताना याचा विचार करणे गरजेचे आहे. स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या राजकीय तसेच सामाजिक स्तरावर बरेच बदल झालेले आहेत. शिक्षण हे सर्वांसाठी उपलब्ध आहे. केंद्र सरकारने नुकताच शिक्षण हक्क कायदा मंजूर केला आहे.

या सर्वांचा विचार करता आपल्याला गुणवत्ता आणि संख्या यांचा मेळ घालणे आवश्यक आहे. 'शैक्षणिक क्षेत्राच्या माध्यमातून राष्ट्रीय संपत्तीचे निर्माण' या मूलतत्त्वाचा विसर पडता कामा नये.

## मनुष्यबळ विकास

आपले शैक्षणिक क्षेत्र सध्या पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन तसेच कौशल्यधारित इ. स्तरावर विभागले गेले आहे. प्रत्येक विद्यार्थी त्या–त्या स्तरावरून पुढे गेल्यावर तांत्रिक दृष्ट्या समर्थ आणि वैयक्तिकदृष्ट्या आत्मविश्वासी असा घडायला हवा. कुठल्याही पालकाची त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठी चिंता ही त्यांच्या पाल्याची असते. त्यामुळे आजच्या शिक्षणपद्धतीकडून पालक खूप मोठ्या अपेक्षा ठेवून आहे. जास्तीत जास्त चांगल्या ठिकाणी आपल्या पाल्याला प्रवेश देऊन त्याचे भवितव्य सुरक्षित करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. मुलांना एकदा का शाळेत महाविद्यालयात प्रवेश मिळाला म्हणजे आपली इतिकर्तव्यता झाली असा पालकांचा समज दिसून येतो. या शर्यतीत फार थोडे यशस्वी होतात. इतर जण उर्वरित यशावर समाधान पावतात. एकंदरीत असे निदर्शनास येते की बरेच पाल्य हे त्यांच्या पालकांच्या इच्छा आकांक्षा डोक्यावर घेऊन शैक्षणिक वाटचाल करीत असतात. त्यात पाल्यांच्या इच्छा आणि क्षमता या विचार घेतल्या जात नाहीत. हे चित्र पूर्व प्राथमिक पासून ते महाविद्यालयीन स्तरापर्यंत दिसून येते. शाळास्तरावर एस एस सी/सी बी एस ई/आय सी एस ई यापैकी कुठल्या अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यायचा यासंबंधी पालकांमध्ये संभ्रम आढळतो. व्यवसाय शिक्षणामध्ये अभियांत्रिकी,व्यवस्थापन यांच्याकडे जास्त ओढ दिसून येते. परंतु आपण हे लक्षात घेतले पाहिजे की कुठलेही क्षेत्र वाईट नाही. गरज आहे ती त्या क्षेत्रातील कला–कौशल्य आत्मसात करून त्याचा वापर प्रभावीपणे करण्याची. विशिष्ट ठिकाणी प्रवेश मिळविण्यासाठी पालक रात्रभर रांगेत राहतात, हे चित्र एका बाजूला दिसते तर दुसऱ्या बाजूला बऱ्याच ठिकाणी प्रवेश घ्यायला कोणीही तयार नसते. अगोदरच्या काळात काहींचे शिक्षण गुरुकुल पद्धतीत होत होते तर बहुतांशी जणांचे शिक्षण (कार्यकौशल्य पद्धतीचे) हे घरीच व्हायचे. गुरुकुल पद्धतीत गुरू त्या विद्यार्थ्यांची क्षमता पाहून शिक्षण द्यायचे.

## सध्याची प्रवेशप्रक्रिया

व्यावसायिक अभ्यासक्रमांस उदा. अभियांत्रिकी, व्यवस्थापन, औषधनिर्माण, आरेखन, इ. सध्यस्थितीत प्रचंड महत्त्व आलेले आहे. हमखास नोकरी मिळण्याचे साधन म्हणून अशा अभ्यासक्रमांकडे पाहण्यात येते. वाढत्या मनुष्यबळाची गरज शासन स्वतःच्या बळावर पूर्ण करू शकत नसल्यामुळे खाजगीकरणाचे धोरण स्वीकारण्यात आले आहे. शासनाने खाजगी संस्थांना कायम विना–अनुदान तत्त्वावर मूलभूत सुविधांच्या निकषांच्या अधीन राहून व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करण्याची परवानगी दिलेली आहे. बहुतांशी अभ्यासक्रम हे ए आय टी ई /यू जी सी या नियामक मंडळांकडून मान्यताप्राप्त असतात. त्यांची प्रवेशक्षमता आणि प्रवेशप्रक्रिया ही शासनाने निर्धारित केलेली असते. साधारणतः ८० टक्के प्रवेश केंद्रीय प्रवेश पद्धतीमार्फत केल्या जातात. तर २० टक्के प्रवेश हे महाविद्यालयीन स्तरावर केल्या जातात. या प्रवेशांसाठी विद्यार्थ्याने शैक्षणिक अर्हतेसोबत

मान्यताप्राप्त प्रवेश परीक्षा उदा. आय आय टी जे ई ई / ए आय ई ई ई / एम एच टी सी ई टी (अभियांत्रिकीकरता) आणि सी ए टी / सी एम एटी (व्यवस्थापनाकरिता) दिलेल्या असल्या पाहिजे. सध्या असे निदर्शनास दिसून येते की व्यावसायिक अभ्यासक्रमातील उपलब्ध प्रवेश हे गरजेपेक्षा जास्त आहेत. त्यामुळे जो मागेल त्याला व्यावसायिक शिक्षण उपलब्ध, अशी परिस्थिती आलेली आहे. गुणवत्ताप्राप्त तसेच शहरी भागातील महाविद्यालयातील प्रवेशासाठी झुंबड दिसते तर गुणवत्ता नसलेल्या तसेच ग्रामीण भागातील महाविद्यालयातील जागा भरल्या जात नाहीत. हे अभ्यासक्रम सर्वस्वी विना-अनुदान तत्त्वावर असल्यामुळे विद्यार्थ्यांकडून गोळा झालेल्या शुल्कावर त्यांचा आर्थिक डोलारा उभा असतो. शैक्षणिक शुल्क हे शासनाने नेमलेल्या समितीकडून त्या महाविद्यालयाने आधीच्या वर्षी केलेल्या खर्चाच्या आधारे निर्धारित केले जाते. एकूण प्रवेश क्षमतेपैकी साधारणतः ५० टक्के प्रवेश हे समाजातील कमकुवत घटकांसाठी राखीव ठेवलेले असतात. महाराष्ट्र शासनाच्या सध्याच्या धोरणानुसार सामाजिक कमकुवत घटकातील विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विशिष्ट भाग हा महाविद्यालय विद्यार्थ्यांकडून घेऊ शकत नाही, तर तो शासनाच्या ठराविक विभागांकडून घ्यायचा असतो. या प्रक्रियेमध्ये बराच वेळ जातो. याचा परिणाम महाविद्यालयांच्या आर्थिक स्थितीवर होत असल्यामुळे त्यांना नेहमीचे खर्च उदा. शिक्षकांचे पगार इ. करणे अवघड झालेले दिसत आहे. कमी झालेले प्रवेश, आस्थापनावर वाढलेला खर्च, जास्त शुल्क, त्यामुळे परत कमी होणारे प्रवेश, या चक्रात काही महाविद्यालये सापडली आहेत. जर विद्यार्थ्यांकडे काही कागदपत्रे नसतील तर ती कागदपत्रे विशिष्ट मुदतीत आणून देण्याच्या हमीपत्रावर विद्यार्थ्याला प्रवेश दिला जातो. जर त्या कागदपत्रांची पूर्तता त्या मुदतीत झाली नाही तर त्याची जबाबदारी कोणाची या विषयीचे धोरण स्पष्ट नाही. याचा त्रास संबंधित महाविद्यालयाला तसेच त्या विद्यार्थ्यालासुद्धा होतो. अशाप्रकारचे प्रश्न उत्पन्न होऊ न देण्यासाठी शासकीय स्तरावरील विभागांमध्ये समन्वय वाढणे गरजेचे आहे.

विद्यार्थ्यांना विविध प्रवेश परीक्षांना बसण्याचा ताण कमी करण्यासाठी केंद्र शासनाने अखिल भारतीय स्तरावर एकच प्रवेश परीक्षा घेण्याचे ठरविले आहे. सध्यस्थितीत विद्यार्थ्यांला बारावीच्या परीक्षसोबतच आय आय टी जे ई ई / ए आय ई ई ई / एम एच टी-सी ई टी / डी ई ई एम ई डी युनिर्व्हसिटी सी ई टी एस इत्यादी प्रवेश परीक्षांना बसावे लागते. त्यामुळे त्याच्यावर वेळ, आर्थिक आणि अभ्यासाचा ताण येतो तसेच उपलब्ध पर्यायांच्या निवडीवर मर्यादा येते. तसेच राज्य शिक्षण मंडळ आणि केंद्रीय शिक्षण मंडळ यांच्याशी संलग्न शाळांचे अभ्यासक्रम वेगवेगळे होते. यापुढे विज्ञान आणि गणित या विषयांचे अभ्यासक्रम राष्ट्रीय स्तरावर सारखेच असणार आहेत. तसेच २०१३ सालापासून राष्ट्रीय पातळीवर आय एस ई ई टी ही एकच प्रवेश परीक्षा घेण्याचे सूतोवाच केले आहे. ही परीक्षा दोन भागात असेल - आय एस ई ई टी मेन, ज्यामध्ये विद्यार्थ्यांची आकलन शक्ती, तार्किक कारणमीमांसा, सूक्ष्म विचार, इ. बाबी तपासल्या जाईल. प्रत्येक परीक्षा ही ३ तासाची असेल. यासोबतच विद्यार्थ्यांने बारावीच्या परीक्षेत मिळविलेल्या गुणांचा सुद्धा विचार प्रवेश देताना केला जाणार आहे. यासंबंधी निश्चित रुपरेषा तयार करण्यासाठी विविध स्तरावर विचारमंथन चाललेले आहे. अंतिम निर्णय येत्या दोन महिन्यात होण्याची अपेक्षा आहे. या परीक्षांच्या आधारे निरनिराळ्या संस्थांमध्ये प्रवेश दिला जाणार आहे. अशा प्रकारची पद्धती विद्यार्थ्यांच्या हिताचीच आहे.

अभियांत्रिकी स्नातकोत्तर प्रवेश भारतीय प्रौद्योगिक संस्था (आय आय टी) मार्फत घेतल्या जाणाऱ्या गेट ह्या परीक्षेतील गुणांच्या आधारे होते आणि त्या सध्यस्थितीत काही बदल संभवत नाही. मात्र या परीक्षेच्या पद्धतीमध्ये बदल होऊ शकतो.

## गुणवत्ता आणि संख्यावाढ

विविध अहवालांद्वारे असे निदर्शनास आणून दिलेले आहे की सध्या उत्तीर्ण होणाऱ्या एकूण स्नातकांपैकी २५ टक्के स्नातक हे रोजगारक्षम आहेत. इतरांजवळ फक्त पदव्या आहेत. त्यांच्या गुणवत्तेबद्दल फार मोठे प्रश्नचिन्ह उभे आहे. त्यामुळे आपणास गुणवत्तेवर भर देणे आवश्यक आहे. नाहीतर आपण फक्त पदवीधारक तयार करत राहणार.

केंद्र सरकारच्या आगामी शैक्षणिक धोरणात बाहेर देशातील विद्यापीठांना भारतात शैक्षणिक कार्य सुरू करण्यास परवानगी देण्याचे चाललेले आहे. तसे झाल्यास आपल्या विद्यार्थ्यांना भारतातच राहून परदेशी पद्धतीचे शिक्षण तुलनेने कमी खर्चात घेता येऊ शकेल. त्यामुळे शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये स्पर्धा वाढेल. जे गुणवत्तेत मागे राहतील ते या स्पर्धेतसुद्धा मागे पडतील. विद्यार्थ्यांना निवडीचे विविध पर्याय उपलब्ध होतील. व्यावसायिक अभ्यासक्रमातील उपलब्ध प्रवेश क्षमता गरजेपेक्षा जास्त असल्यामुळे यापुढे ही क्षमता वाढवू नये असे निर्देश शासनाकडून मिळत आहेत. परंतु, सर्व गुणात्मक निकष पूर्ण करणाऱ्या संस्थांना नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यापासून थांबवू नये. स्पर्धा वाढलीच तर ती अंतिमतः विद्यार्थ्यांच्या हिताचीच ठरणार आहे. कारण तोच या पद्धतीचा सर्वात मोठा लाभार्थी असणार आहे.

खूप अभ्यासक्रम जरी उपलब्ध असले तरी विद्यार्थ्याने मान्यताप्राप्त नसलेल्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला तर त्याला पुढे अडचणी येऊ शकतात. त्यामुळे कुठेही प्रवेश घेताना विद्यार्थ्यांने सजग राहायला हवे, जेणे करून त्याची फसवणूक होणार नाही.

विद्यार्थ्याने अभ्यासक्रम निवडताना स्वतःचा मानसिक कल आणि बौद्धिक क्षमता लक्षात घेऊन अभ्यासक्रमाची निवड करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अन्यथा पुढे अभ्यासक्रम न झेपल्यामुळे किंवा मनाजोगता नसल्यामुळे त्याची ओढाताण होईल आणि परिणामी शिक्षण अर्धवट राहून त्याचे भवितव्य अधांतरी राहण्याची शक्यता आहे. याबाबतीत पालकांनीसुद्धा आपल्या पाल्याचा कल लक्षात घेऊन पावले टाकणे गरजेचे आहे. थोडक्यात, आज सगळ्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध आहेत. त्यांचा फायदा सर्वांनी योग्य रीतिने करून घेतल्यास आपला भारत देश येत्या काळात निश्चितच जागतिक महासत्ता होईल यात संशय नाही.

–०–

शिक्षणवेधमधून सद्यकालीन शिक्षण प्रक्रियेबद्दल आपण वैचारिक चर्चा घडवून आणतच आहोत. परंतु प्राचीन काळात ज्यावेळी औपचारिक शिक्षण पद्धतीचा आरंभ झाला. त्यावेळची शिक्षणपद्धती कशी होती हे सांगणारी, मनोरंजक पण बोधप्रद अशी ही लेखमाला...

# प्राचीन भारतातील शिक्षणव्यवस्था

**सुनीत पोतनीस**,

प्राचीन भारतातील शिक्षण व्यवस्थेबद्दल बरीच माहिती महाभारत, गौतम बुद्ध आणि आपस्तंब यांची धर्मसूत्रे आणि मनुस्मृती या ग्रंथात सापडते. भारतात इ.स. पूर्व १२०० मध्ये प्रथम वैदिक शिक्षणास सुरुवात झाली अशी नोंद आहे. प्रथम गावातली मंदिरे, समाज मंदिरे यात या शिक्षणाला सुरूवात झाली. नंतर पुढे वेदपंडित, ऋषी यांच्या घरी शिष्याने वेदाभ्यासासाठी रहाण्याची पद्धत सुरू झाली.

गुरुच्या घरी राहून शिष्याने घरातली सर्व कामे करावीत व गुरूकडून शिक्षण घ्यावे, गावातल्या काही घरात फिरून रोज सकाळी माधुकरी मागून गुरू व शिष्यांनी माधुकरी वरच उदरनिर्वाह करावयाचा या शिक्षणपद्धतीला 'गुरुकुल पद्धत' म्हणत. मुलाने मातापित्याचे घर सोडून गुरुकडे शिक्षणाला येण्याआधी एक धार्मिक विधी करीत असत त्याला 'उपनयन' असे म्हणत.

प्राचीन भारतातल्या समाजाच्या तीन उच्च वर्गातील मुलांनाच गुरुकुलातील शिक्षणास परवानगी होती. ते तीन वर्ग म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य असे होते. या तिन्ही वर्गातील

मुलांसाठी गुरुकुलातील प्रवेशासाठी वयाची मर्यादा निरनिराळी असे. ब्राह्मणांसाठी ५ वर्षे ते १६ वर्षे, क्षत्रियांसाठी ६ वर्षे ते २२ वर्षे व वैश्यांसाठी ८ ते २४ वर्षे. शिष्याच्या शिक्षणास सुरुवात करताना प्रथम काही परंपरागत धार्मिक विधी केले जात.

गुरुकुलात प्रामुख्याने चार वेद, स्तोत्रे आणि उपनिषिदे यांचा अभ्यास व पठण करून घेत. हा सर्व अभ्यास गुरू तोंडी सांगून शिष्याकडून पाठांतर करुन घेत असत. पुढे अनेक वर्षांनी अक्षरलिपीचा शोध लागल्यावर ताडाची पाने किंवा झाडाच्या सालींवर लिहण्याची प्रथा सुरू झाली. गुरुकुलातील विद्यार्थी हे श्रीमंत किंवा गरीब घरातले असा भेदभाव न करता सर्वांनी सारखे राहण्याची पद्धत होती. साधारणतः इ.स. पूर्व तिसऱ्या शतकात वेदाभ्यास बरोबर संस्कृतभाषा व व्याकरण, काव्य, साहित्य यांचाही अभ्यास सुरू झाला. शिष्यांची संख्या वाढल्यावर गुरुकुलांचे रूपांतर पाठशाळेत झाले. त्याच सुमारास बौद्ध धर्म व जैनधर्मांचा प्रसार होऊन या दोन धर्मांचे शिक्षण देण्याचीही व्यवस्था झाली. पाठशाळांमध्ये त्या त्या विषयांचे तज्ज्ञ विद्वान असत व ते शिक्षकाचे काम करीत. पाठशाळांमध्ये दोन प्रकारचे शिक्षक असत. आचार्य आणि उपाध्याय. आचार्य हे वैदिक व इतर शिक्षण देण्याशिवाय शिष्याचा उपनयन विधीही करून घेत. उपाध्याय हे आचार्यानं दिलेल्या ज्ञानाच्या रोजच्या जीवनात कसा उपयोग करून घ्यावयाचा ते शिकवीत असत.

अपस्तंब यांच्या धर्मसूत्रात गुरु–शिष्य संदर्भात गुरूच्या मर्यादाही सांगितल्या आहेत. त्यात गुरूने शिष्याला गुरूच्या घरची खाजगी कामे करावयास सांगू नयेत, शिष्याला त्याच्या चुकीमुळे करावयाच्या शिक्षा कशा असाव्यात त्याचे विवेचन आहे. गुरूने शिष्याशी उद्धटपणाचे वर्तन करू नये. स्वतःची कर्तव्ये पालन न करता चुकीच्या मार्गाने जाणाऱ्या गुरूची कानउघडणी, शिष्यांनी आपले पालक अथवा नगरातील ज्येष्ठ लोकांकरवी कशी करावी याचेही विवेचन केले आहे. या धर्मसूत्रांमध्ये शिष्यांनी अभ्यास व पठण केव्हा करू नये हे ही सांगितले आहे. अतीवृष्टी, वादळे, पूर, शेजारपाजारी दुःखद प्रसंग घडला असता, जवळच गोंगाट वा गुरूंचे ओरडणे चालू असताना पठण करू नये असे सांगितले आहे. विद्यार्थ्याने विद्याभ्यास करतानाच्या काळात संपूर्ण ब्रम्हचर्य पाळावयास हवे. स्वतःचे कर्तव्य, शिस्त ह्यांचे कठोर पालन करून सर्व प्रकारचे उपभोग टाळावेत असे नियम ह्या धर्मसूत्रात सांगितले आहेत.

शिक्षण पूर्ण झाल्यावर गुरुकुलातून सामवर्तनात शिष्य घरी परतत असे. भारतीय संस्कृती व तत्त्वज्ञान हजारो वर्षे टिकण्याचे श्रेय इ.स. पूर्व १२०० पासून चालत आलेली गुरुकुल शिक्षण पद्धती आणि त्या काळातले वैदिक आणि बौद्ध धार्मिक शिक्षण यांनाच आहे. बौद्ध आणि जैन धर्मप्रसाराने प्राचीन काळात समाजातल्या सर्व वर्गांना शिक्षण खुले झाले आणि शिक्षणाचा प्रसार झाला.

–0–

**'कलेला' जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. कला ही जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करणारी व पूर्णत्वाकडे नेणारी प्रक्रिया आहे. जीवनाकडे पाहण्याचा एक नवीन दृष्टिकोन कलेमुळे प्राप्त होतो. प्रत्येक मानव हा वैशिष्ट्यपूर्ण असून त्याच्या ठिकाणी सृजनशीलता आहे हाच सर्व कलांचा मूलभूत सिद्धांत आहे. नवनिर्मिती व सौंदर्योपासना यामुळे व्यक्तीजीवनाला दिव्यत्व प्राप्त होते. कलेच्या वैशिष्ट्यांसह कलाशिक्षणाचे महत्त्व सांगणारे कला शिक्षणाची तोंडओळख करून देणारे नवे सदर.**

**– संपादक**

# कला शिक्षणाचे विविध आयाम

**लक्ष्मीकांत चंद्रकांत मुळे,** जालना.

'कलेला' जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. कला ही जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करणारी व पूर्णत्वाकडे नेणारी प्रक्रिया आहे. जीवनाकडे पाहण्याचा एक नवीन दृष्टिकोन कलेमुळे प्राप्त होतो. प्रत्येक मानव हा वैशिष्ट्यपूर्ण असून त्याच्या ठिकाणी सृजनशीलता आहे हाच सर्व कलांचा मूलभूत सिद्धांत आहे. नवनिर्मिती व सौंदर्योपासना यामुळे व्यक्तीजीवनाला दिव्यत्व प्राप्त होते.कलेच्या वैशिष्ट्यांसह कलाशिक्षणाचे महत्त्व सांगणारे,कला शिक्षणाची तोंडओळख करून देणारे नवे सदर

प्रत्येक व्यक्तीमध्ये सुप्त स्वरूपात एक कलावंत दडलेला असतो. त्या कलावंताला

कलावंत आणि रसिक अशा स्वरूपात जागृत करणे किंवा तसे घडविणे हा उद्देश समोर ठेवून शालेय स्तरावर कला विषय शिकवला जातो. केवळ कलाकार घडविणे हा उद्देश नसून 'कलेची दृष्टी' असणारा विद्यार्थी तयार झाला पाहिजे हे उद्दिष्ट कला शिक्षणात महत्त्वाचे आहे. कलेल्या अविष्कारातून माणसांच्या भावभावनांचे आणि विचारांचे दर्शन घडते. आपल्या कल्पना, विचार, भावना लोकांसमोर सुंदररीतिने प्रस्तुत करण्याची संधी कलांच्या माध्यमातून मिळते. कलेचे शिक्षण घेण्याचे मानसिक, भावनिक विकासाची संधी प्राप्त होते.

अनेक वर्ष पारंपारिक अभ्यासक्रमाचा स्वीकार करून कलाक्षेत्रातल्या प्रचलित शिक्षण पद्धती, ठराविक घटक, ठराविक साचेबंद अभ्यासक्रम आपल्याकडे राबविण्यात आला. कला अध्यापन करताना नुसते 'चित्र काढा', चित्र रंगवा, वा! छान! एवढ्यावर भागणारे नाही तर हे कालबाह्य झाले आहे. त्या ऐवजी 'चला करूया', 'आपण रंगवू या' काय निर्माण झाले? कसे निर्माण झाले? आणि त्यात विविधता कुठली आढळली? याचे मनन, चिंतन, चर्चा करून वैयक्तिक, सामाजिक, राष्ट्रीय उपयुक्तता तपासून नवीन अभ्यासक्रमाची रचना व उद्दिष्टे ठरविली आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ – ब १९८८ मध्ये कला शिक्षणाला महत्त्वाचे स्थान दिले गेले. नव्या अभ्यासक्रमात मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने कला या विषयाला महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. कला या संज्ञेत चित्र–शिल्प, नृत्य–नाट्य, गायन–वादन या कलांचा समावेश करून या विविध कला एकात्मकतेने शिकविल्या जाव्यात असा दृष्टिकोन स्वीकारण्यात आला आहे. मुलांच्या बौद्धिक, भावनिक, शारीरिक व सामाजिक विकासाच्या दृष्टीने अध्यापनास सोयीस्कर असा अभ्यासक्रम आखला आहे. कृती प्रधानता आणि बालकेंद्रित शिक्षण प्रक्रिया ही नवीन अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये आहेत.

अध्यापनाच्या दृष्टीने सोयीस्कर होतील असे तीन गट प्राथमिक स्तरावर खालीलप्रमाणे करण्यात आले आहेत व अभ्यासक्रमाची आखणी त्यानुसार केली आहे.

गट १ ला – इयत्ता १ ते २ (वयोमर्यादा ६ ते ७ वर्षे) प्राथमिक

गट २ रा – इयत्ता ३ ते ५ (वयोमर्यादा ८ ते १० वर्षे) प्राथमिक

गट ३ रा – इयत्ता ६ ते ८ (वयोमर्यादा ११ ते १३ वर्षे) उच्च प्राथमिक

इयत्ता १ ते ८ प्राथमिक स्तरावर कला विषय सक्तीचा करण्यात आला आहे व इयत्ता ९ ते १० माध्यमिक साठी ऐच्छिक ठेवण्यात आला आहे.

कला विषयाची सर्व सामान्य अशी काही उद्दिष्ट्ये आहेत.



. कलेची आवड निर्माण करणे व उत्तरोत्तर ती वाढीस लावणे.

. बालकांना मुक्त अभिव्यक्तीचा आनंद उपभोगण्याची संधी उपलब्ध करून देणे.

. बालकांची संवेदनक्षमता जोपासणे व विकसित करणे.

. बालकांच्या सुप्त कलागुणांना आविष्काराची संधी उपलब्ध करून देणे व आत्मविश्वास वृद्धिंगत करणे.

. कल्पकता व शोधककृती या प्रवृत्तींच्या विकासाला संधी देणे.

. बालकात सामूहिक जीवनाला अनुकूल प्रवृत्ती जागृत करणे.

. व्यक्ती-विकासाच्या दृष्टीने आत्माविष्काराद्वारे मानसिक आरोग्य प्राप्त करून घेण्यास बालकांना मदत करणे.

कला शिक्षणाचे महत्त्व आणि आवश्यकता यानुसार ठरविलेल्या कला अभ्याक्रमाला जवळपास दोन तप म्हणजेच २४ वर्षे झाली आहेत. यथायोग्य नावीन्यपूर्ण अशा या उद्दिष्टांची पूर्तता विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनात अभावानेच पहावयास मिळते आहे. विद्यार्थ्यांचे आत्महत्येचे वाढलेले प्रमाण यासाठी बोलके आहे. या साऱ्या कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न करताना लक्षात येते की शालेय स्तरावर होणारी कला शिक्षणाची हेळसांड बहुअंशी कारणीभूत असावी. यास शासन स्तराचे कला शिक्षणाकडे असलेले दुर्लक्ष हे ही कारण आहे.

शाळामध्ये इयत्ता १ ते ४ कला शिक्षकाची नियुक्ती करण्यात येत नाही. इयत्ता ५ ते ८ साठी चित्रकला शिक्षकाची नियुक्ती करण्यात येते. परंतु संगीत शिक्षकाची नियुक्ती फारच थोड्या शाळामध्ये असते. परिणाम स्वरूप चित्रकला शिक्षक आपल्या अध्यापनात चित्रालाच महत्त्व देतो व गायन-वादन, नृत्य-नाट्य या कलाकडे दुर्लक्ष करतो. सर्वच विद्यार्थी चित्रकलेत आवड असणार असत नाहीत. गायन-वादन, नृत्य-नाट्याची आवड असणारे विद्यार्थी मार्गदर्शनांपासून वंचित राहतात त्यामुळे एकात्मिक कला शिक्षणाचा हेतू साध्य होत नाही.

शालेय जीवनात कलेच्या क्षेत्रात रंग-रेषा, आकार, स्वर, ताल, लय, शारीरिक मुद्रा, अभिनय याचा योग्य परिचय प्रत्यक्षात अल्प प्रमाणत होतो. सांस्कृतिक कार्यक्रम, कलास्पर्धा, यात मर्यादित स्वरूपात हेतू पूर्ती आहे. शहरी भागात व ग्रामीण भागात कला शिक्षणाचे वास्तव वेगवेगळे आहे. चित्रकला शिक्षक व संगीत शिक्षक एक संघ कलाअध्यापन करतील तर निश्चितच विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीप्रमाणे कला विषयात गती प्राप्त होईल.

शिक्षणाधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात अनेक नवीन शाळा निर्माण झाल्या आहेत. शाळांचे उदंड पीक आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील एक शिक्षणाधिकारी सर्व स्तरावर लक्ष पुरवू शकत नाहीत परिणामी चित्रकला ग्रेड परीक्षेला किती विद्यार्थी बसले किती पास झाले एवढ्या पुरतेच कला शिक्षणाकडे पाहिले जाते. प्रत्येक जिल्ह्यात क्रीडा अधिकारी कार्यरत असतात त्याप्रमाणे कला अधिकाऱ्यांची नेमणूक केल्यास निश्चितच काही प्रमाणात कला शिक्षणाचा दर्जा उंचावेल व कला उद्दिष्ट्ये साध्य होण्यास मदत मिळेल.

कला क्षेत्राची उद्दिष्ट्ये व संकल्पना खूप चांगल्या असल्या तरी प्रत्यक्षात होणारे शालेय स्तरावरील काम शोचनीय, दयनीय असेच म्हणावे लागेल. काही ठराविक शाळेत म्हणजेच बोटावर मोजता येतील अशा शाळामध्ये शैक्षणिक कला, साधने उपलब्ध होत असतील. परंतु बऱ्याच अंशी शालेय स्तरावर कला विषयीचा व्यापक दृष्टिकोन अपेक्षितच आहे. कला शिक्षकाला अध्यापनासाठी काही पूरक गोष्टींची आवश्यकता असते. उदा. योग्य तासिका देणे. कला विषयाच्या तासिका कमी करून इतर गणित, इंग्रजी विषयाला दिल्या जातात. तसेच स्वतंत्र कला वर्ग नसणे, कला साहित्य उपलब्ध करून न देणे. कला शिक्षकांना इतर कार्यालयीन कामे अथवा इतर विषय शिकवण्यास देणे, विद्यार्थ्यांकडे आवश्यक कला साहित्य नसणे, वर्गातील भरमसाठ विद्यार्थी संस्था त्यामुळे वैयक्तिक लक्ष देण्यास शिक्षकास वेळ मिळत नाही. संस्थाचालक व मुख्याध्यापक कला शिक्षणाच्या बाबतीत दृष्टी धोरण ठेवतात. शालेय तपासणी, कार्यक्रम, समारंभ असल्यास कला शिक्षकाकडून कामाची अपेक्षा करतात व इतर वेळी त्यांच्या दृष्टिकोन बदलतो. कला शिक्षकाला शिकविण्याचे काही काम नसते ही भावना बऱ्याच शाळामध्ये पहावयास मिळते.

पालकांचाही फारसा प्रतिसाद कला शिक्षणासाठी मिळत नाही. फारच थोडे सुजाण पालक असे असतात की, ज्यांना या विषयाचे गांभीर्य कळलेले असते. कलेविषयी असलेले गैरसमज व अगोदरच करून घेतलेले पूर्वग्रह यामुळे बरेच पालक संभ्रमात असतात. कलेमुळे काय पोट भरणार आहे का? सारखे चित्र काय काढतो? गणित, इंग्रजीचा अभ्यास कर असा धोशा पालक मुलांच्या मागे लावतात. परिणामी मुले हिरमुसली होऊन निमुटपणे आवडीच्या विषय सोडून घोकंपट्टी, पुस्तकी अभ्यास करतात व परीक्षा झाली की विसरून जातात. स्पर्धा आणि टक्केवारी यात आडकलेला बालक व पालक यातून कधी बाहेर येणार हे सांगणे अवघड आहे. दूरदर्शनच्या प्रभावामुळे मुलांची कृतीशीलता कमी झाली आहे. शारीरिक स्वास्थ घटत चालले आहे.

कला अध्यापकांच्याही काही बाबी आपल्या विषयाला कमीपणा आणण्याला कारणीभूत आहेत. कला शिक्षकाने



स्वतःला मोठा कलाकार न समजता आपण कला शिक्षक आहोत हे लक्षात घेतले पाहिजे. विद्यार्थ्यांना चित्र काढून दाखविणे, त्यांच्याकडून वा इतरांकडून आपण फार ग्रेट आहात. मोठे कलाकार आहात अशा कौतुकात धन्यता न मानता. कृतीशील राहून विद्यार्थ्यांकडून काम करून घ्यावे.

कला शिक्षक ग्रेट असलाच पाहिजे तो कलाकार ही असावयास हवा पण दुसऱ्यांनी टाळ्या वाजवण्यात त्याने धन्यता मानू नये. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन त्यांचे जाहीर कौतुक केले पाहिजे. शाबासकीची थापच विद्यार्थ्यांचे जीवन उजळून टाकते. आपल्या विषयाचे ज्ञान कला शिक्षकाने अद्ययावत ठेवले पाहिजे. कला विषयाशी संबंधित कार्यशाळा, चर्चासत्रे, शिबीरे, प्रशिक्षण यात सहभाग घेता पाहिजे. बहुअंशी कला शिक्षकाचे स्वतःच्या वर्तनाकडे दुर्लक्ष असते. मी कलाकार आहे, मी कसेही वागले तरी चालते अशी बेफिकीर मनोवृत्ती, स्वच्छंदीपणा शालेय स्तरावर कला शिक्षक व कला विषयाची अपेक्षा होण्यास कारणीभूत ठरतो. आत्मविश्वास हरवलेला कला शिक्षक कला शिक्षणात धोंड ठरू शकतो.

आजच्या यंत्रभूमीत सभ्यतेत मनुष्याला जगताना तीव्रतम अशा संघर्षाला सामोरे जावे लागत आहे. यंत्रयुगाच्या प्रभावामुळे वैयक्तिक भावनात्मक जीवन संपुष्टात येत आहे. माणूस यंत्रवत होत चालला आहे. आजच्या काळात माणसाला भावना आणि व्यवहार यांची सांगड घालून परिस्थितीशी जुळवून घेताना निर्माण होणाऱ्या ताणातून जीवन कलह तीव्र झाला आहे. त्याच्या रुक्ष, वैफल्यग्रस्त जीवनात कला हेच आश्रयस्थान आहे.

संपन्न अशी भारतीय सांस्कृतिक परंपरा आणि आजचे कला शिक्षण यातील दरी साधली जाण्याची आवश्यकता आहे. तंत्रज्ञानात मग्न झालेल्या नवीन पिढीला भारतीय इतिहास व संस्कृतीच्या मुळापासून वेगळे होता येणार नाही. विद्यार्थ्यांमध्ये वाढत चाललेला असंस्कृतपणा, अमानुषता, अलिप्तता काळजीचा विषय झाला आहे. यावर उपाय म्हणून त्यांची सौंदर्यबुध्दी संवेदनशीलता आणि कलास्वाद क्षमता विकसित करून विद्यार्थी जीवनातच व्यक्तिमत्व फुलवावे लागणार आहे. कला शिक्षणाच्या उद्दिष्टांची परिपूर्ती जागरुकपणे करण्याची आवश्यकता आहे.

-0-

**वृत्त विशेष**



# डॉ. राम ताकवले यांचा सत्कार समारंभ

डॉ. राम ताकवले यांचा सत्कार समारंभ

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राम ताकवले यांच्या ८० व्या वाढदिवसाचे औचित्य साधून महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या (एमकेसीएल) वतीने केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांच्या हस्ते त्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. डॉ. ताकवले यांच्या लेखाच्या आणि भाषणाच्या संग्रहाचे पवार यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

'ज्ञानामुळेच भारतातील गरिबीची समस्या सोडवता येईल. आधुनिक ज्ञानाचा वापर केल्यामुळे शेती आणि पिकांच्या पद्धतीत बदल होईल आणि अन्नधान्याच्या साठ्यामुळेच

भारतात समृद्धी येऊ शकेल' असे मत श्री पवार यांनी याप्रसंगी मांडले 'समाजातील प्रश्न सोडवण्यासाठी तंत्रज्ञान, शिक्षणाचा वापर झाल्यास त्याचा अधिकाधिक स्वीकार होतो असा अनुभव आहे. त्यासाठी दर्जेदार शिक्षणाचा प्रसार व्हायला पाहिजे', असेही ते म्हणाले. यावेळी विधानसभेचे अध्यक्ष दिलीप वळसे पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री राजेश टोपे, ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य, ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर आणि एमकेसीएलचे व्यवस्थापकीय संचालक विवेक सावंत उपस्थित होते.

'शिक्षणातून दारिद्र्यनिर्मूलनाचा विचार मांडणारे ताकवले हे पहिजे शिक्षणतज्ज्ञ आहेत. समाज आणि शिक्षणात आज जी मोठी दरी निर्माण झाली आहे ती भरून येण्यासाठी डॉ. ताकवले यांच्या विचारांचा चांगलाच उपयोग होऊ शकेल', असे मत भाई वैद्य यांनी मांडले. 'एमकेसीएल' यशस्वी ठरण्यामागे डॉ. ताकवले यांच्या विचारांची प्रेरणा होती', असे वळसे पाटील यांनी सांगितले.

'नवे जग निर्माण करणाऱ्या संगणकाचे ज्ञान अत्यावश्यक असून ते सर्वत्र पोहचले पाहिजे', डॉ. ताकवले शैक्षणिक क्षेत्रातील 'महर्षी' असल्याचे डॉ. भटकर म्हणाले.

प्रा. ताकवले आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, 'शिक्षणातून मूल्यनिर्मिती बरोबरच संपत्तीनिर्मितीही व्हायला हवी. शिक्षण आणि विकास यांचा संबंध लावला तरच शिक्षणाचा खरा हेतू साध्य होऊ शकेल त्यादृष्टीने शिक्षण पद्धतीत आवश्यक बदल होणे गरजेचे आहे . 'एमकेसीएल' हे यादृष्टीने एक आदर्श प्रारुप आहे. जीवनकेंद्री, समाजकेंद्री ही शिक्षण हेच यापुढील काळाची गरज राहणार आहे'.

विवेक सावंत यांनी याप्रसंगी प्रास्ताविक केले व आभार मानले.

पुढारलेले देश पुढारलेले का राहातात व मागासलेले देश लवकर का पुढे येत नाहीत हा प्रश्न अनेक वेळा पडतो. त्याचे उत्तर अगदी साधे आहे. सर्वांगिण विचारमंथनातून योग्य योजना निर्माण केली व ती अमलात चटकन येऊ शकली तर तो देश प्रगतीपथावरय राहतो. ज्यावेळी धोरणे व कार्यक्रम राबवण्यात वर्षानुवर्षे जातात, फार काय दशके लागतात, कित्येकदा ते कार्यक्रम बासनात बांधून ठेवले जातात त्यावेळी देश मागासलेले राहतात. आमच्या देशात अलौकिक बुद्धिमत्ता आहे, कल्पना आणि योजना मांडण्याचे मोठे सामर्थ्य आहे. परंतु चिकाटीने आणि नेटाने त्या अमलात आणण्याची क्षमता नाही. त्यामुळेच आपण मागे पडतो आहोत.

**– डॉ. राम ताकवले**



## विश्ववृत्त

### ■ भारतीय वैज्ञानिकांचा सन्मान

ब्रिटनच्या प्रतिष्ठीत रॉयल सोसायटीच्या फेलोशिपसाठी बंगळूरमधील जीवशास्त्राचे संशोधक कृष्णस्वामी विजय राघवन यांच्यासह पाच वैज्ञानिकांची निवड करण्यात आली आहे. ब्रिस्टल विद्यापीठाचे वीरेंद्रसिंह अग्रवाल, केंब्रीज विद्यापीठाचे शंकर सुब्रह्मण्यम, लंडनच्या इंपिरियल कॉलेजचे प्राध्यापक तेजिंदरसिंह विर्दी, कॉलिफोर्निया विद्यापीठाचे प्राध्यापक चंद्रशेखर भालचंद्र खरे आणि टेक्सास विद्यापीठाचे मुथुकुमारी विद्यासागर अशी त्यांची नावे आहेत.

रॉयल सोसायटीचे अध्यक्ष सर पॉल नर्स यांनी याविषयी बोलताना सांगितले की, 'रॉयल सोसायटीच्या फेलोशिपसाठी निवडले गेलेले वैज्ञानिक हे जगातील सर्वश्रेष्ठ संशोधकांपैकी एक आहेत. ते न्यूटन, डार्विन आणि आइनस्टाइन सारख्या दिग्गजांच्या पावलांवर चालत आहेत'. रॉयल सोसायटी सारख्या प्रतिष्ठित फेलोशिप मिळवणारे संशोधक हे निश्चितच अभिनंदनास पात्र आहेत.

### ■ दिलासादायक अहवाल

जगभरातील मुलांविषयीच्या प्रगतीचा युनिसेफचा 'सेव्ह द चिल्ड्रेन' हा अहवाल नुकताच प्रकाशित झाला. त्यामध्ये संपूर्ण जगाला दिलासा दिला आहे. जगभरातील पाच वर्षांपर्यंतच्या मुलांच्या मृत्युदरात घट झाली असून १९९० च्या दशकाची तुलना करता आता दर वर्षी ४० लाख मुले अधिक जगतात, असे या अहवालात म्हटले आहे. १९९० च्या तुलनेत २००८ मध्ये कुपोषणाचे प्रमाण प्रचंड घटले आहे. १३१ देशांमध्ये धनुर्वात, डिप्थेरिया यासारख्या रोगांपासून मुलांचा वाचवण्यासाठी चांगल्या आरोग्य सेवांची उपलब्धता आहे, असे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. परिणामी या रोगांमुळे होणाऱ्या मृत्यूदरात एक चतुर्थांश घट झाली आहे. मुलांच्या आरोग्याविषयी जागरुकता, आर्थिक विकास आणि चांगले प्रशासकीय धोरण आणि त्याची अंमलबजावणी बालमृत्यूदर कमी होण्यामागाची कारणे आहेत असे या अहवालातून दिसून येते.

आरोग्याइतकीच शिक्षणविषयही सजगता झाल्याचे या अहवालातून दिसून येते. २००९ च्या दशकात ५ कोटी ६० लाख मुले शाळेत जात असून सहारा आणि आफ्रिकेतील मुलांना सगळ्यात जास्त आर्थिक मदत मिळाल्याने त्यांचा विकास चांगला झाला आहे. असेही या अहवालातून दिसून येते. सजगता, शासनाचा सहभाग आणि आर्थिक बाबी या मुलांच्या प्रगतीस कारणीभूत असल्याचे या अहवालातून जाणवते.

## राष्ट्रवृत्त

### ■ व्यंगचित्राने वादंग

चित्रकाराच्या रेषांमुळे; त्याच्या कलाकृतीमुळे समाजात तरंग उठणे हे काही नवे नाही. त्यातही व्यंगचित्रांचे विश्व निराळेच! नुकतेच एका व्यंगचित्राच्या रेषांमुळे राज्यसभेत अभूतपूर्व वादाचा प्रसंग ओढवला.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ख्यातनाम व्यंगचित्रकार पद्मविभूषण शंकर पिल्लई यांनी काढलेल्या व्यंगचित्र पाठ्यपुस्तकात समावेश केल्याने राज्यसभेत 'बसप'चे खासदार संतप्त झाले व त्यांनी तीव्र निषेध नोंदवला. दिल्लीच्या 'नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल ट्रेनिंग अॅण्ड रिसर्च'च्या (एनसीईआरटी) राज्यशास्त्र विषयाच्या इ. ११ वीच्या पाठ्यपुस्तकात प्रस्तुत व्यंगचित्राचा समावेश करण्यात आला आहे. वास्तविक २००६ मध्येच हा समावेश केला होता व त्यात डॉ. आंबेडकर, पं. नेहरू व महात्मा गांधी यांची व्यंगचित्रेही आहेत. या पाठ्यपुस्तकाच्या सल्लागारपदी पुण्याचे प्रा. सुहास पळशीकर आणि दिल्लीचे योगेंद्र यादव आहेत. पाठ्यपुस्तकाच्या संदर्भातील संबंधित व्यक्तींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी केली गेली. त्यानुसार नंतर योगेंद्र यादव आणि सुहास पळशीकर यांनी आपला राजीनामा सादर केला.

पाठ्यपुस्तकातील केवळ धडा न वगळता दोषींवर गुन्हेगारी खटले त्वरीत भरावेत अशी मागणी 'बसप' नेत्या मायावती यांनी केली आहे. दरम्यान मनुष्यबळ विकासमंत्री कपिल सिब्बल यांनी पुस्तकाचे वितरण थांबविण्याचे आदेश दिले व पुस्तकातील मजकूरही तपासण्याच्या सूचना दिल्या आहेत.

### ■ नववीपासून व्यावसायिक अभ्यासक्रम

शाळेतील अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर नेमक्या कोणत्या क्षेत्रात प्रवेश करायचा, पुढे कोणत्या उच्च शिक्षणाच्या वाटा उपलब्ध आहेत. या सगळ्याची माहिती मुलांना आधीपासून असणे आता गरजेचे झाले आहे. त्या दृष्टिकोनातूनच इयत्ता नववीपासून व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करण्याचे केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री कपिल सिब्बल यांनी जाहीर केले. 'शिक्षणाबाबतचे सर्व निर्णय जरी केंद्रसरकार घेत नसले तरी उत्तम शैक्षणिक वातावरणासाठी ते कायमच प्रयत्नशील असेल, असे सिब्बल यांनी सांगितले.

शालेय जीवनातच व्यावसायिक अभ्यासक्रमाची ओळख विद्यार्थ्यांना करून दिल्यास पुढील करीअर निवडण्याबाबत मार्गदर्शन मिळू शकेल ह्या हेतूने हा निर्णय घेण्यात आला. अभ्यासक्रमाचा आराखडा अद्याप ठरलेला नसला तरी त्याबाबतचे काम लवकरच चालू होईल, असे त्यांनी सांगितले.

### ■ शैक्षणिक अधोगती

गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा विचार करताना विद्यार्थ्यांना दिला जाणारा आशय, त्यांना शिकवणारे, त्यांचे मार्गदर्शक,शिक्षक आणि अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तक या सगळ्याचा मुलांना केंद्रस्थानी ठेवून विचार व्हायला हवा. आजच्या शिक्षणक्षेत्रातल्या काही घटना पाहता तो विचार किती प्रमाणात होतो हा खरोखर प्रश्नच आहे.

उत्तर प्रदेशातील काही शाळांमध्ये जी पाठ्यपुस्तके वितरित केली गेली त्यामधील आशयातून त्यांना नेमके काय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवायचे ते आकलना पलीकडचे आहे. 'ब से बम' आणि 'च से चाकू' अशी अक्षर ओळख करुन देणारे धडे मुलांच्या पाठ्यपुस्तकात आहेत. चाकू, छुरी, बाँब अशा हिंसक उदाहरणांमधून हिंदी भाषेतील वर्णमाला शिकवली जात आहे. पाठ्यपुस्तकाच्या

आदर्श निकषांवरील कोणताही विचार केल्याचे आढळत नाही. उत्तर प्रदेश मंडळ आणि सीबीएसई शाळांच्या अभ्यासक्रमातील या पाठ्यपुस्तकांचा तेथील पालकांनीही विरोध केला आहे. पाठ्यपुस्तकात ' मुद्रित दोष' असणारे बरेच शब्द आहेत, नैतिक शिक्षणाच्या पुस्तकात सगळीकडे भारताच्या राष्ट्रध्वजाची रंगसंगती उलट्या क्रमाने दिली आहे अशा ठळक चुकांसकट पाठ्यपुस्तके मुलांच्या हातात दिल्यावर कोणत्या प्रकारच्या मूल्यांची अपेक्षा मुलांकडून करायची? 'सीबीएसई' सारख्या व्यापक, केंद्रीय पातळीवरील शिक्षण व्यवस्थेकडून अशा गंभीर चुका होणे हेच मुळात धक्कादायक आणि अनाकलनीय आहे. एकीकडे मुलांच्या पाठ्यपुस्तकांची ही स्थिती आहे तर दुसरीकडे पश्चिम बंगालमधील गोपीवल्लभपूर येथील अकरावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांनाच खोलीत कोंडून टाकण्याची घटना घडली.

मिदनापूर जिल्ह्यातील गोपीवल्लभपूर गावातील नयाबसन जनकल्याण विद्यापीठातील अकरावीचे ९0 विद्यार्थी नापास झाले. नापास विद्यार्थ्यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी शाळा समितीने बैठक घेतली, ज्यात विद्यार्थी प्रतिनिधीही उपस्थित होते. बारावीत न घातल्याने व नापास विद्यार्थ्यांच्याबाबत काही निर्णय न झाल्याने विद्यार्थ्यांनी शिक्षकांनाच बैठकीच्या खोलीत कोंडून ठेवले. एकूण ५२ जणांना खोलीत कोंडून ठेवले व विद्यार्थ्यांनी बाहेर गराडा घालून पहारा दिला. जास्त विद्यार्थी संख्येमुळे पोलिसांच्या कारवाईसही टाळाटाळ झाली.

शिक्षणाच्या क्षेत्रात चाललेल्या या अधोगतीची कारणे शोधून त्यावर गांभीर्याने कृती होणे खरंतर गरजेचे झाले आहे.

## ■ विद्यार्थ्यांमध्ये करिअर निवडीबाबत संदिग्धता

शालेय शिक्षणाच्या शेवटाच्या टप्प्यावर असताना विद्यार्थ्यांना आपण पुढील काळात कोणते क्षेत्र निवडायचे, कोणते काम करायचे हे ठरवायचे असते. या करिअर निवडीवर पुढची सगळी घडी व्यवस्थित बसते.याचसंदर्भात एक सर्वेक्षण केले गेले.

जमशेदपूर येथील कौन्सिल ऑफ सायंटिफिक ॲण्ड इंडस्ट्रियल रिसर्चच्या (CSIR) राष्ट्रीय धातुशुद्धीकरण प्रयोगशाळेने (National Metallurgical Laboratory) शालेय विद्यार्थ्यांच्या करिअर निवडीबाबत सर्वेक्षण केले. NML चे वरिष्ठ शास्त्रज्ञ एन. जी. गोस्वामी यांच्याबरोबर तीन सदस्यांचा या कामात सहभाग होता. एकूण ४४ शाळांमधील इयत्ता ८ वी, १० वी व ११ वी च्या ४००० विद्यार्थ्यांचा यामध्ये समावेश होता.

वय वर्षे १३ ते १९ च्या दरम्यान असणाऱ्या मुलांमध्ये करिअर निवडण्याबाबत काय विचार आहेत हे पाहण्याकरिता हे सर्वेक्षण हाती घेतले होते. त्यामध्ये ४० टक्के मुलांमध्ये आपण पुढे कोणते क्षेत्र निवडायचे याबाबत स्पष्टता नाही असे आढळले. नेमका कोणता मार्ग निवडायचा याबाबत त्यांच्या मनात गोंधळ आहे.

मुलांनी कोणत्या क्षेत्रात प्रवेश करावा, त्यांचा कल काय दर्शवतो याविषयी मुलांना कोणाची मदत होते, याबद्दल विद्यार्थी, शाळेतील शिक्षक, पालक ह्यांच्याबरोबर चर्चा करून माहिती घेतली गेली. ४०% मुलांमध्ये करिअरच्या संकल्पनेबाबत स्पष्टता नाही आणि त्याबाबत प्रोत्साहन व मार्गदर्शनाचीही कमतरता आहे असे दिसते. सर्वेक्षणात समाविष्ट काही निवडक शाळांमधील विद्यार्थ्यांना NML मध्ये धातुशुद्धीकरण कौशल्य शिकण्याबाबत प्रेरणा दिली; त्याबाबतची मूलभूत माहिती देण्यात आली. ह्या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

### ■ मराठी अभ्यास परिषद आयोजित परिसंवाद

महाराष्ट्र दिन आणि मराठी अभ्यास परिषदेचा वर्धापन दिन याचे औचित्य साधून 'मराठी भाषा अभिजात आहे काय?' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

या परिसंवादात प्रा.हरि नरके, डॉ.कल्याण काळे, ब्रम्हानंद देशपांडे आणि प्रा. प्र.ना.परांजपे यांचा सहभाग होता. या परिसंवादाचे अध्यक्षस्थान प्रा. प्र.ना. परांजपे यांनी भूषविले.

भारतात इ.सन. २००२ मध्ये सर्वप्रथम तमीळ भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे.त्यानंतर संस्कृत,तेलगु आणि कन्नड या तीन भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यास नेमके काय घडणार आहे, राजकीय, आर्थिक, सामाजिक व भाषाभिमान असे चार पैलू आहेत, 'जी भाषा १५०० ते २००० वर्षे जुनी आहे त्या भाषेलाच 'अभिजात भाषा' मानण्यात येईल' असा केंद्र शासनाचा निकष आहे, त्यासाठी महाराष्ट्र शासनाने 'मराठी भाषा सल्लागार समिती' स्थापन केली आहे आणि या समितीचे कामकाज वेगाने चालू आहे, ही सगळी माहिती सामान्य मराठी भाषिकांपर्यंत पोहचावी हा यामागचा उद्देश्य आहे' असे प्रा.प्र.ना. परांजपे यांनी आपल्या प्रास्ताविकात स्पष्ट केले.

प्रा. हरि नरके यांनी शासनाची समिती यादृष्टीने करत असलेले काम, आणि आपली भाषा निश्चीत २००० वर्षापूर्वीची आहे हे सिध्द करण्यासाठी मिळालेल्या पुराव्यांचे विश्लेषण आपल्या भाषणात केले.

ते म्हणाले, ''केंद्र सरकारने कोणतीही भाषा अभिजात आहे काय हे ठरविण्यासाठी खालील निकष ठरविले आहेत:–

* ती भाषा १५०० ते २००० वर्षापूर्वीची असावी.

* ती भाषा बोलणाऱ्यानी त्या भाषेतील मौल्यवान साहित्य जतन केलेले असावे.

* त्या भाषेला स्वत:ची परंपरा असावी.

* भाषेचे प्राचीन रूप व आजचे रूप वेगळे असले तरी चालेल पण त्यात अनुबंध असावा.

या चारही निकषांवर मराठी भाषा खरी उतरणार आहे, तसे पुरावे आपल्याकडे उपलब्ध आहेत, कोणताही राजकीय किंवा भाषिक अभिनिवेश न आणता मराठी भाषेच्या इतिहासाचा जो अभ्यास होतो आहे तो थक्क करणारा आहे. मराठी भाषेचे इतिहास संशोधन करताना असे जाणवते की मराठी भाषा अभिजात आहे. हे सिध्द झाल्यामुळे मिळणारे आर्थिक फ ायदे तर मिळतील पण आपल्या मराठी भाषेच्या विकासासाठी प्रचंड काम करणाऱ्या राजारामशास्त्री भागवत, श्रीधर व्यंकटेश केतकर, दुर्गा भागवत अशा काही व्यक्तींनी प्रचंड हालआपेष्टा सोसून भाषेसाठी जे काम केले, त्यांच्या आपल्यावरच्या उपकारातून उतराई होण्यासाठी तरी हे काम करणे आणि जनमानसात ते पोहचवणे आवश्यक वाटते. उदाहरणादाखल काही उल्लेख करतो : 'बृहद्‌कथा' हे २२०० वर्षापूर्वीचे काव्य आहे आणि यात संस्कृत व प्राकृत भाषेची झटापट वाचायला मिळते, 'गाथासप्तशती' हा ग्रंथ ७व्या शतकातला आहे. मराठीत अशी ८० हस्तलिखीते आहेत ज्यामुळे मराठी भाषेचे वय निर्विवादपणे २००० वर्षापूर्वीचे आहे हे सिध्द होते.

काही दिग्गज मंडळीनी आपली ही भाषा इतकी जुनी नसल्याचा निर्वाळा दिल्याने हा वाद वाढला आहे; तेव्हा केवळ भाषाअभिनिवेश म्हणून नव्हे तर सर्व पुराव्यांचा अभ्यास करुन आमची ही समिती आपल्या भाषेचे वैभव समाजापुढे आणू इच्छित आहे, हा प्रयत्न आम्ही करत आहोत. भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला तर काही आर्थिक फायदे मिळतील, केवढे मोठे काम उभे राहील आणि या आर्थिक फायद्यातून शासनाने काय केले पाहिजे यावर सामान्यांनी जरूर विचार करावा, त्यावर चर्चा

करावी''.

'भारतातील अनेक लेण्यांपैकी सर्वाधिक लेण्या महाराष्ट्रात आहेत आणि या लेण्यांमध्ये सापडणारे अनेक शिलालेख ७व्या,८व्या शतकातील आहेत, हे सर्व शिलालेख तत्कालीन सामान्य माणसांनी लिहीलेले आहेत. 'गाथासप्तशती' या ग्रंथातील काव्य ७५० सामान्य माणसांनी प्राकृतात लिहीलेले आहे. वेरुळच्या लेण्यातील ताम्रपटात प्राकृत भाषेचा उल्लेख सापडतो आणि हा ताम्रपट इ.सन ६१५ मधला आहे'. असे इतिहासाच्या दृष्टीकोनातून सर्व पुराव्याचे विश्लेषण पुरातत्व खात्यात अनेक वर्षापासून काम करणारे महामहोपाध्याय ब्रम्हानंद देशपांडे यांनी केले. आपल्या भाषणात ते पुढे म्हणाले की 'लीळाचरित्र व ज्ञानेश्वरीत सापडणारा प्रचंड शब्दसंग्रह असे स्पष्ट करतो की या भाषेला मागील अनेक शतकांचा इतिहास आहे'.

शासनाने याकामी नेमलेल्या समितीचे दुसरे सदस्य डॉ. कल्याण काळे यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त केले. 'अनेकजण भाषेचे राजकारण करतात, भाषेची स्पर्धा करतात, अभिनिवेश आणतात आणि इतर भाषेला तुच्छ समजतात, सध्या असे मराठी भाषेबाबत घडते आहे तेव्हा आता प्रतिकार करण्यासाठी व आपल्या भाषेचे वैभव सर्वांसमोर आणण्यासाठी ठामपणे उभे राहण्याची गरज आहे. संस्कृत–प्राकृत–अपभ्रंश–मराठी असे सूत्र आपण मान्य केले म्हणून त्याचा खोलवर अभ्यास आपण करत नाही. पण आता आपली भाषा किती प्राचीन आणि समृध्द आहे हे सिध्द करण्याची वेळ आलेली आहे. वेदकालात यज्ञमंडपात फक्त संस्कृत भाषा बोलावी असा दंडक होता, याचा अर्थ त्यावेळी यज्ञमंडपाबाहेर दुसरी भाषा बोलली जात असावी हे निश्चित आहे. दुसरे म्हणजे इतर भाषेचे पुरावे फक्त त्या राज्यातच सापडतात ज्या राज्याची ती भाषा आहे; पण मराठी ही एकमेव अशी भाषा आहे ज्याचे हस्तलिखीते,शिलालेख, ताम्रपट इतर राज्यातही सापडतात. त्यामुळे इतिहासाच्या दृष्टीने, प्रवाहाच्या दृष्टीने, दर्जेदार साहित्याच्या दृष्टीने माझ्यामते मराठी भाषा ही अभिजातच आहे', असे ठाम मत डॉ.काळे यांनी मांडले.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा न मिळण्यामागे राजकीय इच्छाशक्ती हेही महत्त्वाचे आहे, या मराठी भाषेच्या इतिहास संशोधनातून सर्वच गोष्टी स्पष्ट होतील. सर्व मराठी भाषिकांनी या प्रस्तावाचा पाठपुरावा करावा यासाठीचा प्रयत्न महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून करण्याात आला.

### ■ 'पीएच.डी.' मिळवणे झाले कठीण

संशोधन करण्याची मनापासून आवड इच्छा, निवडलेल्या विषयातील व्यासंग आणि प्राप्त मार्गदर्शकाची विद्यार्थ्याला मार्गदर्शन करण्याची इच्छा एवढ्या निकषांवर 'पीएच.डी.' करणे या आधी शक्य होते. मात्र 'यूजीसी'ने पीएच.डी.साठी पात्रता परीक्षा घेण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर या संदर्भातील गोंधळास सुरुवात झाली. पुणे विद्यापीठाची 'पीएच.डी.' मिळवण्याचे अनेकांचे स्वप्न असते. मात्र प्रवेश परीक्षेत पात्र ठरूनही विद्यार्थ्यांना 'पीएच.डी.' चा मार्ग मोकळा होत नाही असे दिसते आहे. 'पीएच.डी.'च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक आणि मार्गदर्शकांना विद्यार्थी मिळणे विद्यापीठाच्या ढिसाळपणामुळे अवघड झाले आहे.

'यूजीसी' ने जी प्रवेश परीक्षेची अट घातली आहे, ती संशोधनात गुणवत्ता यावी ह्या हेतूने. मात्र प्रत्यक्षात गेल्या दोन वर्षात या हेतूलाच बासनात गुंडाळून ठेवण्याचे काम विद्यापीठाने केले . प्रवेश परीक्षा घेण्याचा नियम आल्यानंतर फक्त एकदाच प्रवेश परीक्षा घेण्यात आली. त्यानंतर मात्र सर्व प्रक्रिया विभाग पातळीवरच करण्यात आल्या. या संदर्भातील आरक्षणाचे सर्व नियमही डावलले जात आहेत. विद्यापीठ प्रशासनाचे दुर्लक्ष आणि विभागप्रमुखांचा अनागोंदीचा कारभार यामुळे जागा रिक्त असूनही विद्यार्थ्यांना 'पीएच.डी' चे ध्येय गाठणे अवघड झाले आहे.

### ■ आदिवासी मुलांसाठी इंग्रजी शाळा

इंग्रजी माध्यमाचा शाळेतून शिक्षण घेण्याची संधी आता गडचिरोली जिल्ह्यातील काही आदिवासी मुलांनाही उपलब्ध होणार आहे. आदिवासी विकास विभागाच्या वतीने अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकास व्हावा या हेतूने २०१२–२०१३ या शैक्षणिक वर्षात भामरागड प्रकल्पातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळेत प्रवेश देण्यात येणार आहे.

२०१२–२०१३ या शैक्षणिक सत्रात भामरागड प्रकल्प क्षेत्रातून एटापल्ली व भामरागड तालुक्यातील अनुसूचित जमातीच्या १०० विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळेत शिकता येणार आहे. या तालुक्यातील शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांकडून माहिती मिळवता येईल. सुमारे ५०० विद्यार्थ्यांना इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून घेता येईल.

### ■ पटपडताळणीची कथा

शासनाने पट पडताळणीची मोहीम हाती घेतल्याने अनेक शाळांनी पटावरील विद्यार्थी संख्या फुगवून दाखवण्याची स्पर्धा सुरू केली. वरखेड, तालुका पाचोरा येथील काही शाळांमध्ये इकडून तिकडे विद्यार्थी वर्गात नेऊन पट चुकीचा दर्शवण्याचे प्रकार सुरू आहेत. काही शाळांच्या शिक्षकांनी तर मजुरीसाठी गेलेल्या मुलांना मजुरीपेक्षा जास्त पैसे देऊन वर्गात बसवले गेले.

चिंचपुरे येथील माध्यमिक शाळेत तर चक्क दुसऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांना ३०० रुपये देऊन आणले आणि उपस्थिती दाखवली.

शाळेची परवानगी जाऊ नये म्हणून चाललेली ही धडपड शिक्षणातील गैरप्रकारांना खतपाणी घालायला भाग पाडत आहे. विद्यार्थ्यांनाही आपली आवडणारी शाळा, शिक्षक यापेक्षा कोणत्या शाळेत नेल्यावर काय मिळणार या गोष्टींचाच विचार करायला भाग पाडते. शालेय जीवनात ज्या नैतिक मूल्यांचे संस्कार मुलांवर व्हायला हवेत, तेथे खोटे वर्तन कसे करावे याचेच धडे नकळतपणे मुलांना मिळत आहेत.

### ■ ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणाचे हाल

प्राथमिक शिक्षणातून मुलांच्या शिक्षणाचा पाया पक्का होत असतो. त्यामुळे या टप्प्यावर नियमित व चांगले शिक्षण मुलांपर्यंत पोहचायला हवे. प्रत्यक्षात मात्र राज्यातील बऱ्याच ठिकाणचे चित्र निराळे आहे.

प्राथमिक शाळांतील शिक्षकांच्या जबाबदाऱ्यांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. शाळेतील बांधकाम, बीएलओच्या कामांसाठी बाहेर जाणे, जनगणनेचे काम, निवडणुकांच्या वेळची कामे, वेगवेगळी सेवांतर्गत प्रशिक्षणे अशी कामे असतात. या सगळ्यातून वेळ मिळाला की विद्यार्थ्यांना शिकवण्याचे काम केले जाते. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे त्यामुळे खूप नुकसान होते. पुढचे पाठ आणि मागचे सपाट अशी स्थिती होते. शिक्षकांच्या बदल्या होतात पण त्याजागी नवीन शिक्षक भरले जात नाहीत. त्यामुळे वर्गात मुले आहेत पण शिक्षक नाही किंवा शाळेतील मोजके शिक्षकच सगळीकडे काम करतात. अशा परिस्थितीत शिक्षकाचे शिकवण्यात व मुलांचे शिकण्यात चित्र कसे लागणार?

खारगड, थडीपवनी, अंबाडा, भिष्णूर, मेंढला इ. ठिकाणी या समस्या सातत्याने जाणवत आहेत. अशा परिस्थितीत मुलांचे शिक्षण कसे होणार याबाबतचे प्रश्न पालकांना सतावत आहेत.

### ■ शिक्षकांच्या बदल्यांना तूर्तास विराम

सरकारच्या २० एप्रिलचा 'जीआर' आणि २१ एप्रिलचे 'शुद्धिपत्रक' यांच्या आधारे पुणे जिल्ह्यातील आठशे शिक्षकांच्या बदल्या

करण्याचे आदेश काढण्यात आले होते. मात्र पुणे जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाने सादर केलेल्या यासंदर्भातील याचिकेवर उच्च न्यायालयाने स्थगितीचा निर्णय घोषित करून बदल्यांना तूर्तासतरी पूर्णविराम दिला आहे.

सरकारने काढलेल्या या जीआरनुसार २०१२-२०१३ या शैक्षणिक वर्षांपासून त्यातील बाबींचा विचार व्हायला हवा असे अर्जदारांचे म्हणणे आहे. मात्र या शुद्धिपत्रकाद्वारे 'जीआर' २०११-२०१२ या शैक्षणिक वर्षाला पूर्वलक्ष्यी करून लागू केला गेला आणि शिक्षकांच्या बदल्या केल्याचे दाखवले होते. जीआरची अंमलबजावणी मात्र नेहमी पुढील तारखेनंतर होत असते, जे येथे पाळले गेले नाही असे शिक्षकांचे म्हणणे होते. शिक्षकांच्या बदल्या एका तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यात करण्यात आल्या होत्या. सरकारचा बदल्यांचा हा निर्णय चुकीचा आहे हे अर्जदार शिक्षकांनी लक्षात आणून दिले.

## ■ रत्नागिरीच्या तरुणाने डिझाईन केल्या ५० वेबसाइट

रत्नागिरी – कोकणातील पहिला वेब डिझाईनर वैभव डोंगरे यांनी आतापर्यंत ५० वेबसाइट डिझाईन केल्या असून त्या अद्ययावत ठेवण्याचे कामही तो करीत आहे. 'थीमबेस' व जागतिक स्पर्धेला तोंड देणाऱ्या वेबसाइटस्‌मुळे आता पुणे-मुंबईतील कंपन्यांनी वैभवकडे मागणी नोंदवली आहे.

वैभवने रा. भा. शिर्के प्रशालेतून दहावी झाल्यानंतर शासकीय तंत्रनिकेतनामध्ये इलेक्ट्रॉनिक्स अॅड टेलिकम्युनिकेशनचा डिप्लोमा केला. बीसीएचा अभ्यासक्रम पुण्यात पूर्ण केला. वैभवने २००५ मध्ये सॉफ्टलॉजिक डॉट कॉम या पहिल्या वेबसाइटची निर्मिती करुन कोकणात सर्वप्रथम वेबसाइट निर्मितीचा मान मिळवला. त्यानंतर २००६ मध्ये रत्नागिरी इन्फो डॉट कॉम ही महत्त्वाकांक्षी वेबसाइट पूर्ण केली. या वेबसाइटला हजारो लोक भेट देत आहेत.

गेल्या सहा वर्षात वैभवने ५० वेबसाइटस्‌ची निर्मिती व्यावसायिक पातळीवर केली आहे. त्यामध्ये आंबा प्रक्रिया उद्योजक, शाळा, महाविद्यालये, डॉक्टर, बिल्डर, चित्रकार, जमीन विकसक, हॉटेल्स यांचा समावेश आहे.

## ■ बेळगाव जिल्ह्यातील दोन हजार मुले शाळे बाहेरच

गणती मोहिमेने केलेल्या पाहणीनुसार जिल्ह्यातील ७ ते १४ वयोगटातील २०९० मुले शाळेबाहेर असल्याची माहिती मिळाली. या मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी 'सेतुबंध' कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. दोन मदरशांमध्येही पहिल्यांदाच सेतुबंध कार्यक्रम राबवून तेथील मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणले जाणार आहे.

राज्य गणती मोहिमेत मदरशांमधील मुलांची गणती करावी असा आदेश गेल्या वर्षीच शिक्षण खात्याने दिला होता. परंतु मदरसा संचालकांनी त्याला विरोध दर्शविल्याने सुमारे ९२ मुले या गणतीपासून दूर राहिली होती. मात्र, आता हा विरोध मागे घेतल्यामुळे या मुलांचीही नोंद घेण्यात आली आहे. या मुलांना धार्मिक शिक्षणाबरोबरच भाषा, गणित अशा विषयांचेही शिक्षण दिले जाणार आहे. याच गणती मोहिमेत शाळेत जाणाऱ्या व शाळाबाह्य मुलांची माहिती घेण्यात आली होती. जिल्ह्यात सुमारे २०१० मुले शिक्षणापासून वंचित असल्याचे निष्पन्न झाले. यापैकी ६८८ मुले ७ ते १४ वर्षे वयोगटातील असून ती एकदाही शाळेत गेलेली नाहीत तर १४०९ मुले ही शाळा अर्धवट सोडून शाळेबाहेर आलेली आहेत. आता या दोन्ही प्रकारातील मुलांना शाळेत आणण्याचे आव्हान शिक्षणखात्यासमोर असून या मुलांसाठी उन्हाळी सुटीत 'सोनुल्यांचे अंगण' ही योजना राबविली जाणार आहे. शिवाय एक वर्षासाठी निवासी शाळाही सुरू केली जाणार आहे. याशिवाय घरबसल्या शिक्षण देणे, वाहतुकीची सोय करणे, तंबू शाळा सुरू करणे हे उपायही योजले जाणार आहेत त्याची सुरुवात येत्या शैक्षणिक वर्षात होणार आहे.

## ■ रत्नागिरीच्या तरुणाने डिझाईन केल्या ५० वेबसाईट

रत्नागिरी – कोकणातील पहिला वेब डिणाईनर वैभव डोंगरे याने आतापर्यंत ५० वेबसाईट डिझाईन केल्या असून त्या अद्ययावत ठेवण्याचे कामही तो करीत आहे. 'थीमबेस' व जागतिक स्पर्धेला तोंड देणाऱ्या वेबसाईटसमुळे आता पुण्या–मुंबईतील कंपन्यांनी वैभवकडे मागणी नोंदवली आहे.

वैभवने रा. भा. शिर्के प्रशालेतून दहावी झाल्यानंतर शासकीय तंत्रनिकेतनमध्ये इलेट्रॉनिस ॲड टेलिकम्युनिकेशनचा डिप्लोमा केला. बीसीएचा अभ्यासक्रम पुण्यात पूर्ण केला. वैभवने २००५ मध्ये सॉफ्टलॉजिक डॉट कॉम या पहिल्या वेबसाईटची निर्मिती करुन कोकणात सर्वप्रथम वेबसाईट निर्मितीचा मान मिळवला. त्यानंतर २००६ मध्ये रत्नागिरी इन्फो डॉट कॉम ही महत्त्वाकांक्षी वेबसाईट पूर्ण केली. या वेबसाईटला हजारो लोक भेट देत आहेत.

गेल्या सहा वर्षात वैभवने ५० वेबसाईटस्ची निर्मिती व्यावसायिक पातळीवर केली आहे. त्यामध्ये आंबा प्रक्रिया उद्योजक, शाळा, महाविद्यालये, डॉटर, रुग्णालये, बिल्डर, चित्रकार, जमीन विकास, हॉटेल्स यांचा समावेश आहे.

## ■ गणती मोहिमेचा परिणाम

गणती मोहिमेने केलेल्या पाहणीनुसार जिल्ह्यातील ७ ते १४ वयोगटातील २०९० मुले शाळेबाहेर असल्याची माहिती मिळाली. या मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी 'सेतुबंध' कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. दोन मदरशांमध्येही पहिल्यांदाच सेतुबंध कार्यक्रम राबवून तेथील मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणले जाणार आहे.

राज्य गणती मोहिमेत मदरशांमधील मुलांची गणती करावी असा आदेश गेल्या वर्षीच शिक्षण खात्याने दिला होता. परंतु मदरशा संचालकांनी त्याला विरोध दर्शविल्याने सुमारे ९२ मुले या गणतीपासून दूर राहिली होती. मात्र, आता हा विरोध मागे घेतल्यामुळे या मुलांचीही नोंद घेण्यात आली आहे. या मुलांना धार्मिक शिक्षणाबरोबरच भाषा, गणित अशा विषयांचेही शिक्षण दिले जाणार आहे.

याच गणती मोहिमेत शाळेत जाणाऱ्या व शाळाबाह्य मुलांची माहिती घेण्यात आली होती. जिल्ह्यात सुमारे २०१० मुले शिक्षणापासून वंचित असल्याचे निष्पन्न झाले. यापैकी ६८८ मुले ७ ते १४ वर्षे वयोगटातील असून ती एकदाही शाळेत गेलेली नाहीत तर १४०९ मुले ही शाळा अर्धवट सोडून शाळेबाहेर आलेली आहेत. आता या दोन्ही प्रकारातील मुलांना शाळेत आणण्याचे आव्हान शिक्षणखात्यासमोर असून या मुलांसाठी उन्हाळी सुटीत 'सोनुल्याचे अंगण' ही योजना राबविली जाणार आहे. शिवाय एक वर्षासाठी निवासी शाळाही सुरू केली जाणार आहे. याशिवाय घरबसल्या [illegible]कीची सोय करणे, तंबू शाळा सुरू करणे हे उपायही योजले जाणार आहेत त्याची सुरुवात येत्या शैक्षणिक वर्षात होणार आहे.

## जोशूच्या कविता

–रमेश पानसे

जोशूच्या आईने जोशूला उन्हाळी शिबीरात धाडले....
तेथे गाणी होती, गोष्टी होत्या
खेळ होते, साहसकृती होत्या
जोशूला हे सारेच आवडत होते; हवेच होते
तेथे वेळापत्रक होते, शिस्त होती
न ऐकल्यास शिक्षा होती

शिबीर शाळेपेक्षा वेगळे नव्हतेच मुळी
थोडा मोकळा वेळ, थोडी स्वैरता
थोडी मैत्री, थोडी मनमुक्तता
मोठ्यांना मुलांचे शिबीर घेता येतच नाही मुळी
जोशूला असे वाटते, त्याने आईला सांगितले
त्याला शिबीर आवडले नाही!

# ग्राममंगल वार्ता



नव्या शिक्षणाची नवी दिशा समजून घेऊन शिक्षणव्यवस्थेत मूलगामी परिवर्तन घडविण्याच्या दृष्टीने 'ग्राममंगल' दरवर्षी रचनात्मक शिक्षणाचा दृष्टिकोन विकसित करण्यासाठी शिक्षक व पालकांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करते. या वर्षी पुण्यात दिनांक १६ एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीत पूर्वप्राथमिक व प्राथमिक शिक्षणासाठी प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण झाला. त्याचप्रमाणे ठाणे जिल्ह्यातील ग्राममंगलच्या ऐना येथील गावी दि. २३ एप्रिल ते १४ मे या कालावधीत पूर्वप्राथमिक, द्विभाषा व प्राथमिक शिक्षणासाठीचा प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला.

या दोन ठिकाणच्या प्रशिक्षण कार्यक्रमात एकूण १२० प्रशिक्षणार्थींचा सहभाग होता. या



प्रशिक्षणामध्ये भाषा, गणित, इतिहास, भूगोल, परिसर अभ्यास, प्रकल्पपद्धती व मुलांचे मूल्यमापन करण्याची पद्धत याविषयांचा समावेश होता. प्रत्येक विषय 'Constructive approach to education' या पद्धतीने मुलांपर्यंत कसा पोहचवावा, प्रत्येक विषयातील संकल्पना वर्गातील प्रत्येक मुलाला समजलीच पाहिजे, या दृष्टीने त्यांच्यापर्यंत पोहचवण्यासाठीच्या पायऱ्या कोणत्या याचे मार्गदर्शन या शिबिरात देण्यात आले.

याबरोबरच मूल कसे शिकते? मेंदूची रचना कशी असते? मुलांचे शिकत असताना नेमके गोंधळ कुठे घडतात, मूल ऐकत का नाही? मुलाला दिलेल्या सूचना पाळताना काय अडचणी येतात याविषयीची शास्त्रीय माहितीसुद्धा या प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रसृत करण्यात आली. त्यामुळे पालकांच्या व शिक्षकांच्या चेहऱ्यावर ताणविरहाचा आणि नवसंशोधनाचा आनंद स्पष्ट दिसत होता. 'आनंददायी शिक्षणा' चा खरा अर्थ सगळ्यांना खऱ्या अर्थाने गवसला असे जाणवत होते.

दि. १ मे ते ५ मे दरम्यान ऐन्यात झालेल्या इंग्रजी व मराठी या दोनही भाषा कशा शिकवाव्यात यासाठी घेण्यात आलेला 'द्विभाषा प्रशिक्षण कार्यक्रम' प्रशिक्षणार्थींना विशेष आवडला. प्रत्येक प्रशिक्षणार्थींना आपण इंग्रजी बोलू शकतो, किती सहजपणे छोट्या-छोट्या उपक्रमाच्या माध्यमातून शिकवू शकतो असा आत्मविश्वास निर्माण झाला. 'Its very exciting and inovative' अशा शब्दात प्रतिक्रिया यात सहभागी प्रा. कमलाकर इंदूलकर यांनी व्यक्त केली.

त्याचप्रमाणे ऐन्यातील दि. ५ मे ते १४ मे या कालावधीत प्राथमिक शिक्षणासाठीचा प्रशिक्षण कार्यक्रमही खूप यशस्वी झाला. दिवसभर प्रशिक्षण, त्यानंतर प्रार्थना, प्रार्थनेच्या वेळी ज्येष्ठ शिक्षिका सिंधुताई अंबिके यांच्याकडून ऐकलेली गाणी, गोष्टी आणि त्यांचे आदिवासी मुलांना शिकवण्यासाठी केलेल्या अथक प्रयत्नांचे अनुभव प्रत्येकाला समृद्ध करणारे होते.

ऐन्यातील वातावरण, सिंधुताईंचा सहवास, ग्राममंगलच्या शिक्षणपद्धतीतून तयार झालेले चुणचुणीत आदिवासी मुले, पाड्यावर चालणाऱ्या शाळा बघून प्रत्येकाला एका उदात्त विचाराची लकेर स्पर्शून गेली.

एकूणच ग्राममंगलमधील प्रशिक्षणाचा हा कार्यक्रम प्रत्येकाला नव्या शिक्षणाची नवी दिशा स्पष्ट करतो.



## साहित्य वेध



# तुतारी

डॉ. सौ. सुप्रिया
अत्रे

### तुतारी

(जाति–पादाकुलक)

एक तुतारी द्या मज आणुनि,
फुंकिन जी मी स्वप्राणानें,
भेदुनि टाकिन सगळीं गगनें
दीर्घ तिच्या त्या किंकाळीनें,
अशी तुतारी द्या मजलागुनि.

अवकाशाच्या ओसाडींतिल
पडसाद मुके जे आजवरी,
होतिल ते वाचाल सत्वरी
फुंक मारिता जीला जबरी,
कोण तुतारी ती मज देईल?

रुढी जुलूम यांची भेसूर
सन्तानें राक्षसी तुम्हाला
फाडुनी खाती, ही हतवेला
जल्शाची का?–पुसा मनाला;
तुतारींने ह्या सावध व्हा तर!

जुने जाउं द्या मरणालागुनि,
जाळुनि किंवा पुरुनि टाका,
सडत न एक्या ठायीं ठाका,
सावध! ऐका पुढल्या हाका!
खांद्यास चला खांदा भिडवुनि!

प्राप्तकाल हा विशाल भूधर,
सुंदर लेणीं तयांत खोदा,
नांवें अपुलीं त्यांवर नोंदा;
बसुनी कां वाढवितां मेदा?
विक्रम कांहीं करा, चला तर!

धार धरिलीया प्यार जिजावर,
रडतिल, रडोत, रांडा पोरें;
गतशतकांचीं पापें घोरें
क्षालायाला तुमचीं रुधिरें
पाहिजते! स्त्रैण न व्हा तर!

धर्माचें माजवूनि डम्बर,
नीतीला आणिती अडथळे;
विसरुनियां हे जातात खुळेः–
नीतीचें पद जेथें न ढळे
धर्म होतसे तेथेंच स्थिर

हल्ला करण्या तर दंभांवर–तर बंडांवर,
शूरांनो! या त्वरा करा रे!
समतेचा ध्वज उंच धरा रे!
नीतीची द्वाही पसरा रे
तुतारिच्या या सुराबरोबर!

**सदर कविता जागेअभावी प्रक्षिप्त केली आहे. मूळ कविता संपूर्ण केशवसुत, संपा. शकुंतला क्षीरसागर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई या पुस्तकामध्ये समाविष्ट आहे.**

'गंगौघापारि भव्य, केशवसुता, सावेशवाणी तुझी' – कवीवर्य रेंदाळकर

कवीवर्य केशवसुत, या युगप्रवर्तक कवीच्या कविता ह्या त्या काळाचा विचार करता क्रांती करणाऱ्याच कविता होत्या.

केशवसुतांनी आपली पहिली कविता १८८५ साली लिहिली त्या काळात वाङ्.मयाच्या क्षेत्रात नवविचारांचे, जागृतीचे चैतन्याचे वारे वाहात होते. ह. ना. आपटे, नाट्याचार्य देवल, निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी आपापल्या क्षेत्रात नवविचारांनी क्रांतीला सुरुवात केलीच होती. त्यातच कवितेच्या प्रांतात केशवसुतांनीही आमूलाग्र बदल केला. जुन्या पद्धतीची अध्यात्मपर, वृत्तबद्ध कथात्मक आणि वस्तुनिष्ठ स्वरूपाची कविता डावलून नव्या ऐहिक जीवनाची नांदी फुलवणारी, भावनिष्ठ, स्फुट स्वरूपाची आत्मनिष्ठ कविता लिहावयास सुरुवात केली. मराठी कवितेला त्यामुळे एक नवी दृष्टी मिळाली. एक विशाल क्षितीज मोकळे झाले. कविता आता समाजभिमुख व्हायला सुरुवात झाली. केशवसुतांच्या कवितेने केवळ कवितेच्या अंतरंगाच्या बदलाचाच विचार केला असे नसून बाह्यांगाचाही बदल करून त्यांनी कवितेचे रूपही पालटून टाकले. नवी वृत्ते, रचना, 'स्व' बदलचे उल्लेख यांचा समावेश त्यांनी केला.

साहित्याच्या क्षेत्रात बंडाचा झेंडा उभारून त्यांनी धामधूम उडवून दिली. जुने विषय, जुनी बंधने, जुनी रचना यांना नाहीसे करून, तरुणांना जोशपूर्ण वाटेल, त्यांचा आत्मविश्वास जागृत होईल अशी संवेदनशील, सामाजिक जाणिवांची घोषणा करणारी प्रेरणादायी कविता नव्या जगाची प्रभात ठरली. आपल्या कवितांमधून

देवादिकांच्या गोष्टी पुराणकथा आख्यानस्वरूप गोष्टी यांना त्यांनी फाटा दिला. अल्पजीवी, छंदात्मक रचनेच्या माध्यमातून केशवसुतांनी सामाजिक व राजकीय विषयांबरोबरच आजवर न स्पर्श केलेले निसर्ग, प्रेम, काव्यदेवता, कवी, कविता गूढगुंजन, परमेश्वरी चिंतन या विषयांना प्राधान्य देऊन, वैयक्तिक व सामान्य माणसाच्या आयुष्यातील उदाहरणांच्या माध्यमातून त्यांनी विषयांची मांडणी समृद्ध केली आणि त्यामुळेच कविता आता 'आपली' जवळची वाटू लागली.

विविध विषयांचीद्वारे कवितेत खुली करणाऱ्या केशवसुतांनी सामाजिक विषयावर जास्तच भर दिला. आपल्या लोकांची मते जणू मेली आहेत. त्या वेळच्या परिस्थितीची ती नेमकी गरज आहे. हे त्यांनी ओळखले आणि 'तुतारी' सारख्या रणवाद्याची निर्मिती केली. त्यांना साधे वाद्य नको होते. कारण ती नाजूक, कोमल वाद्ये आहेत. कवीला जिच्या आवाजाने गगन भेदून जाईल असा आवाज हवा आहे, जो पददलिताच्या अंतःकरणातील मूक संवेदनांना शब्दबद्ध करणारा आहे तो हवा आहे. जणू श्रीकृष्णाच्या पांचजन्याचा खडबडून जागे करणारा, 'युद्धाला तयार व्हा' म्हणून संदेश देणारा आवाज त्यांना अपेक्षित आहे.

*एक तुतारी द्या मज आणुनि,*
*फुंकिन जी मी स्वप्राणानें,*
*भेदुनि टाकिन सगळींच गगनें,*
*दीर्घ जिच्या त्या किंकाळीनें*
*अशी तुतारी द्या मजआणुनी...*

आजवरचे कवी कदाचित समाजातील अन्यायाने, अत्याचाराने दुःखी झाले असतील , हळहळले असतील पण त्यांनी त्याची वाच्यता केली नाही. मात्र केशवसुतांनी या आपल्या विचारांना स्पष्टपणे, निर्भिडपणे 'तुतारी'तून मांडले.

*उंच अशा बैसुनि तक्तावर*
*एक वैभवा थोर भोगितो,*
*धुळीमधें तो अन्य लोळतो,*
*हाल न त्याचे कुत्रा खाते!*
*काय असे ही स्थिती बरोबर?*

समाजातील गरीब-श्रीमंत, लहान-थोर ही विसंगती ते स्पष्टपणे मांडून थांबत नाहीत तर ती योग्य नाही हे ही प्रश्नातून सुचवतात.

समता, स्वातंत्र्यं आणि बंधुता या तीन तत्त्वांवर त्यांची कविता आधारित आहे. प्रा. भ. श्री. पंडित त्यांना 'युगकवी' म्हणतात ते याचसाठी. ते जी कविता लिहीतात ती 'विषयवाचक'नसून 'वृत्तीवाचक' आहे असे त्यांचे मत आहे.

कविता लिहितानाची सामाजिक परिस्थिती केशवसुत नेमक्या पण टोकदार शब्दात मांडतात.

*अवडम्बरली ढगें कितीतरी*
*रवि किरणांचा चूर होतसे...*

किंवा

*रुढी जुलुम यांची भेसूर*
*सन्ताने राक्षसी तुम्हाला*
*फाडुनि खाती, ती हतवेला*
*जल्शाची का? पुसा मनाला...*

किंवा

*संघशक्तिच्या भुईंत खंदक*
*रुंद पडुनि शें तुकडे झाले,*
*स्वार्थनिपेक्ष जीवीं अपुले*
*पाहिजेत ते सत्त्वर भरले;*

अशा शब्दांनी केवळ परिस्थितीचे वर्णन करून ते थांबत नाहीत तर त्यासाठी आता आपण काय केले पाहिजे हेच अधिक त्वेषाने, जोमाने सांगतात. गतानुगताची घोर पापे आपल्या हातून घडली, आता तरी जागे व्हा. दंभावर, बंडावर हल्ला करणे आता हवे आहे, पुराण, पडक्या घरात रडत न बसता भ्याडपणे स्वतःला कोंडून घेणे हा पुरुषार्थ नाही तर 'प्राप्तकाल हा विशाल भूधर

सुंदर लेणी तयात खोदा' असा संदेश ते देतात. समतेचा ध्वज उंच धरण्यासाठी ते तरुणांना तयार करीत आहेत. कारण त्यांचा विश्वास आहे की 'नियमन मनुजासाठी, मानव नसे नियमनासाठी' त्यातूनच प्रगतीला अडसर असणाऱ्या गोष्टी तोडून फोडून टाकून स्वतः ओज, अभिमान, आवेश यांनी गर्जत पुढे चला असे केशवसुत सांगतात. 'जुने जाऊ द्या मरणालागुनि' असे एकीकडे म्हणताना,

*जुन्या नभी या ताजे तारक,*
*जुन्या भूमिवर नवी टवटवी,*
*जुना समुद्रहि नवरत्ने वी,*
*जुन्यातून जी निष्पत्ति नवी*
*काय नव्हे ती श्रेयस्कारक?*

असेही म्हणतात. नव्या तरुण पिढीबद्दल आशावाद येथे दिसतो. स्वतःतील सामर्थ्य ओळखून जुन्यातून नावीन्याचा शोध घेण्यास ते प्रवृत्त करतात. एवढेच नाही तर जुने व नवे यातील पूल कसा सांधता येईल व जुन्या जमिनीतूनच नव्या कळ्या, नवे वृक्ष, नवी पालवी, नवी फळे निर्माण होऊन सारे जीवनच मधुर बनवता येईल याचा निर्वाळाही ते देतात.

'पूर्वापार चालत आलेले सूर–असूरांचे, सत्–असत्चे युद्ध चालूच आहे. आज दानव फार माजले असून ते

देवांवरच झेंडा मिरवायला निघाले आहेत तेव्हा देवांच्याच मदतीला चला' असा संदेश देऊन ते 'तुतारी' फुंकत आहेत.

केशवसुतांची ही कविता अत्यंत विचारदर्शी असून, ते टोकाचे असल्याने त्यांचे चिंतन, समाजाची जाणीव, प्रबोधनाची दृष्टी त्यातून व्यक्त होते. वेळप्रसंगी ती भाषा कठोरही वाटते. पण विषयाची आवश्यकता लक्षात घेता ती आवश्यकच आहे. कविता अतिशय गतीमान आहे. एका मागून एक विचारांची मालिकाच आपल्यापुढे उलगडत जाते. आजच्या काळाचा विचार करता 'तुतारी' सारख्या काव्याची खरंच गरज आहे असे वाटते. मरगळलेल्या सहनशक्तीची परीक्षा पाहणाऱ्या परिस्थितीवर मात करण्यासाठी खरेच एकदा खडबडून जागे व्हायला, संघशक्तीने हे सारे उधळून देऊन, नवे काही निर्माण करायला असेच काही व्हायला हवे आहे. काळाच्या पुढे पाहायला लावणारी अशी ही कविता म्हणूनच 'अक्षर' कविता ठरते.

*शारदेने जो मंत्र दिला कानी।*
*तसे लिहिले मी काव्य चित्रे-मनी।*

हे केशवसुतांचेच विचार आहेत. त्याची समर्पकता ही कविता पुरेपूर जाणवून देते.


शिक्षणवेध

वार्षिक वर्गणी रुपये ४००/-

त्रैवार्षिक वर्गणी रुपये १०००/-

किंवा ग्राममंगल संस्थेला १०,००० रुपये वा अधिक देणगी द्या.

'८० जी' कलमाखाली आयकरातून सूट मिळवा आणि दरमहा 'शिक्षणवेध'चा अंक ही मिळवा.

वर्गणी / रोख / चेक / ड्राफ्टने 'ग्राममंगल' या नावाने पाठवू शकता.

मुंबई-पुणे बाहेरील चेकसाठी रुपये ३०/- वटणावळ आवश्यक.

**पुणे कार्यालय :**

ग्राममंगल, गांधीभवन परिसर, अंधशाळेशेजारी,

कोथरुड, पुणे ४११ ०३८. संवाद : ०२० २५३८६६८७

*माणसाचे शिक्षण हे भविष्यकाळासाठी असते. आजच्या शिक्षणाने माणसाच्या उद्याच्या जीवन जगण्याच्या क्षमतांचा विकास व्हायला हवा, हा विचार मांडणारे पुस्तक*

**आजचे शिक्षण : उद्याचे जीवन**

लेखक – रमेश पानसे

डायमंड पब्लिकेशन्स, मूल्य – रु. ११०/–





# अनुभव रंगपंचमीचा

**अश्विनी मंदार गोडसे,** पुणे

आमचं बाळ एक वर्षाचं झाल्यापासून त्याच्या सामाजिक जीवनातल्या अनुभवांकडे मी जातीनं लक्ष घालायचं ठरवलयं. मग ते रोजचं, संध्याकाळचं बागेत खेळणं असो किंवा प्रत्येक महिन्यात येणारे सण समारंभ असोत. निदान तो प्रत्येक अनुभव कसा त्याच्यापर्यंत पोहचवायचां, त्याला जास्तीत जास्त कसं सहभागी करून घ्यायचं, आणि महत्त्वाचं म्हणजे प्रत्येक अनुभव हा 'त्याचा' आहे आणि त्यामुळे 'त्याने' माझ्या नियोजनाप्रमाणेच तो अनुभव स्वीकारावा हा आग्रह एक पालक म्हणून बाजूला ठेवायचा, या तीनही पायऱ्यांवर माझी स्वतःची एक भूमिका तयार होते आहे. खरं तर रोजच माझ्या मुलाच्या नजरेनं मी त्याचं अनुभव विश्व पाहण्याचा प्रामाणिक प्रयत्न करते आहे. अगदी अलीकडचीच गोष्ट. आमच्या सोसायटीत रंगपंचमी खेळायची टूम दरवर्षीच निघते. तसचं संध्याकाळच्या 'कट्ट्यावर' बोलणी सुरू होती. किती वाजता सुरू करायचं, कोणी कसे रंग आणायचे, मागच्या वर्षीपेक्षा वेगळ्या पिचकाऱ्या कोणत्या वगैरे गप्पा रंगल्या होत्या. मी पुष्कळदा मुलांच्याच घोळक्यात असल्याने, 'काकू, नक्की ये बरं का ग! मागच्या वर्षी तू खेळलीच नव्हतीस, या वर्षी चालणार नाही हं! अशा गोड धमक्या सुरू होत्या. मी म्हणाले, 'नक्की

येणारं! पण मी विचार करते आहे की, देवाशिषला माझं एकदम रंगलेलं तोंड दिसलं तर काय होईल?'.

'बापरे एकदम डेंजर! रडायलाच लागेल तो' सातवीतली सावनी 'अगं काकू मी पण माझ्या आईकडे बघून जोरात रडायचो लहानपणी'

आठवीतला अथर्व

'अरे खरंच देवशिषला कसं कळणार की रंगपंचमी वगैरे काहीतरी असतं आणि त्याला अशी रंगवारंगवी करायची असते ते!

सातवीतली दर्शना.

'काकू, तू त्याला आणूच नकोस! त्याला भीती वाटेल–दुसरीतला श्रेयस, 'कारण आम्ही ना फुगेपण फोडणार आहोत, त्याला लागेल ना! त्याला जर सेकंड स्टँडर्डपर्यंत मोठा होऊ दे'.

मुलांशी अशा गप्पा मारण्याची संधी मी कधीच सोडू शकत नाही. प्रत्येक वयोगटाची प्रतिक्रिया इतकी गमतीशीर असते, आणि प्रत्येक मुलाची प्रश्न सोडवण्याची रीतही वेगवेगळी! माझं मूल हे जरा सगळ्या ताई–दादांच्या मर्जीतलं, त्यांनी मला विचारलं, 'खरंच आम्ही तुला आणि देवशिषला अगदी थोडंच रंगवतो, आणि रंगही हर्बल आणलेत गं आम्ही!' मी म्हणाले, 'अरे देवशिषला घेऊन यायला मला आवडेल फक्त आपण जरा त्याची काळजी घेऊ आणि जसं त्याला आवडेल तसं आणि तेवढंच त्याला खेळू देऊ. फक्त मला मात्र अगदी घरी जायच्या आधी रंगवा म्हणजे तो घाबरणार नाही चालेल? 'हो, हो' सगळेच आनंदाने तयार झाले आणि माझ्या मुलांच्या आयुष्यातल्या पहिल्या रंगपंचमीची तयारी सुरू झाली!

मी त्याला घेऊन पिचकारीच्या दुकानाकडे निघाल्यावर अजून दोघं–चौघं निघाली. दुकानात मी दोन पिचकाऱ्या देवाशिष समोर ठेवून विचारलं, 'यातली कोणती हवी देवला?' त्याने जी उचलली, त्याचे पैसे मी देवच्या हातात दिले. बरोबरची मुलं आश्चर्याने म्हणाली, 'आईशप्पथ!, काकू त्याला कळतं असं? आणि आमची आई अजूनही आमच्या हातात पैसे देत नाही'! मग मी भाजीच्या दुकानातून बिटरुट, पालक वगैरे घेतले आणि आमची स्वारी घरी आली. दुसऱ्या दिवशी सकाळी मी देवंचा नेहमीचा आंघोळीचा टब खाली लॉनवर नेला. बच्चेकंपनी उत्सुकतेने माझी तयारी बघत होती! लगेचच सेना मदतीला धावली.

'काय करतेस?' 'इथे का टब ठेवतेस?' 'देव कुठयं?' सरबत्ती सुरूच होती. मी म्हणाले की, 'आज त्याची अंघोळ लॉन वर ! आणि रंगीत पाण्यानी! तुम्ही सुरू करा, आम्ही येतोच!'

देवाशिषला तर पाणी घेऊन घराबाहेर जायचं म्हणजे पर्वणीच होती! तो ही माझ्या मागे पुढे धावतच होता. वाटी आणतोस का? 'मग आणतोस का?' 'आजीकडून बिटरुट आणतोस का?' अशा प्रत्येक प्रश्नाला तत्परतेने प्रतिसाद देत होता. आणि प्रत्येक वस्तूसाठी स्वतंत्र, खास फेरी मारत होता. आतापर्यंत इतर मुलांचे रंग खेळणं, पाणी उडवणं चालू झालं होतं. देवाशिष लक्ष देऊन बघत होता, मधून मधून मला हाक मारून काहीतरी त्याच्या सांकेतिक भाषेत बोलत होता. मी त्याला टबात बसायला सांगितलं आणि बिटरुट घालून तयार केलेलं पाणी दाखवलं, 'घालू का रंगीत पाण्याने अंघोळ?' असं विचारताच अगदी खुषीने मान डोलावली

गेली. तो मजेत टबात बसून पाण्यात खेळत होता. इतर मुलांकडे बघून हसत होता. मध्येच सगळी मुलं त्याच्या जवळ आली. प्रेमाने त्याच्याशी खेळायला लागली. मी पालकाच्या पेस्टची वाटी देवसमोर धरली आणि म्हणाले, 'मला लावतोस का?' लगेच त्याने वाटीत हात घालून माझ्या हाताला पेस्ट लावली. सगळी मुलं हसली. 'देव मला पण...' म्हणत सगळ्यांनी हात पुढे केले. मग सगळ्यांना म्हणाले की, ''तुम्हालापण त्याला रंगवायचय ना? मग हे बिटरुट घ्या आणि त्याला लावा म्हणजे त्यालाही रंग लागेल!'' मी पुढे काही म्हणायच्या आत, अथर्व दादाने पुढाकार घेतलाच!, 'सगळे एकदम नको काकू, एकेक जण हळूच लावूया त्याला आणि हातापायालाच लावूया काय रे?'' प्रत्येक मुलं देवाशिषला एकेक करून रंग लावत होतं! लावताना त्याच्याशी गोड बोलत होतं! आणि मुख्य म्हणजे हे सगळं इतकं हळूवार चाललं होतं की आत्ता एकमेकांशी मस्ती करणारी मुल हीच का? असा प्रश्न पडावा! एक लहान मुलं त्याच्याहून थोड्या मोठ्या मुलांशी त्याच्या सामाजिक जीवनातलं नातं निर्माण करत होतं.

तेवढ्यात, 'त्याच्या पिचकारीचं काय करायचं? मी शिकवू का त्याला कसं पाणी उडवायचं?, इती मधुर! 'थांबा थांबा आपण ना पिचकारी भरुन वर उडवू म्हणजे त्याला शॉवर सारखं वाटेल आणि एकदम पाणी उडणार नाही!' आता कल्याणी ताईची आयडिया होती. प्रत्येकानं पिचकारी भरुन वर सोडायची, देवने टाळ्या वाजवायच्या आणि सगळ्यांनी मिळून जोरात हसायचं असा कार्यक्रम सुरू झाला. मग थोडावेळ आपली आपली आणि थोडा वेळ 'देवची' अशी रंगपंचमी मुलं खेळत होती. आणि मी निर्धास्तपणे त्या सगळ्यांमध्ये माझं मूल सोडून लांबून हे दृश्य डोळ्यात साठवत होते!

खरं पाहता, अगदी एखादा 'लेसन' प्लॅन केल्याप्रमाणे मी हा अनुभव स्वतःसाठी आखला होता. 'शिक्षक' असल्याचा फायदा पूर्वतयारी आणि 'पूर्वज्ञान' लक्षात ठेवण्यासाठी उपयुक्त ठरला होता! मला खात्री आहे की, या अनुभवातून खूप काही आम्हा सगळ्यांनाच मिळालं. एक आई म्हणून मुलाला आनंद वाटणाऱ्या कृतीचे चांगले नियोजन करणं आणि त्यामधल्या प्रक्रियेत सामावून जाण्याचा, प्रत्येक क्षणातून आनंद घेणं हा खूप मोठा लाभ आहे! अशा अनुभवातून स्वतःची सर्जनशीलता तर फुलतेच पण त्यातून निर्माण होणाऱ्या इतरांच्या सर्जनशीलतेची ही झलक मिळते. एकंदरीतच पुढच्या अशा सामाजिक अनुभवासाठी मी आणि माझा मुलगा उत्सुक झालो आहोत. आणि हो, एक सांगायचंच राहिलं, त्यादिवशी रंगीत पाण्याने अंघोळ तर झालीच पण देवाशिषने 'हिरवे पराठे' आणि 'लाल' सारही खाल्लेच.

–0–

# शिक्षणमंत्र्यांना एक पत्र

महोदय
स. न. वि. वि.,

दिनांक १ मे २०१२ रोजी नवीन २६५३ मराठी शाळांना मान्यता देणार असे शासनाने जाहीर केले आहे. ही बातमी वाचून २००८ पासून मान्यतेसाठी झगडणाऱ्या आमच्या समितीस धक्काच बसला.

खरे तर २००५ पासून मराठी शाळांच्या मान्यतेचा प्रश्न लोंबकळत ठेवण्यात आला आहे. २००८ साली सरकारने मागवलेले प्रस्ताव कुठलेही कारण न देता रद्द करण्यात आले. त्यानंतर झालेल्या अनेक चर्चांमध्ये महाराष्ट्र मराठी शाळांची संख्या आधीच जास्त असल्याने त्यांच्यात स्पर्धा होऊ नये म्हणून नवीन शाळा काढायला परवानगी देता येत नाही, असे शासनाचे अधिकारी व मंत्री यांनी सांगितले. वास्तवात २००८ पासून आमच्या शाळा सुरू आहेत, त्यात हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, हे शासनास माहिती होते. म्हणजे या विद्यार्थ्यांना शाळेची गरज होते हे उघड आहे. असे असताना या चालू असलेल्या मराठी शाळा बंद करण्यासाठी शासनाने १९ जून २०१० च्या परिपत्रकाच्या वरवंटा फिरवायला सुरुवात केली. आम्ही त्यास संघटितपणे विरोध केल्यावर त्याची कारवाई तात्पुरती थांबली असली तरी परिपत्रकाची टांगती तलवार कायम आहे.

आता १ मे २०१२ रोजी शासनाला महाराष्ट्रात २६५३ मराठी शाळांची गरज आहे, असा साक्षात्कार झाला आहे. आता या साक्षात्कारानंतर तरी २००८ पासून सुरू असलेल्या मराठी शाळांना तात्काळ मान्यता देणे हीच एकमेव शहाणपणाची कृती ठरली असती. किंबहुना तसेच होईल अशीच आमची अपेक्षा होती.

परंतु सरकारने जाहीर केलेल्या निर्णयात तसेच निसंदिग्धपणे म्हटलेले नाही. उलट यातून नव्याने प्रस्ताव मागवण्यात येतील असेच सूचित केले आहे. यातून पुन्हा पटपडताळणीत पकडल्या गेलेल्या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या संस्थाचालकांना शासकीय पातळीवर सौदेबाजीची संधी मिळेल व इतके वर्षे प्रामाणिकपणे शिक्षणासाठी कष्ट करणाऱ्या शिक्षणप्रेमींना ४२० कलमाखाली तुरुंगात डांबण्यात येईल असे स्पष्ट दिसते आहे.

सरकारच्या या निर्णयाचा आम्ही तीव्र निषेध करीत आहोत. प्रामाणिक मराठी शाळांना दडपण्याच्या या मनमानी निर्णयास आम्ही विरोध करीत आमच्या शाळा चालूच ठेवू. शासनाने वेळीच हा संघर्ष तीव्र होऊ देऊ नये व महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवात महाराष्ट्राचा पायाच उध्वस्त करण्याची ही कृती थांबवावी, अशी आम्ही विनंती करीत आहोत.

अन्यथा, आमची तीव्र संघर्षाची तयारी आहे!

**श्री. रमेश पानसे / श्री. अरुण ठाकूर**

शिक्षण हक्क समन्वय समिती,महाराष्ट्र




**बालकेंद्री शिक्षणाकडे बघण्याचा पालकांचा व शासनाचा दृष्टिकोन कसा आहे? कसा असावा? हे सांगणारे पुस्तक**

**मुलांचे शिक्षण : पालक व शासन**
लेखक – रमेश पानसे
ग्राममंगल प्रकाशन
मूल्य – रु. १००/-

## वाचक संवाद

ग्राममंगलच्या शिक्षणवेधचे आजपर्यंत २०–२१ अंक प्रकाशात आले आहेत. मुलांचं शिक्षण हा मोठ्यांच्या अभ्यासाचा आणि ध्यासाचा विषय असायला हवा असं वाटणाऱ्यांनी हा अंक चालवला आहे. मुलांचं वरकरणी साधं, सोपं वाटणारं शिक्षण हे फार मोठ्या आणि फार खोल असणाऱ्या गुंतागुंतीच्या रचनांनी बनलं आहे. शारीरिक, बौद्धिक, भावनिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय, विशिष्ट विचारसरणीचं, विशिष्ट काळातलं असे अनेक पैलू त्याला आहेत. इतकं सगळं असूनही ते आनंदाचं असायला हवं, असू शकतं असा भरवसा देणारं असतं हे नक्की. व्यवस्थापन आणि प्रशासन अशा अंगांनीही त्याकडं मौलिक,जिवंत आणि गतीमान, बदलाचं एक सूक्ष्म व परिणामकारी साधन म्हणून गांभीर्यानं पाहायला हवं. 'शिक्षण व्यवस्था' चालू ठेवणं म्हणजे कारखानदारी चालवणं नव्हे.

व्यक्तीचं/मुलांचं शिक्षण हे अनुभवाच्या पायावर उभं असतं. आलेला नवीन अनुभव हा मूळच्या अनुभवाच्या घटकांशी मिळताजुळता असला की नवीन व जुन्या अनुभवाची सरमिसळ तक्रारीविना अथवा काही सहज होते आणि मूल शिकते. अन्यथा पहिल्या अनुभवाच्या अथवा तो घेतला ज्या पद्धतीने त्याच्या रचनेत तोडमोड होते व नवीन अनुभवायला विचारविश्वात स्थान प्राप्त होते. असं आणि वारंवार असं असं होत होत शिकणं सुरू राहातं. या अर्थाने व्यक्ती ज्ञानाची निर्मिती स्वतःच करीत राहाते. या विज्ञान–सत्याचा वापर करून आपलं 'शिकवणं', 'शिकण्याच्या' प्रक्रियेला समजून घेत घेत विकसित व्हायला हवं. एकदा का हे साधलं की मुलांना अनुभव देणं, संधी देणं, आपण शिकू शकतो याचं त्याचं भान सतत सतेज व सजीव ठेवणं हे मोठ्यांच काम. मोठ्यांचे या कामाला विचारवंतांच्या विचाराचा पाया प्राप्त करून देणे, नावीन्याची कास धरून मोठ्यांना प्रेरित ठेवणं आणि शिकण्याचा/शिक्षणाचा प्रधान हेतू जीवनाची गुणवत्ता सातत्यानं टिकवणं/वाढवणं यासाठी साहित्याची गरज असते.

तंत्रज्ञानाच्या, आजच्या एका अर्थाने भयचकित करण्याची क्षमता असणाऱ्या साधनाने, प्रेरित आणि चिंतनशील, कार्यशील आणि गुणग्राहक, व्यावहारिक आणि संदर्भक्षमताधिष्ठित अशा शिक्षकांना दिशा देण्याच्या व सामर्थ्यवान बनविण्याच्या शक्यता अधिक आहेत.

तेव्हा 'शिक्षण' या संस्थेच्या भोवती असणाऱ्या साऱ्या संदर्भांना न्याय देत लिखीत साहित्य, लिखीत साहित्याचे परीक्षण, प्रत्यक्ष शाळा/महाविद्यालयातील अनुभवांचे चित्रीकरण व अशा माध्यमांतून मांडल्या जाणाऱ्या मुद्यांचे परीक्षण, शिक्षकांचा अनुभव संपन्न विचारांच्या देवाणघेवाणीसाठी एक व्यासपीठ, शिक्षणावर सत्ता गाजवू पाहणाऱ्या व्यक्ती, संस्था व शासन यांना शिक्षणासाठी जबाबदार बनविण्यासाठीचे प्रयत्न मांडण्यासाठी अशा अंकांची नितांत आवश्यकता असते.

मुलं केंद्रस्थानी मानून भाषा, विज्ञान व सामाजिक शास्त्रे यांचा विचार, मातृभाषा (का मायबोली?) हे शिक्षणाचे प्रभावी व अत्यावश्यक माध्यम, सरकारी धोरणे व समाजाची गळचेपी, शिक्षणतज्ज्ञांचे विचार, त्यांचे चरित्र व दृष्टिकोन, शिकण्याची संधी देऊ पाहणाऱ्या तळमळीच्या शिक्षकांचे विचारधन, अशा प्रकारच्या साहित्यनिर्मितीचा एक स्वागतार्ह आणि अत्यंत गरजेचा प्रयत्न म्हणजे 'शिक्षणवेध' आहे. पायाभूत शिक्षणाच्या दर्जावर व्यक्तीचे सारे आयुष्य अवलंबून असण्याच्या तत्त्वाचा गांभीर्याने विचार मांडणाऱ्या या अंकाला शुभेच्छा.

केवळ भारताचेच नव्हे तर मनुष्य जमातीचे भवितव्य वर्गखोल्यांमधून आणि वर्गखोल्यांच्या भवती असणाऱ्या परिसरातून घडते आहे याची जाण उत्पन्न करणाऱ्या या अंकाचे म्हणूनच 'वादातीत मूल्य' आहे.

–०–


## शिक्षणवेधसाठी आपण हे करू शकता.

- वार्षिक वर्गणीदार
- एखाद्या कुटुंबाला अंक भेट
- कल्पक सूचना
- विविध शैक्षणिक संदर्भ किंवा माहिती
- आपलं कसदार लेखन
- वर्षभर किमान एखादी जाहिरात
- उपक्रमांसाठी प्रायोजक
- परीक्षणार्थ पुस्तके
- प्रतिक्रिया आणि शुभेच्छा



## वेध शिक्षणविषयक मासिकाचा

# आजचा सुधारक : गुणवत्तापूर्ण शिक्षण विशेषांक

'आजचा सुधारक' या मासिकाचा एप्रिल २०१२ (वर्ष २३ अंक ३) हा अंक 'गुणवत्तापूर्ण शिक्षण विशेषांक' म्हणून प्रकाशित झाला आहे. संबंधितांनी आवर्जून वाचावा असा हा अंक आहे. अतिथीसंपादक मंजिरी निमकर व सुबोध केंभावी हे आहेत. अलीकडेच (१ एप्रिल २०१० पासून) बालकाच्या निःशुल्क व अनिवार्य शिक्षणाचा अधिनियम देशभर लागू झाला. त्यातील कलम ८ व कलम २९ यानुसार प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे हा त्याचा हक्क झाला आहे. अधिनियम होणे आणि त्याची सार्वत्रिक अंमलबजावणी होणे यात बराच कालावधी जातो. हा कालावधी कमी होणे आजच्या बालकाच्यादृष्टीने फायदेशीर असते. तो कसा कमी होईल याविषयी समाजात विचारविनिमय सातत्याने होत राहावा लागतो. पुन्हा अधिनियमाची सार्वत्रिक अंमलबजावणी आणि त्यात ठरविलेल्या उद्दिष्टांची पूर्तता यातही कितीतरी कालावधी जात असतो. तो कमी व्हायला तर अंमलबजावणीची कार्यक्षमता व परिणामकारकता वाढवी लागते. त्याविषयीही सातत्याने विचारविनिमय होत राहावा लागतो. असा विचारविनिमयाचा एक प्रयत्न १४ व १५ जानेवारी २०१२ असे दोन दिवस, सेवाग्राम, वर्धा येथे विचारकांचे शिबिर झाले. त्यावर आधारित अशा लोखांचा समावेश या विशेषांकात करण्यात आला आहे. विषयसंबंधित असे सात लेख, प्रस्तावना व समारोप नावे आणखी दोन लेख, असे एकूण नऊ लेख या अंकात आहेत.

येथे 'आजचा सुधारक' या मासिकाविषयी काहीसे लिहिणे आवश्यक आहे. 'विवेकवादी चिंतना'चा वसा घेतलेले आहे. छोटेखानी मासिक नेहमीच विचारांना मोठे खाद्य पुरवीत असते. आजच्या सामाजिक प्रश्नांचा जागरुकपणे वेध घेणे, त्यावर विवेकशील भाष्य होत राहील असे पाहणे आणि समाजातील वैचारिकतेचे भान व अधिष्ठान टिकवून ठेवणे, अशातऱ्हेचे कार्य हे मासिक सातत्याने करीत आले आहे. विशिष्ट विषयांच्या कालसुसंगत अशा चर्चांसाठी विशेषांक काढण्याचीही मासिकाची प्रथा आहे. या शिक्षणविषयक विशेषांकापूर्वी गेल्या काही वर्षांत निघालेले अनेक विशेषांक विचारकांना मोहून टाकणारे आहेत. उदाहरणार्थ, एप्रिल २००८ याचा 'जात : आरक्षण विशेषांक', ऑगस्ट २००९ चा 'डार्विन विशेषांक', एप्रिल–मे २०१० चा 'अंधश्रद्धा विशेषांक',

जून–जुलै २०११ चा ‘पाणी–वापर विशेषांक’ आणि अगदी अलीकडचे ऑक्टोबर २०११ व नोव्हेंबर २०११ चे ‘मराठी कारण विशेषांक’ संग्राह्य आहेत.

‘आजचा सुधारक’ गुणवत्तापूर्ण शिक्षणाविषयीचा प्रस्तुत अंक हा केवळ दोन विषयांच्या विशिष्ट चर्चासत्राशी संबंधित केल्यामुळे बराच संकुचित झाला आहे. तरीही चर्चासत्रात सहभागी झालेल्या बहुतेक व्यक्ती प्रत्यक्ष शिक्षणव्यवहाराशी संबंधित असल्यामुळे, अंकाचे अंकांतील लेखांचे स्वरूप अत्यंत व्यावहारिक आणि म्हणूनच उपयुक्तही झाले आहे. ज्यावर हा अंक आधारला आहे त्या संमेलनातील चर्चेत शिक्षणव्यवहाराच्याच अंगांने मांडणी झाली असावी, कारण तेथे, एक, गुणवत्तापूर्ण शिक्षण म्हणजे काय? दोन, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे मूल्यमापन कसे असावे? आणि तीन, हे साधण्यासाठी काय करावे लागेल? अशा तीन प्रश्नांभोवती चर्चा गुंफली गेल्याचे संपादकीयात म्हटले आहे.

या मासिकातील सर्वच लेख शिक्षणक्षेत्राशी संबंधित असणाऱ्या लोकांनी आवर्जून वाचले पाहिजेत.

– संपादक

---

# ‘सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण साध्य करायचे तर सर्वंकष मूल्यमापन अत्यावश्यक!

**विवेक मॉटेरो**

‘सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण’ हे काही मूठभर लोकांचे काम नाही. त्यासाठी लाखो हातांची गरज आहे. ‘प्रत्येकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण’ हे उद्दिष्ट आपल्याला गाठायचे असेल तर त्यासाठी एक पद्धतशीर सातत्यपूर्ण आणि समग्र कार्यक्रम आखावा आणि प्रत्यक्षात आणावा लागणार आहे. त्याचा एक आवश्यक भाग म्हणजे मूल्यमापन. हे मूल्यमापन कसे असावे, त्याचे आवश्यक घटक कोणते, त्याची प्रक्रिया कशी असावी याची चर्चा या टिपणात केलेली आहे. एक वर्ग–एक शाळा–काही शाळा किंवा एखाद्या तालुक्यातील/जिल्ह्यातील सर्व शाळा, यात गुणवत्ता दाखविण्याचे काम यापूर्वीही अनेकांनी केलेले आहे. त्याची सूत्रे आपल्याला त्यांच्याकडे मिळतील. परंतु महाराष्ट्राच्या संदर्भात गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे उद्दिष्ट आपल्याला त्यांच्याकडे मिळतील, परंतु महाराष्ट्राच्या संदर्भात गुणत्तापूर्ण शिक्षणाचे उद्दिष्ट म्हणजे सुमारे ९४, ००० शाळांमधील, साडेचार लाख शिक्षकांमार्फत, १ कोटी साठ लाख मुलांपर्यंत पोहाचणे, इतक्या व्यापक स्तरावर गुणवत्ता कार्यक्रम आखताना मूल्यमापनाचा विचारही वैयक्तिक पातळीवरील गुणवत्ता–कार्यक्रमापेक्षा वेगळ्या पद्धतीने करावा लागणार हे ओघाने आलेच.

### १. मूल्यमापन आणि गुणवत्ता याबाबतची काही विधाने

* व्यापक स्तरावर गुणवत्ता आणण्यासाठी संपूर्ण यंत्रणा आणि सर्व व्यवस्था गुणवत्तापूर्ण असायला हवी.

* मूल्यमापन आणि गुणवत्ता यांचा अतुट संबंध आहे. गुणवत्ता किती आहे किंवा नाही हे तपासतच आपल्याला त्यात

आवश्यक सुधारणा करीत जाता येईल.

* यंत्रणेच्या सर्व स्तरांवर काटेकोर आणि भरवंशाचे मूल्यमापन उपलब्ध असल्याशिवय गुणवत्तापूर्ण व्यवस्था निर्माण होणार नाही.

* शिक्षणात गुणवत्तापूर्ण व्यवस्था उभारायाची, तर बांधीलकी मानणारे असंख्य शिक्षण आणि अधिकारी यांच्या एकत्रित आणि सुसूत्र प्रयत्नांनीच ते शक्य आहे.

* सर्व स्तरांवरील सर्व व्यक्तींसाठी प्रेरणा आवश्यक असते.

* काटेकोर मूल्यमापन ही सोपी वाट नाही, यात अपयशाचीही शक्तय असते त्यामुळे प्रेरणा कमी होण्याची शक्यताही असते – याची आठवण ठेवावी लागेल.

एक महत्त्वाचा प्रश्न यातून उभा राहतो. – प्रेरणा व काटेकोर मूल्यमापन या दोन्ही गुणवत्ता साधण्यासाठीच्या अत्यावश्यक गरजा आहेत. यापेक्षा मूल्यमापनाला न घाबरता आपली प्रेरणा अढळ ठेवायला आपल्याला शिकावे लागेल.

## २. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची गरज काय?

शिक्षण हक्क अधिनियमाला अपेक्षित असलेली गुणवत्ता म्हणजे काय याची चर्चा संमेलनाच्या पहिल्या सत्रात झालेली आहेच.

शिक्षणात गुणवत्ता आणणे हे मूठभरांचे काम नाही. ‘सतत सुधारणेचा’ पद्धतशीर कार्यक्रम राबवूनच ती आणता येणार आहे. सतत सुधारणा करायची तर ती मोजता आली पाहिजे आणि तपासता आली पाहिजे. गुणवत्तेच्या कोणत्या टप्प्यापर्यंत आपण पोहोचलो आहोत हे आपल्याला समजले पाहिजे. आपण त्याच जागी आहोत की, पुढे जात आहोत हेही आपल्याला समजले पाहिजे. पुढे कोठे जायचे तेही आपल्याला कळले पाहिजे. या प्रश्नांची उत्तरे आपल्याला मिळायला हवी असतील तर विश्वासार्ह नैदानिक मूल्यमापनाला पर्याय नाही. नैदानिक म्हणजे निदान करणारे. आपल्या रुग्णाची तब्येत सुधारत आहे किंवा नाही, आपण देत असलेले औषध त्याला लागू पडते आहे का नाही, याचे ‘निदान’ करण्यासाठी जश्या काही तपासण्या कराव्या लागतात तश्या गुणवत्तेच्या तपासण्या म्हणजे ‘नैदानिक मूल्यमापन’ असे मूल्यमापन सातत्याने करत राहावे लागते. त्याचप्रमाणे ‘सतत सुधारणा कार्यक्रम’ या स्वरूपातल्या गुणवत्तेच्या मोहिमेसाठीही असे सातत्यपूर्ण मूल्यमापन लागणार आहे. तुकड्यातुकड्याच्या प्रयत्नांनी सार्वत्रिक गुणवत्ता येणार नाही. व्यवस्थेच्या सर्व अंगांचा विचार करून आखलेला तो समग्र प्रयत्न असायला हवा. सर्वांगीण सुधारणा करण्यासाठी मूल्यमापनही तसेच सर्वंकष हवे.

## ३. भारतातील केंद्र आणि राज्य पातळीवरील मूल्यमापनांचा अपुरेपणा :

स्वातंत्र्योत्तर काळातील भारताच्या शिक्षणव्यवस्थेत मूल्यमापन हे क्षेत्र अत्यंत दुर्लक्षित राहिलेले आहे नाकारता येणार नाही. एन. सी. इ. आर. टी. ने या बाबतीत काही प्रयत्न केले असले तरीही ते बहुतांशी बालकांच्या वैयक्तिक मूल्यमापनापुरते मर्यादित आहेत. या मूलभूत गरजेकडे राज्य पातळीवरील संस्थांनीही लक्ष दिलेले नाही. सर्वंकष मूल्यमापनासाठी आवश्यक असलेली वर्ग, शाळा, तालुका, जिल्हा, राज्य पातळीवरील तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, प्रशिक्षणे, शिक्षणाचे व्यवस्थापन यांच्या मूल्यमापनाची साधने व प्रक्रियाही आज आपल्याकडे उपलब्ध नाहीत.

असरचे मूल्यमापन हे केवळ त्याचेच एक निदर्शक आहे, ते सर्वंकष तर नाहीच शिवाय व्यवस्थेची गुणवत्ताही ते तपासत नाही.

मूल्यमापनाबाबतचे जगभरातले लिखाण धुंडाळलेत तर या बाबतीतले बरेचसे शैक्षणिक काम हे विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक मूल्यमापनासाठी असल्याचे आपल्याला दिसेल. संपूर्ण वर्गाच्या मूल्यमापनाचे काही संदर्भ आपल्याला त्यात जरुर मिळतात; शिक्षण हक्क अधिनियमामुळे अनिवार्य झालेल्या गुणवत्तेच्या सर्वात्रिकीकरणाच्या व्यापक कार्यक्रमासाठी उपयोगी पडेल अशा सातत्यपूर्ण आणि सर्वंकष मूल्यमापनाबाबतचा मात्र एकही अहवाल आम्हाला शोधूनही मिळाला नाही. ही कमतरता लक्षात घेतली पाहिजे. शिक्षण हक्क अधिनियमासाठी आवश्यक अशा सर्वस्तरीय सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची साधने आणि पद्धती आपल्याला नव्यानचे निर्माव्या लागणार आहेत.

या संमेलनाचा एक मुख्य हेतू, सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण साध्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्वस्तरीय सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची आखणी करणे व त्यातील काही साधने २०१२-१३ या क्षैक्षणिक वर्षात तयार करणे असे आहे. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन हे केवळ बालकांसाठी नाही, तर व्यवस्थेच्या सर्व घटकांसाठी आवश्यक आहे. त्यात शिक्षक, अधिकारी, प्रशासक, धोरणकर्ते आणि मंत्र्यांचाही समावेश असायला हवा.

## ४. शिक्षक हक्क सुसंगतता आणि मूल्यमापन

शिक्षण हक्क अधिनियमामुळे आता गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रत्येक मुलामुलीपर्यंत पोचण्याला पर्याय उरलेला नाही. त्या बाबतीत चालढकलही करण्याजोगी परिस्थिती उरलेली नाही. गुणवत्ता आणि शिक्षण हक्क सुसंगतता यांची मानके, निकष आणि मोजण्याजोगे निर्देशक ठरविणे अशाप्रकारे आपल्याला मूल्यमापनाचा विचार करावा लागणार आहे. किती गुणवत्ता संपादता आली याची जी व्याख्या आपण करू आणि त्याचे निर्देशक ठरवू ते मग आपल्याला तपासत जाऊ. शिक्षण हक्क सुसंगतता हेही एका फटक्यात होणारे काम नाही. व्यापक स्तरावर यश मिळवायचे आणि पायरीपायरीने आणखी पुढच्या टप्प्याला पोचायचे असे करीत जाण्याची ही प्रक्रिया आहे. जसजशी आपण व्यापक स्तरावर गुणवत्ता मिळवू तसतसे मूल्यमापनही टप्प्याटप्प्याने बदलत जाणार. तूर्त आपल्याला शिक्षण हक्क सुसंगतता टप्पा - १ ची मूल्यमापन-साधने तयार करायची आहेत.

## ५. व्यापक गुणवत्ता कार्यक्रम : डेमिंग आणि जुरान

व्यापक स्तरावर गुणवत्ता सुधारण्यासाठी एडवर्ड डेमिंग आणि जोसेफ जुरान या दोघांच्या कल्पनांवर आधारलेले टोटल क्वालिटी मॅनेजमेंट, क्वालिटी सर्कल्स, कायझेन इ. कार्यक्रम औद्योगिक क्षेत्रात वापरले गेलेले आहेत. मोठ्या प्रमाणावरील उत्पादनांच्या गुणवत्तेबाबत जपानने जगभरात जे नाव कमावले आहे त्यात या दोघांच्या कल्पनांचा मोठा वाटा आहे. त्यात आपल्यालाही उपयोगी पडेल असे आणि शिकण्यासारखे बरेच काही सापडते.

औद्योगिक क्षेत्रातील गुणवत्ता कार्यक्रमाकडून शिक्षणक्षेत्राने शिकण्यासारख्या प्रमुख दोन गोष्टी आहेत, एक म्हणजे, व्यापक गुणवत्तेचा पाया म्हणून ‘सातत्याने सुधारणा करत राहणे व दुसरी म्हणजे संख्याशास्त्राचा वापर करून काही साधार पद्धतीची आखणी करणे.

अर्थात उद्योगधंद्यांमधील गुणवत्ता आणि शिक्षणातील गुणवत्ता यात काही मूलभूत आणि गाभाभूत फरक आहेतच. उत्पादनामधील छोटेमोठे फरक कमीकमी करत, शक्यतो नाहिसे करत उद्योगांमध्ये गुणवत्ता आणली जाते. शिक्षणामध्ये विविधता केवळ स्वीकारलीच जात नाही, तर ती जोपासली जाते. व्यक्तीव्यक्तींमधील वैविध्य, आवडीनिवडी आणि उपजत क्षमता असतात, आणि हे आपल्याला स्वीकारावेच लागते. शिक्षणात गुणवत्ता येण्यासाठी फरक कमी करून म्हणजे संधीची समानता आणून पुरेसे होणार नाही, तर त्यातल्या फरकाचाच सन्मान करून आणि त्यांच्या विविधतापूर्ण वैशिष्ट्यांच्या

विकासाला वाव देऊन ते करावे लागेल.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे मूल्यमापन, त्यासाठी केल्या जाणाऱ्या परीक्षा आणि अपयश यांचा एकमेकांशी संबंध आहे. या सगळ्याचा पुढे यशाच्या प्रेरणेशीही गाढा संबंध आहे. आपल्या मूल्यमापन व्यवस्थेपायी विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी कोणीच नाउमेद होणार नाही, त्यांचा उल्हास कोळपणार नाही याची आपल्याला काळजी घ्यावी लागेल. इतकेच नव्हे तर, मानवी घटकांना प्रेरणादायी ठरेल अशी एक नवी मूल्यमापन व्यवस्थाही आपल्याला तयार करावी लागेल.

सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण उभारायचे असेल तर प्रेरणा व सक्षमीकरणाची एक एकात्मिक व्यवस्था लागेल. त्याच्याशी सुसंगत व सुसूत्र असलेली खात्रीलायक आणि अत्यंत काटेकोर मूल्यमापन–व्यवस्था निर्माण करणे हे आपल्यासमोरचे एक मोठेच आव्हान आहे.

## ६. मूल्यमापन आणि प्रेरणा यांची जोडणी आणि मेळ

सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची मोहीम म्हणजे आपली सर्वांचीच शिकण्याची प्रक्रिया. स्वयंमूल्यमापन हा त्या प्रक्रियेचा पायाच आहे. असे म्हणण्याचे कारण शिकणे आणि तपासणे हे परस्परावलंबित असते. आपण काय शिकलो ते जोखायची शिकणाऱ्या माणसाची इच्छा असते. त्यामुळे मूल्यमापन आणि प्रेरणा यांची जोडणी करताना वरपासून खालपर्यंत सर्वांसाठी गुणवत्ता मोहीम ही शिकण्याची प्रक्रिया म्हणून बांधावी लागेल. गुणवत्ता हवी असेल तर सतत सुधारणा आवश्यकच असतात. शिकण्याच्या प्रक्रियेचाच तो एक भाग म्हणावा लागेल. त्यासाठी आपण आपल्याला पारखत राहायला हवे. सर्व स्तरांवरील सर्व कामांसाठी अशी स्वतःला पारखण्याची म्हणजेच स्वयंमूल्यमापनाची साधने तयार करता येतील.

## ७. सकारात्मक मूल्यमापन

शिकण्याच्या कोणत्याही प्रक्रियेत, मग ते विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रमाधिष्ठित शिकणे असो, शिक्षक–अधिकाऱ्यांचे सक्षमीकरण असो किंवा शिक्षणाचे व्यवस्थापन असो, ते करणाऱ्या व्यक्तीच्या ज्ञान–समज–आकलन यात वाढ होत असते. शिक्षणप्रक्रियेचीच ही फळे असतात. मूल्यमापनाने ह्या फलिताची मोजणी करावी, ते तपासावे. उत्तमोत्तम फलिते देणाऱ्या प्रक्रिया शोधाव्यात आणि त्या पारखाव्यात. हा सकारात्मक मूल्यमापनाचा महत्त्वाचा भाग आहे. यशोदायी प्रक्रियांचे सार्वत्रिकीकरण करणे हाही सतत चांगले, त्याहून अधिक चांगले करण्याचा मार्ग आहे. शिकण्याचा प्रक्रियेत सगळेच विद्यार्थी असतात–मुले, शिक्षक, प्रशासक, सगळेच. हे विद्यार्थी काय शिकले आहेत, त्यांनी काय साध्य केले आहे त्यांना काय समजले आहे, त्यांना काय येत आहे हे मोजणारे मूल्यमापन आपल्याला तयार करावे लागणार आहे. विद्यार्थ्यांना काय येत नाही तेच केवळ मोजणे हा मूल्यमापनाचा उद्देश नसावा.शिकण्याच्या प्रक्रियेत सगळेच सगळेच विद्यार्थी असतात–मुले,शिक्षक,प्रशासक,सगळेच हे विद्यार्थी काय शिकले आहेत,त्यांनी काय साध्य केले आहे, त्यांना काय समजले आहे,त्यांना काय येत आहे हे मोजणारे मूल्यमापन आपल्याला तयार करावे लागणार आहे.विद्यार्थ्यांना काय येत नाही तेच केवळ मोजणे हा मूल्यमापनाचा उद्द्येश नसावा.

## ८ संपूर्ण प्रक्रियेचा परिणामाचे बाह्य मूल्यमापन : व्यवस्थेतली अपयश ओळखणे व हाताळणे

वरील सर्व मुद्द्यांमध्ये एक अटळ आणि कठोर भागही आहे;बाह्य मूल्यमापन,स्वयंमूल्यमापनाबरोबरच आपल्याला आपल्या कृतीचे बाह्य मूल्यमापनही करायला हवे.म्हणजे त्यात काही चुकले असेल तर ते समोर येईल. 'मुलांना नापास करायचे नाही' ही शिक्षण हक्क अधिनियमाची रास्त अपेक्षा आहे, खरे तर याचा अर्थ एकही मूल नापास होणार नाही असे आपल्याला म्हणावयाचे आहे. नापस न होण्याच्या अपेक्षित पातळीपर्यंत मूल पोचावे यासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागतील.त्यासाठी

आपल्याला या व्यवस्थेत सुधारणा करीत जावे लागेल, अविरत प्रयत्न करूनही ज्या अधिकाऱ्यांची सुधारण्याची इच्छा नाही त्यांना शिक्षणाच्या प्रक्रियेपासून दूर करून दुसरे काहीतरी काम द्यावे लागेल.प्रत्येक बालक शिकले पाहिजे ही ज्या अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे त्यांना मात्र आपण 'नापास करायचे नाही' हा नियम लागू करायचा नाही.त्यांच्या कामाचा दर्जा असमाधानकारक असेल तर स्पष्ट केलेच पाहिजे.एक मात्र खरे की, व्यवस्थेचे अपयश समोर आणणारे असे बाह्य मूल्यमापन आपण सुरवातीला करणार नाही. आपण त्यांनाही शिकण्याची पुरेपूर संधी आधी देणारच आहोत.

### ९. स्पर्धात्मक वैयक्तिक परीक्षा

स्पर्धात्मक वैयक्तिक परीक्षेची अक्षरश: अनंत साधने भारतीय शिक्षणव्यवस्थेने तयार करून ठेवलेली आहेत.अशा परीक्षेत 'हुशार' आणि 'ढ' अशी वर्गवारी करून मिळते आणि मग यशपयशाची सर्व जबाबदारी विद्यार्थ्यांवरच ढकलता येते.प्रत्येकाला शिकवण्याच्या जबाबदारीतून काढलेली ही पळवाट म्हणजे भांडवली बाजार व्यवस्थेचे मध्यवर्ती तत्त्व आहे.'सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण' हे शिक्षण हक्क अधिनियमाचे उद्दिष्ट आणि शैक्षणिक बाजारवाद व स्पर्धापरीक्षा यांच्यातील विसंगती हा इथून पुढच्या काळात विवादाचा मुद्दा होणार आहे.

या शैक्षणिक बाजारवादात निवड आणि चाळणी हेच मूल्यमापनाचे एकमेव उद्दिष्ट असते; पण आपण ज्या शिक्षण अधिनियमाबद्दल बोलत आहोत,तो मात्र सर्वसमावेशक आणि समग्र आहे आणि त्यासाठी वेगळ्या दृष्टिकोनाची गरज आहे.

### १०. ऑगस्ट २०१० चा सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाचा जी. आर.

महाराष्ट्र शासनाने ऑगस्ट २०१० चा सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाचा जी. आर.काढला. त्यात लेखी परीक्षेबरोबरच तोंडी आणि प्रात्यक्षिक परीक्षाही अनिवार्य आहेत. यासारख्या काही चांगल्या गोष्टी असल्या तरी त्यांत काही नकारात्मक बाबीही आहेत.उदा. शिक्षकांना अवघड आणि अशक्य वाटेल अशा तऱ्हेने दैनंदिन नोंदी ठेवण्याची अपेक्षाही त्यात असावी असे या जी.आर.वरून वाटते, सांगायची विशेष गोष्ट अशी की अपेक्षित परिणाम ,मानके आणि निकष यांच्याबाबत मात्र तो आश्चर्यकारकरित्या त्या असमाधानकारक दिसतो. शिक्षकांना न जमण्यासारख्या या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी मग शिक्षक काय करतात हे पाहिले तर माझ्या म्हणण्यातला मुद्दा अधिक स्पष्ट होईल.

१) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाच्या जी आर. अनुसार दैनंदिन नोंदी कश्या ठेवायच्या याची 'गाइडे' आता बाजारात उपलब्ध झालेली आहेत.प्रत्यक्ष मूल आणि त्याच्या नावापुढे केलेली नोंद ह्याचा एकमेकांशी काहीही संबंध घडत नाही. हे अगदी पुण्यासारख्या शिक्षणाच्या माहेरघरी घडत आहे.

२) सहावीच्या एका विद्यार्थीने तिच्या गणिताच्या पाठ्यपुस्तकावर अनुक्रमणिकेत प्रत्येक पाठाच्या नावासमोर 'आ' किंवा 'सं' असे लिहिले होते.आ म्हणजे आकारिक आणि सं म्हणजे संकलित. त्यातला 'आ' पाठांचा अभ्यास करण्याची गरज नाही असे तिचे म्हणणे होते, कारण काय, तर ते परीक्षेत विचारणार नाहीत असे शिक्षकांनी वर्गात सांगितले आहे.'

सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाच्या या जी. आर.चे २०१० –११ आणि २०११–१२ मध्ये प्रत्यक्षात नेमके काय घडले याचे मूल्यमापन करण्याची गरज आहे. आणि त्यानुसार त्यात बदल करणे आवश्यक ते केलेही पाहिजेत.

### ११.वर्गाचे मूल्यमापन आणि तालुका स्तरावरचे व्यापक मूल्यमापन

या क्षेत्रातील आमच्या अनुभवावरून असे दिसते की शाळा आणि तालुका पातळीवर मुलांचे रँडम सँपल पध्दतीचे बाह्य

मूल्यमापन करणे शक्य आहे आणि ते गुणवत्ता–सुधारणेसाठी उपयोगी ठरेल.दरवर्षी थोडी थोडी सुधारणा करीत संपूर्ण तालुक्याची गुणवत्ता याद्वारे सुधारता येईल. शासकीय,खाजगी,ग्रामीण,शहरी अशा सर्व प्रकारच्या शाळांमध्ये हे मूल्यमापन घेतले गेलेले आहे. या संमेलनानंतर जी वेबसाईट तयार होईल त्यावर या मूल्यमापनासाठी वापरलेले प्रश्न,त्याची पध्दत,निकाल व निष्कर्ष टाकले जातील. तो कचा खर्डा मानून प्रत्येक शिक्षणकर्मींनी त्याचे चिकित्सक मूल्यमापन करावे आणि त्यानुसार तो सुधारत न्यावा. वापरणे –मागोवा घेणे–त्यानुसार पुन्हा सुधारणा करणे–पुन्हा वावरणे–पुन्हा तपासून पाहणे अशा चक्रातून नेत आपण त्यातून सुयोग्य योजना तयार करू.

## १२. शिक्षण हक्क अधिनियमाशी सुसंगत असणारे मूल्यमापन

अधिनियमाच्या कलम २९ मध्ये म्हटल्याप्रमाणे प्रत्येक बालकाचा सर्वांगीण विकास आणि शारीरिक व बौध्दिक क्षमतांचा जास्तीत जास्त विकास हे उद्दिष्ट म्हणून निश्चित केले असेल तर मूल्यमापन कसे हवे हे त्यातूनच स्पष्ट होते.परंतु इतरांपेक्षा चांगले करणे आणि स्पर्धापरीक्षांमध्ये वर्चस्व गाजवणे हे उद्दिष्ट असेल तर मात्र निराळ्या प्रकारचे मूल्यमापन करावे लागेल. आपल्याला शिक्षणहक्क अधिनियमाच्या दृष्टीने हे मूल्यमापन करायचे आहे.

### शिक्षणहक्क अधिनियमाशी सुसंगत मूल्यमापन

0 ‘सर्वांना गुणवत्तापूर्ण शिक्षण’ साध्य करण्यासाठी मूल्यमापन हा शिकण्याचा भाग व्हायला हवा.शिकणे आनंददायी असले पाहिजे.

0 शिकण्याच्या प्रक्रियेतील मूल्यमापन नेहमी शिकल्यानंतरच व्हायला हवे.त्यामुळे सक्षमीकरण अंमलबजावणी–स्वयंमूल्यमापन–सुधारित अंमलबजावणी हे शिकण्याचे चक्र या बाह्य मूल्यमापनाच्या आधी असायला हवे.

### स्वयंमूल्यमापन हाही शिकण्याच्या चक्राचाच अविभाज्य भाग

0 ‘सतत शिकण्याच्या’ आणि पर्यायाने ‘सतत गुणवत्ता सुधारण्याच्या प्रक्रियेतीले नैदानिक साधन हे सर्व स्तरांवरील मूल्यमापनाचे मुख्य उद्दिष्ट असायला हवे.

0 सूक्ष्म स्तरावर प्रत्येक विषयासाठी अशी स्वयंमूल्यमापन साधने तयार केली पाहिजेत. मुलांनी करावयाचे असे स्वयंमूल्यमापन हाही वर्गातील शिक्षणप्रक्रियेचा अविभाज्य भाग व्हायला हवा.

### पाठ्यपुस्तके आणि शैक्षणिक साहित्य

विकसनाचा भाग म्हणून ही साधने (ज्यात स्वाध्यायपत्रिका सुध्दा असतील) तयार झाली पाहिजेत.

0 त्याचप्रमाणे ‘माझे विद्यार्थी काय शिकले’ हे तपासण्यासाठी शिक्षकांना उपयोगी पडतील अशी स्वयंमूल्यमापन साधनेही प्रत्येक विषयासाठी तयार करावे लागतील. मुलांचे वैयक्तिक मूल्यमापन अशा दोन्ही स्वरूपात ही साधेने असतील.

0 शिकण्याच्या प्रक्रियेत चुका करण्याला महत्त्वाचे स्थान आहे हेही समजून घेतले पाहिजे.त्यामुळे चूक–बरोबर एकेरी पर्याय देणाऱ्या उत्तरांचा अपुरेपणाही समजून घेतलेला असावा.काही तथाकथित चुकाही मुलांनी त्या विषयज्ञानात वा अर्थ लावण्यात केलेली सर्जनशील सुधारणा असते. ते ओळखण्याचे प्रशिक्षण शिक्षकांना दिले पाहिजे, हे अजिबात सोपे नाही. शिक्षकांच्या शिकण्याचा, सक्षमीकरणाच्या प्रक्रियेचा हा भाग आहे. हे आणखी

वरच्या स्तराचे मूल्यमापन असल्याने पहिल्या टप्प्यावर ते कदाचित वापरता येणार नाही.

0 आपल्याला यातून काय साधायचे आहे त्या उद्दिष्टांच्या संदर्भानेच आपले हे मूल्यमापन आपण रचले पाहिजे, त्यामुळे आभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तकातील उद्दिष्टे साधताना त्या सोबतीनेच मूल्यमापनाचीही रचना केली पाहिजे.

0 ही रचना करण्याच्या प्रक्रियेत संबंधित घटकांचा सक्रिय सहभाग असला पाहिजे.

0 शिक्षण हक्क अधिनियमाच्या गुणवत्तेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी बहुस्तरीय मूल्यमापनाची गरज आहे.सर्व प्रक्रियांचे आणि सर्व अपेक्षित निष्पत्तींचे मूल्यमापन झाले पाहिजे.सूक्ष्म मूल्यमापन आणि व्यवस्थेचेही मूल्यमापन असे तीन स्तर आहेत. ऑगस्ट २0१0 चा जी आर. हा केवळ सूक्ष्म मूल्यमापनाविषयी बोलतो.

एन. सी. इ. आर. टी. च्या मूल्यमापनावरील साधनपुस्तकातही आपल्याला याच मर्यादा दिसतात.

0 महाराष्ट्राला लागू असलेल्या शिक्षणहक्क अधिनियमानुसार (कलम ११,१३,२२) सर्व पातळ्यांवर काम करणाया अधिकायांचे मूल्यमापन व्हायला हवे. स्वयंमूल्यमापनाच्या ॲडेप्टस या साधनात शैक्षणिक गुणवत्तेच्या स्वयंमूल्यमापनाची भर घालून ते पुढे विकसित करण्याजोगी जागा दिसते.आज त्यात शैक्षणिक गुणवत्तेचा फारसा समावेश नसला तरी शिक्षक, शाळा व्यवस्थापन समित्या,सर्व स्तरावरील प्रशासक व अधिकारी सर्वांसाठी अशी ॲडेप्टस तयार करता येतील.

0 सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची साधने केवळ विद्यार्थ्यांसाठी नाही तर सर्वच स्तरांवरील 'शिकणाऱ्यांसाठी लागणार आहेत. सर्व संबंधित घटकांकडे शिकण्याच्या प्रक्रियेतले विद्यार्थी म्हणून पाहिले पाहिजे. त्या सर्वांना स्वयंमूल्यमापनाची साधने मिळाली पाहिजेत. आपण काय शिकायला हवे आहे आणि त्या शिकण्यातून आपल्याला काय साधायचे आहे हे त्यांना स्पष्टपणे समजले पाहिजे.

**शिक्षण हक्काच्या सुसंगततेसाठी**

आपण जे निकष स्वीकारू त्याच्याशी या अपेक्षित निष्पत्तींचा थेट संबंध असेल.

0 प्रत्येक स्तरावरील सक्रिय व्यक्तींच्या गटाद्वारे समावेशक आणि पारदर्शक प्रक्रियेतून ही सर्व मूल्यमापन साधने तयार होतील. ती सर्वांना पाहण्यासाठी खुली असतील आणि लोकांचा चिकित्सक प्रतिसादही घेतला जाईल.

0 या संमेलनानंतर – सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणकर्मींचा जो गट तयार होईल त्या गटाने बहुस्तरीय व्यवस्थेच्या मूल्यमापनाचे संच बनविण्याची प्रक्रिया सुरू करावी.निकष आणि मानके ठरविणे हात्याचा एक भाग असेल.प्रत्येक वर्गासाठी प्रत्येक इयत्तेसाठी मूल्यमापनाची साधने तयार करावी लागतील. शाळा,क्लस्टर,तालुका, जिल्हा आणि राज्य अशा सर्व पातळ्यांसाठी मूल्यमापन साधने आणि त्याचे संच असले पाहिजेत.

0 सर्व साहित्य आणि प्रक्रियांचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन : सर्व साहित्य आणि प्रक्रिया विकसनशील आहेत असे मानले पाहिजे.प्रत्यक्ष वापर आणि अंमलबजावणी याद्वारे सुधारणेच्या सातत्यपूर्ण सर्वंकष प्रक्रियेचे त्या भाग आहेत असे मानले पाहिजे.

सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन प्रक्रियेच्या मर्मदृष्टीचा एक भाग म्हणजे सर्व प्रक्रिया आणि साहित्याची सतत तपासणी.

अंमलबजावणी आणि वापर या चिकित्सक पद्धतीने ही तपासणी व्हायला हवी.

**पाठ्यपुस्तके आणि इतर**

शैक्षणिक साहित्याचे मूल्यमापन शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी करायचे. शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्यात हे साहित्य किती कार्यक्षम ठरते या आधारे ते मूल्यमापन झाले पाहिजे. पाठ्यपुस्तकांच्या मूल्यमापनासाठीची 'समिती' पद्धत आता कालबाह्य झालेली आहे आणि आपण सोडून दिली पाहिजे.

0 मूल्यमापनाची अंमलबजावणीसुध्दा एका निश्चित दृष्टीने आखलेल्या योजनेप्रमाणेच केली पाहिजे.यासाठी तयार असलेल्या शिक्षकांच्या वर्गापासून सुरूवात करता येईल.

**रँडम सँपल पद्धतीचे स्वतंत्र बाह्य मूल्यमापन**

आधी या शिक्षकांच्या वर्गात मूल्यमापनाचे चित्र या प्रत्येक शिक्षकासमोर स्पष्ट आणि सोप्या पद्धतीने ठेवायचे म्हणजे त्याच्या कामात काय उत्तम झालेले आहे, कशात सुधारणा हवी आहे ते समजले आणि आपपल्या वर्गाची गुणवत्ता सुधारण्यासाठी हे मूल्यमापन उपयोगी पडेल.

0 मुलांच्या वैयक्तिक नोंदी शिक्षकांनी ठेवणे अपेक्षित आहे.

0 एका वैचारिक दृष्टीने काम करणारे अनेक गट आपल्यात असणे आवश्यक आहे. एकमेकांच्या भागात शिक्षण हक्क सुसंगततेचे निकष आणि मानके गाठणे हे आपले उद्दिष्ट आहे.

हे समजण्याजोगे , भरवशाचे आणि वैज्ञानिक पद्धतीने स्वतंत्रपणे तपासता येण्याजोगे असले पाहिजे.

गुणवत्तेचे काही निर्देशक ठरवून, दरवर्षी त्यात सुधारणा करत हे साधायचे आहे.

-0-0-0-

('आजचा सुधारक' या मासिकाच्या

'गुणवत्तापूर्ण शिक्षण विशेषांक' एप्रिल २०१२ यामधून साभार.)

# आपल्या भाषा पुरेशा विकसित आणि समर्थ आहेत

विनोबा

**खूप मेहनत करून त्या लोकांनी आपली इंग्रजी भाषा संपन्न बनविली आहे. ह्यासाठी त्यांच्याकडून बोधपाठ घेऊन आपणसुद्धा खूप मेहनत करून आपली भाषा संपन्न केली पाहिजे. असे काही करण्याऐवजी, बस, इंग्रजीशिवाय चालणार नाही; असे जर आपण रडगाणे गात बसलो, तर ते उचित होणार नाही.**

कित्येक लोकांच्या मनात असा भ्रम आहे, की आपल्या भाषा पुरेशा समर्थ नाहीत आणि आजच्या जमान्यात सर्व व्यवहार आपल्या भाषेत चालू शकणार नाहीत. हा भ्रम पूर्णपणे काढून टाकला पाहिजे. हे मी आपल्या भाषेच्या अभिमानामुळे केवळ सांगत नाही, परंतु हीच खरोखर वस्तुस्थिती आहे.

खरे पाहता आपल्या भाषा खूपच विकसित भाषा आहेत. शेकडो वर्षांपासून आपल्या सर्व भाषांचा विकास होत आला आहे. आजपर्यंत त्यांचा खूपच विकास झाला आहे व पुढेही तो होणार आहे. पाहा, कन्नड भाषेत एक हजार वर्षांपासून उत्तम साहित्य लिहिले जात आहे. त्यांत ज्ञान काही कमी नाही. खरे पाहिले म्हणजे एक हजार वर्षांपूर्वी इंग्रजी भाषा नव्हती. मी पाहिले की तामिळ भाषेत केवढे प्राचीन साहित्य आहे! कदाचित संस्कृत वगळता एवढे विशाल साहित्य हिन्दुस्थानच्या कोणत्याही प्रचलित भाषेत नाही. आणि असे असूनही आपण असे मानतो की आमची भाषा पुरेशी विकसित नाही किंवा पुरेशी समर्थ नाही.

दुसरे एक उदाहरण देतो. 'कॅन्टरबरी टेलस्' हा इंग्रजीतील बाराव्या शतकातील ग्रंथ आहे. त्याचवेळी लिहिलेला ज्ञानेश्वर महाराजांचा 'ज्ञानेश्वरी ग्रंथ' हा मराठीत आहे. दोन्ही पुस्तके मी वाचली आहेत. दोघांचाही मी अभ्यास केला आहे. ज्ञानेश्वरीमध्ये जेवढे शब्द आहेत, त्याच्या एकचतुर्थांशदेखील शब्द 'कॅन्टरबरी टेलस्' मध्ये नाहीत. आणि 'ज्ञानेश्वरी' हा काही मराठीतील पहिला ग्रंथ नाही. त्याच्यापूर्वीही पुस्तके लिहिली आहेत. मला हे सांगावयाचे आहे, की आपल्या सर्व भाषा फार विकसित भाषा आहेत. त्यांत संस्कृत तर फारच समृद्ध आहे.

ही गोष्ट खरी आहे की, आपल्या भाषेत एवढ्या विज्ञानाच्या गोष्टी नाहीत. परंतु हे आधुनिक विज्ञानाचे साहित्य किती वर्षांचे आहे? फार तर शंभर-दोनशे वर्षांचे आणि हे सर्व लिखाण आपल्या भाषेत न आल्याने सध्या विज्ञानाचे साहित्य इंग्रजीतच अधिक आहे. परंतु जसजसे आपल्या भाषेत विज्ञान अंतर्भूत होईल तसतसे विज्ञानाच्या बाबतीतही आपल्या सर्व भाषांचा अवश्य विकास होईल, ह्यात शंका नाही.

ह्या गोष्टीकडे जरा दुसऱ्या दृष्टीने पाहा. विज्ञानाचा प्रसार आपल्याकडे विशेष न झाल्याने त्याचे शब्द आपल्या भाषेत आज नाहीत. परंतु तशीच स्थिती इंग्रजी भाषेची दुसऱ्या क्षेत्रात आहे. माझेच उदाहरण देतो. एकदा बुनियादी शिक्षणाची एक समिती दिल्लीत एकत्र आली होती. डॉ. झाकीर हुसेनही त्यांत होते, इंग्रजी भाषेत चर्चा चालली होती. त्यात शब्द आला 'कोरीलेशन'. मी म्हणालो, मी कोरीलेशन जाणत नाही. पण 'समवाय' जाणतो. आणि समवायला इंग्रजीत काय म्हणतात ते मी जाणत नाही.

'समवाय' मी जाणत आहे, कारण ती माझ्या शिक्षणाची पद्धत आहे. ती बाहेरून आली नाही, तर ती माझ्या जीवनाशी निगडित आहे.

त्यानंतर त्या लोकांनी मला सांगितले, की तुम्ही समवायचा जर इंग्रजी पर्याय सांगू शकत नसाल, तर त्याचा अर्थ समजून द्या. तेव्हा मी त्यांच्यासमोर समवाय पद्धतीवर एक व्याख्यानच देऊन टाकले. मातीचा घडा बनविला. मातीपासून घडा वेगळा आहे किंवा नाही? जर तुम्ही सांगाल की वेगळा आहे, तर मी सांगेन माझी माती मला द्या व तुमचा घडा तुम्ही घेऊन जा! आणि दोन्ही एक आहेत असे जर सांगाल तर मी सांगेल, पाहा ती माती! ती घ्या आणि दोन्ही जर एक असतील तर त्यांत माती भरून दाखवा. तात्पर्य असे की, ते दोन्ही एक आहेत असेही सांगता येणार नाही आणि वेगळे आहेत असेही सांगता येणार नाही. त्याच रीतीने ज्ञान आणि कर्म वेगळे आहेत, असे सांगता येणार नाही आणि एकही आहेत असे सांगता येणार नाही. हा आहे समवाय. त्याला ह्यासाठी एखादा इंग्रजी शब्द असेल, पण तो मला कुठे येतो?

अशा रीतीने शब्दांच्या बाबतीत असे आहे, की ज्या क्षेत्राचा प्रसार झाला असेल, त्या क्षेत्राचे शब्द त्या भाषेत असतात. इंग्रजीत विज्ञानाचा प्रसार झाला आहे; त्यामुळे त्यासंबंधीचे शब्द आणि त्याची परिभाषा त्या भाषेत आहे. परंतु ज्या क्षेत्राचा प्रसार त्यांत अंतर्भूत झाला नाही, त्याचे शब्द त्यात फार कमीच असतील. उदाहरणार्थ, अध्यात्माचा प्रसार आपल्याकडे जेवढा झाला आहे तेवढा तेथे नाही. म्हणून मला अनेकदा वाटते, की कृष्णमूर्तींची व्याख्याने तेथील लोकांना कशी समजत असतील? ते भारतीय भाषेत नव्हे तर इंग्रजीत व्याख्याने देतात. ज्या शब्दांच्या बरोबर विचार जोडलेला असतो, त्यांना खास 'कोनोटेशन' असते. परकीय भाषेत जे कोनोटेशन असतात ते बऱ्याच वेळेला आपल्या शब्दांच्या कोनोटेशनबरोबर मिळतेजुळते नसतात. पाहा, इंग्रजीत 'माइन्ड' म्हणतात. माइन्ड म्हणजे तुम्ही काय समजलात? आपल्याकडे तर किती विविध अर्थाचे शब्द आहेत – मन, बुद्धी, चित्त, अहंकार, अंत:करण. कारण की आपल्याकडे अध्यात्माचे क्षेत्र फार रुजलेले आहे आणि प्रत्येक बाबतीत फार सूक्ष्म विचार झालेला आहे. म्हणजे विविध अर्थाचे अनेक शब्द तयार झालेले आहेत. तसे शब्द जे अध्यात्मात मिळतात तसे इंग्रजीत नसतात.

मला तर असे वाटते, की मानसशास्त्राच्या बाबतीतही आपल्याकडे अत्यंत सखोल असा विचार झालेला आहे. आपले शब्द पाहा. चित्तशुद्धी अथवा चित्तवृत्ती–निरोध असे शब्द इंग्रजीत सापडणार नाहीत. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात, सामाजिक क्षेत्रात अथवा सामाजिक क्षेत्रातही ही स्थिती आहे. समाजशास्त्र व राज्यशास्त्रही याला अपवाद नाही. म्हणून या सर्व क्षेत्रांत जर आपण इंग्रजीवर अवलंबून राहिलो, तर आपली विचार करण्याची पद्धती गोंधळात पडेल. इंग्रजीत ह्या सर्व बाबतीत सूक्ष्म विचारासाठी पुरेसे शब्द नाहीत. थोडक्यात, विज्ञानाच्या क्षेत्रात आपल्या भाषेत पुरेसे शब्द नाहीत, म्हणून आपली भाषा पुरेशी समर्थ नाही, असे मानणे पूर्ण अवास्तविक आहे. आपल्या भाषा तर अतिशय विकसित भाषा आहेत. आपल्याकडे विज्ञानाचा जसजसा अभ्यास होईल, तसे त्या क्षेत्रातही आपल्या भाषा समृद्ध होतील आणि तोपर्यंत आपण इंग्रजी शब्द वापरू. असे शब्द वापरण्यास काय चूक आहे व काय कठीण आहे? एक भाग ऑक्सिजन आणि दोन भाग हायड्रोजन मिळून पाणी तयार होते, असे का सांगता येणार नाही? तशाच रीतीने लाऊडस्पीकर हा शब्द आहे. तो आपला कर्ता, कर्म आणि क्रियापद ह्यांच्यावर परिणाम केल्याशिवाय वाक्यरचनेत बसत असेल तर तो शब्द स्वीकारण्यात कोणतेच नुकसान नाही. असे शब्द सरळ इंग्रजीत आपणाकडे चालू शकतील. मोटर, स्टेशन, टेबल वगैरे शब्द पण आपण स्वीकारले, तर त्यात काही हरकत नाही.

मुळात हे समजले पाहिजे की भाषेतील शब्द व्यवहारातून वाढतात. एका यंत्राच्या भागाची नावे अलगअलग असतात. ते यंत्र नीट समजून घ्यावयाचे असेल तर अशी शंभर–दीडशे नावे माहिती करून घ्यावी लागतील. अशा नावांतून मोठा शब्दकोश तयार होतो. परंतु केवळ त्याने मात्र भाषेची शक्ती वाढत नाही. तसेच काही शब्द आपल्या भाषेत नसले तरी त्यातून भाषेचे काही कमी होत नाही. एक तर व्यवहार वाढतो आणि शब्दही वाढतात. खरे पाहता भाषेचे अस्सल सामर्थ्य तर धातू–सामर्थ्य आहे. भाषेची अस्सल शक्ती धातूची शक्ती आहे. कोणत्या भाषेत किती धातू आहेत त्यावर तिची शक्ती अवलंबून आहे. जास्तीत जास्त धातू लॅटिन व संस्कृतमध्ये आहेत. आपल्या भाषेत तुलनेने धातू कमी असतील, परंतु ते आपणांस संस्कृतमधून सहजगत्या घेता येतात. म्हणजे संस्कृत व आपली हल्लीची भाषा दोन्ही मिळून काही कमी सामर्थ्य आपल्या भाषेत आहे, असे आपणांस जाणवणार नाही. म्हणून आपली भाषा समर्थ नाही हा विचार मनातून काढून

टाका. आपल्या भाषेत काही कमी नाही, किंबहुना आपल्या भाषा तर फारच विकसित व समर्थ भाषा आहेत.

त्यामुळे आपल्या भाषेतून आजचा सर्व व्यवहार होऊ शकणार नाही, ही गोष्ट चुकीची आहे. किंबहुना सर्व व्यवहार आपल्या भाषेतच झाला पाहिचे. विज्ञानसुद्धा आपल्या भाषेतूनच सामान्यजनापर्यंत पोहचविले पाहिजे. ही बाब निश्चित समजून घ्या; की जोपर्यंत विज्ञान मातृभाषेत लोकांसमक्ष ठेविले जात नाही तोपर्यंत ते व्यापकपणे पसरू शकणार नाही. ह्यासाठी ते आपल्या सर्व भाषेतून आणणे अनिवार्य आहे.

ह्यासाठी मी तुम्हांला सांगतो, की जे सर्व सुशिक्षित लोक आपल्या भाषेत विज्ञान नाही, अशी जी ओरड करतात, त्याऐवजी विज्ञान आपल्या भाषेत आणण्यास काहीतरी योगदान करतील तर बरे होईल. इंग्रजीत विज्ञानाची चांगली पुस्तके आहेत, ती सर्व आपल्या भाषेत आणली पाहिजेत. परंतु ह्यासंबंधी कुणी विचारच करत नाहीत. खरे पाहता ज्यांनी स्वत: इंग्रजीचे ज्ञान मिळविले, त्यांनी व्रत घेतले पाहिजे की मी मरण्यापूर्वी एका चांगल्या इंग्रजी पुस्तकाचा माझ्या मातृभाषेत अनुवाद करीन. असा अनुवाद केल्याशिवाय मला मरण्याचा अधिकार नाही. असे झाले तरच आपल्या नंतरची पिढी इंग्रजीच्या ओझ्यापासून वाचू शकेल. पितृ–धर्माची ही जरुरी आहे. हे तर सहजपणे होऊ शकेल. त्यासाठी राज्याचीही मदत घेता येईल. असे झाले, तर सुमारे दहा वर्षांत विज्ञानाविषयीचे इंग्रजी ज्ञान आपल्या भाषेत येऊ शकेल व त्याविषयी नंतर कुणाला तक्रार करण्यास जागा राहणार नाही.

हे सर्व सहजगत्या होणार नाही, त्यासाठी पुरुषार्थ करावा लागेल. आज अनेक क्षेत्रांत इंग्रजीशिवाय चालत नाही, असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा त्याचबरोबर असा आपण विचार करीत नाही, की इंग्रजीला हे स्थान मिळाले कशामुळे? काही आपोआप तर मिळाले नाही? त्यासाठी इंग्रजांनी केवढा मोठा पुरुषार्थ केला आहे. त्यामुळे आज तर परिस्थिती अशी आहे, की आपल्या स्वत:च्या देशामधील भाषा जर आपणांस शिकावयाच्या असतील तर त्या इंग्रजीमार्फतच शिकाव्या लागतात. समजा, मला बंगाली भाषा शिकावयाची असली तर मला मराठी, गुजराथी किंवा कन्नड भाषेमार्फत ती शिकता येईल का? नाही. कारण मराठी, गुजराथी, कन्नडमध्ये मला बंगाली भाषेचा कोश मिळणार नाही. तो इंग्रजीत मिळेल. त्यामुळे मला इंग्रजीमार्फतच बंगाली शिकावी लागेल.

असेच बाहेरच्या भाषांबाबतही आहे. मध्यंतरी मी चिनी भाषा शिकत होतो. त्यासाठी माझ्याकडे जी पुस्तके आली ती इंग्रजीतच होती. म्हणजेच येथील व बाहेरची भाषा आपणांस इंग्रजीमार्फतच शिकता येईल अशी परिस्थिती आहे. कारण की इंग्रजी भाषेत प्रत्येक भाषेसंबंधीचा कोश मिळू शकतो. हे कोश असेच विनासहायच बनले असतील का? त्यासाठी त्या लोकांनी किती मेहनत केली असेल? (खूप मेहनत करून त्या लोकांनी आपली इंग्रजी भाषा संपन्न बनविली आहे. ह्यासाठी त्यांच्याकडून बोधपाठ घेऊन आपणसुद्धा खूप मेहनत करून आपली भाषा संपन्न केली पाहिजे. असे काही करण्याऐवजी, बस, इंग्रजीशिवाय चालणार नाही; असे जर आपण रडगाणे गात बसलो, तर ते उचित होणार नाही.) हे तर आपल्या आळसाचे आणि आपल्या पुरुषार्थहीनतेचे लक्षण गणले जाईल. आपल्या गुलामीची मानसिक निशाणी गणली जाईल. आपल्या भाषेलादेखील आपण संपन्न बनवू या, अशी ईर्षा शिकलेल्या–सवरलेल्यांना चढली पाहिजे.

परंतु अशी ईर्षा कुठे आहे? त्यासाठी तर अध्ययनशील बनावे लागेल. व्यापारी, इंजिनियर वगैरे बनण्यास विज्ञान वाढवावे लागेल. विविध सामाजिक, शास्त्रे शिकवावी लागतील. हे सर्व करावे लागले. परंतु आज तर शाळा–कॉलेज सोडल्यानंतर आपले अध्ययनच समाप्त होत असते. तर हे सर्व कसे होईल?

ह्यासाठी मला हे सांगावयाचे आहे, की आपल्या भाषा पुरेशा समर्थ आहेत. एवढेच नव्हे, तर इंग्रजीच्या तुलनेत फारच विकसित आहेत. त्यात विज्ञानाची जी कमतरता आहे, त्याची पूर्तता आपण सर्वांनी केली पाहिजे आणि त्या बाबतीत आपल्या सर्व भाषा संपन्न होतील असे पाहिले पाहिजे, ह्यासाठी फार मोठा पुरुषार्थ करावा लागेल.

**(ज्ञान ते सांगतो पुन्हा**
*मौज प्रकाशन, मुंबई*)